# पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
# पिंपरी - ४११ ०१८

# क्रीडा विभाग

# क्रीडा धोरण

**१. मा.महापालिका सभा ठराव क्र.४२१ दि.१८/०१/२०१४**

**२. मा.महापालिका सभा ठराव क्र.४८० दि.२०/०५/२०१४**

**प्रस्तावना**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा व आजुबाजूच्या परिसराचा झपाट्याने विकास होत असून क्रीडा क्षेत्राचा विकास देखील तेवढ्याच झपाट्याने होणे गरजेचे आहे. महाराष्ट्र राज्यातील महानगरपालिकांपैकी पिंपरी चिंचवड महानगरपालिके मध्ये “क्रीडा विभाग” हा एक स्वतंत्र विभाग आहे. महानगरपालिकेच्या भौगोलिक परिसरामध्ये खेळाचा प्रचार, प्रसार व जोपासना होणे हा हेतू लक्षात घेता, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने “क्रीडा धोरण” जाहिर केले आहे. या क्रीडा धोरणामध्ये महानगरपालिका परिसरातील खेळाडू व नागरिक यांना जास्तीत जास्त क्रीडा विषयक सेवा व सुविधा देण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

क्रीडा क्षेत्रात विविध बदल लक्षात घेता शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा, विविध खेळांच्या महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा, कला व गिर्यारोहण स्पर्धा, मतिमंद व अपंग विद्यार्थ्यांच्या क्रीडा स्पर्धा इ. स्पर्धांचे आयोजन महानगरपालिकेच्या क्रीडा विभागा मार्फत केले जाते. महानगरपालिका परिसरातील क्रीडा प्रेमी, नागरिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू, विविध खेळातील अर्जून व शिवछत्रपती पुरस्कारार्थी खेळाडू व एकविध क्रीडा संघटनांचे पदाधिकारी यांच्या सूचना विचारात घेऊन महानगरपालिकेकडून गठित केलेल्या समितीने हा क्रीडा धोरणाचा मसूदा तयार करून “क्रीडा धोरण” निश्चीत केले आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्रीडा क्षेत्रात आग्रगण्य रहावी, नागरिकांमध्ये व्यायामाची आवड जोपासावी, खेळाडूंनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर दर्जेदार कामगिरी करावी यासाठी या खेळाडूंना दर्जेदार सेवासुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. तसेच उत्तम कामगिरी करणा-या खेळाडूंना क्रीडा शिष्यवृत्ती, खेळाडूंचा गुणगौरव, दर्जेदार क्रीडा साहित्य या बाबी केंद्रबिंदु मानून खेळाडूंसाठी हितावह योजना महानगरपालिकेने राबविली आहे. तसेच “खेळाडू दत्तक योजना” याचाही समावेश ह्या क्रीडा धोरणात केला आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही एक औद्योगिक नगरी म्हणून ओळखली जाते. तसेच ती क्रीडानगरी म्हणूनही ओळखली जावी व दर्जेदार खेळाडू घडून पिंपरी चिंचवड शहराच्या व देशाच्या नावलौकीकात भर पडावी, हा उद्देश असून हे क्रीडा धोरण तयार करण्यात आले आहे.

**क्रीडा धोरण**

**अनुक्रमणिका -**

**भाग – १ - अ - शालेय क्रीडा धोरण**


| अ.क्र. | तपशिल | पानांक |
|---|---|---|
| १ | शालेय क्रीडा धोरण | १ |
| २ | शालेय विद्यार्थ्यामध्ये योगासन व सूर्यनमस्कारांचे महत्व जागविणे | २ |
| ३ | क्रीडा प्रबोधिनी | २ |
| ४ | शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये प्राविण्य मिळविणा-या शाळांना प्रोत्साहनात्मक परितोषिक देणे | २ |
| ५ | शालेय क्रीडा शिक्षक, क्रीडा मार्गदर्शक व क्रीडा पर्यवेक्षक यांचेकरिता प्रशिक्षण शिबिर आयोजित करणे | ३ |
| ६ | म.न.पा. परिसरात भौगोलिकदृष्टया प्रभाग निहाय २ क्रीडा केंद्रे तयार करणे. | ३ |


**भाग – १ - ब - विविध क्रीडा स्पर्धा**


| अ.क्र. | तपशिल | पानांक |
|---|---|---|
| १ | शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा आयोजित करणे | ५ |
| २ | विभाग राज्य, राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झालेल्या विद्यार्थी खेळाडूंना स्पर्धासाठी पाठविणे | ५ |
| ३ | म.न.पा. वर्धापन दिन अनुषंगाने विविध क्रीडा स्पर्धाचे आयोजन करणे. | ६ |
| ४ | म.न.पा. अधिकारी/कर्मचारी यांचे विविध खेळाचे क्रीडा संघ तयार करुन स्पर्धेसाठी पाठविणे | ७ |
| ५ | महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणे. | ७ |
| ६ | शासकीय निमशासकीय सहकारी संस्था, औद्योगिक प्रतिष्ठानांमधील कर्मचा-यांसाठी क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणे. | ११ |


**भाग – १ - क - खेळाडूंसाठी दिल्या जाणा-या क्रीडा सुविधा**

| अ.क्र. | तपशिल | पानांक |
|---|---|---|
| १ | म.न.पा. परिसरातील क्रीडा सुविधांचा खेळाडूंना लाभ देणे. | १२ |
| २ | खेळाडूंना सवलतीच्या दरात वैद्यकीय उपचार देणे | १२ |
| ३ | क्रीडा विकासात स्वयं सेवी संस्थाचा सहभाग वाढविणे | १३ |


**भाग – १ - ड – क्रीडा शिष्यवृत्ती व आर्थिक सहाय्य**


| अ.क्र. | तपशिल | पानांक |
|---|---|---|
| १ | म.न.पा. परिसरातील विद्यार्थी खेळाडूंसाठी शालेय क्रीडा शिष्यवृत्ती योजना | १४ |
| २ | राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या खुल्या वरिष्ठ खेळाडूंना आर्थिक सहाय्य / क्रीडा शिष्यवृत्ती देणे | १५ |
| ३ | आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आर्थिक सहाय्य करणे. | १८ |

| | | |
|---|---|---|
| | **भाग – १ - ई – खेळाडू दत्तक योजना** | २० |


**१ – फ - क्रीडा प्रशिक्षण केंद्र**


| **अ.क्र.** | तपशिल | पानांक |
|---|---|---|
| १ | कै.अण्णासाहेब मगर स्टेडियम येथे क्रिकेट प्रशिक्षण केंद्र सुरु करणे | २३ |
| २ | साहसी क्रीडा प्रकारांना उत्तेजन देणे | २३ |

| | | |
|---|---|---|
| | **भाग – १ - ग – अनुदान** | २५ |


**भाग – १ - ह – इतर उपक्रम**

| अ.क्र. | तपशिल | पानांक |
|---|---|---|
| १ | क्रीडा दिन, क्रीडा सप्ताह साजरा करणे | २९ |
| २ | क्रीडा वाड:मय निर्मिती करणे | ३० |
| ३ | म.न.पा. च्या क्रीडा सुविधा चित्रीकरणासाठी भाडयाने देणे | ३० |
| ४ | क्रीडा साहित्य खरेदी | ३० |
| ५ | अद्ययावत वसतीगृह व विश्रामगृह तयार करणे | ३० |


**भाग – २ - विविध क्रीडा सुविधा**


| अ.क्र. | तपशिल | पानांक |
|---|---|---|
| १ | बहुउद्देशिय मैदाने | ३१ |
| २ | कै. अण्णासाहेब मगर स्टेडियम, नेहरुनगर मैदान | ३६ |
| ३ | मदनलाल धिंग्रा मैदान, निगडी - प्रधिकरण | ३६ |
| ४ | श्री संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल, इंद्रायणीनगर, भोसरी | ३६ |
| ५ | हॉकी पॉलिग्रास मैदान | ३६ |
| ६ | बॉक्सिंग प्रशिक्षण केंद्र | ३७ |
| ७ | रायफल शुटिंग प्रशिक्षण केंद्र | ३७ |
| ८ | वेटलिफ्टिंग सेंटर | ३८ |
| ९ | कृत्रिम गिर्यारोहन भिंत | ३८ |
| १० | जलतरण तलाव | ४० |
| ११ | स्केटिंग ग्राउंड | ४४ |
| १२ | लॉन टेनिस कोर्ट | ४६ |
| १३ | बॅडमिंटन कोर्ट | ४७ |
| १४ | स्क्वॅश कोर्ट | ५२ |
| १५ | टेबल टेनिस सेंटर | ५२ |
| १६ | थेरगांव बोट क्लब | ५२ |
| १७ | व्यायामशाळा | ५६ |


**भाग – ३ - प्रशासकीय**

| अ.क्र. | तपशिल | पानांक |
|---|---|---|
| १ | क्रीडा पर्यवेक्षक, क्रीडा शिक्षक | ६१ |
| २ | क्रीडा विभागांतर्गत मिळकतीच्या सुरक्षिततेबाबत | ६१ |
| ३ | मैदान आरक्षण व देखभाल दुरूस्ती | ६१ |
| ४ | क्रीडा निधी | ६२ |
| ५ | खेळाडू भरती | ६२ |
| ६ | धोरण राबविणेसाठी क्रीडा विभागातील कर्मचा-यांचे सक्षमीकरण करणे | ६२ |
| ७ | क्रीडा ग्रंथालय व माहिती केंद्र | ६३ |
| ८ | संघटना | ६३ |
| ९ | क्रीडा स्वरानंद नियतकालिक प्रसिध्द करणे | ६३ |


**भाग – ४ – विविध क्रीडा सुविधा दरपत्रक**


| अ.क्र. | तपशिल | पानांक |
|---|---|---|
| १ | बहुउद्देशिय मैदाने | ६४ |
| २ | कै. अण्णासाहेब मगर स्टेडियम, नेहरुनगर मैदान | ६४ |
| ३ | मदनलाल धिंग्रा मैदान, निगडी - प्रधिकरण | ६४ |
| ४ | श्री संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल, इंद्रायणीनगर, भोसरी | ६५ |
| ५ | हॉकी पॉलिग्रास मैदान | ६५ |
| ६ | बॉक्सिंग प्रशिक्षण केंद्र | ६६ |
| ७ | रायफल शुटिंग प्रशिक्षण केंद्र | ६६ |
| ८ | वेटलिफ्टिंग सेंटर | ६६ |
| ९ | कृत्रिम गिर्यारोहन भिंत | ७१ |
| १० | जलतरण तलाव | ६७ |
| ११ | स्केटिंग ग्राउंड | ६७ |
| १२ | लॉन टेनिस कोर्ट | ६८ |
| १३ | बॅडमिंटन कोर्ट | ६९ |
| १४ | स्क्वॅश कोर्ट | ७० |
| १५ | टेबल टेनिस सेंटर | ७० |
| १६ | व्यायामशाळा | ६६ |
| १७ | थेरगांव बोट क्लब | |

## भाग-१ – अ - शालेय क्रीडा धोरण

### १) शालेय क्रीडा धोरण –

पिंपरी चिंचवड म.न.पा च्या एकुण १३६ प्राथमिक शाळेतून ४९,३७० विद्यार्थी, माध्यमिक १७ शाळेतून ८८६० विद्यार्थी, व एक क्रीडा प्रबोधिनीमध्ये २४० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या म.न.पाच्या शाळेत विविध क्रीडा प्रकार शिकविले जातात. या विद्यार्थ्यांना खेळात जास्तीत जास्त प्रोत्साहन मिळणेसाठी व त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव मिळण्यासाठी तसेच मनपा परिसरातील खाजगी शाळा यांच्यातून चांगल्या दर्जाचे खेळाडू निर्माण होण्यासाठी क्रीडा धोरण ठरविण्यात आले आहे.

**उद्दीष्टे**

1. इयत्ता १ ली ते ५ वी च्या विद्यार्थ्यांना क्रीडा स्पर्धेत सामावून घेण्यात येईल व ६, ८, १० व १२ या वयोगटातील खेळाडूंचे म.न.पा.पातळीवर स्पर्धेचे आयोजन करणे.
2. इयत्ता ५ वी ते १० वी वयोगटाचा पी.सी.एम.सी.क्लब स्थापन करणे व खेळाडूंचा म.न.पा.च्या नावाने संघ तयार करून विविध स्पर्धेमध्ये उतरविण्यात येईल.
3. अंध, अपंग व मतिमंद शालेय विद्यार्थी खेळाडूंच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात येईल.
4. म.न.पा.शालेय विद्यार्थ्यासाठी खेळाचा सराव शिबिरे व स्पर्धा घ्याव्यात या सराव शिबिर, स्पर्धा काळात विद्यार्थी,शिक्षक, मार्गदर्शक यांना मोफत बससेवा उपलब्ध करुन देण्यात येईल. विद्यार्थ्यांना आवश्यक पोषक आहार मा.आयुक्त यांचे मंजुरीने देण्यात येईल.
5. राज्य, राष्ट्रीय विद्यार्थी खेळाडुंना चांगल्या दर्जाचे क्रीडा साहित्य, खेळ प्रकारानुसार गणवेश, स्पोर्टस् किट इ. म.न.पा च्या खर्चाने पुरविण्यात येईल.
6. संबधित खेळ प्रमुख शिक्षक,क्रीडा पर्यवेक्षक यांनी वैद्यकीय विभागाकडुन वेळोवेळी विद्यार्थी खेळाडूंची शारिरीक तपासणी करुन, त्यांचा दैनदिन सरावासाठी पाठपुरावा करण्यात, वैद्यकीय विभागाकडुन क्रीडा वैद्यक,शारिरीक तपासणी,औषधोपचार कामी तज्ञ डॉक्टरांच्या सेवा उपलब्ध करुन घेण्यात येतील.
7. प्रशिक्षण शिबिरासाठी साई अथवा इतर क्रीडा तज्ञांचे मार्गदर्शन घेण्यात येईल. आवश्यकतेनुसार तात्पुरत्या स्वरुपाच्या विशिष्ट कालावधीसाठी मानधनावर तज्ञ मार्गदर्शकांच्या सेवा मा.आयुक्त यांच्या मंजुरीने घेण्यात येतील.
8. ही योजना राबविणेकामी,योजनेच्या सुरुवातीपासुन ते भविष्यात वरील धोरणाच्या अनुषंगाने होणारा खर्च महापालिकेच्या क्रीडा निधी ठेवीवरील व्याजातुन करण्यात येईल.
9. ही योजना राबविताना वरील धोरणात आवश्यकतेनुसार फेरबदल करण्याचे,वाढ करण्याचे अथवा अनावश्यक बाबी टाळुन त्यात सुधारणा करण्याचे अधिकार मा.आयुक्त / अति.आयुक्त यांचेकडे राहतील.
10. शालेय क्रीडा स्पर्धा म.न.पा. ने आयोजित केल्यास या स्पर्धा म.न.पा.च्या मिळकतीमध्ये घेण्यात याव्यात. खाजगी शाळेने स्पर्धा घेतल्यास त्या स्पर्धा खाजगी शाळेच्या मैदानावर घेण्यात येतील.

**२) शालेय विद्यार्थ्यांमध्ये योगासने व सूर्यनमस्कारांचे महत्व जागविणे.**

शालेय विद्यार्थ्यांचा ताणतणाव कमी करणे, विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रता, लवचिकपणा, निरोगी जीवनासाठी योगासने व सूर्यनमस्काराचे माध्यमातून सर्वांगीण विकास करणे आवश्यक आहे. त्याकरीता शालेय विद्यार्थ्यांसाठी मानधनावर योगा शिक्षक नेमन्यात येईल. तसेच योगासनामध्ये प्राणायाम ही शिकविले जाईल. यामुळे विद्यार्थ्यांची एकाग्रता होण्यास मदत होईल. सर्व शाळेतून प्रत्येक विद्यार्थ्यास कमीत कमी ५ योगासने व सूर्यनमस्कार येणे आवश्यक आहे.

**उद्दीष्टे**

१. प्रत्येक शाळेत शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सुर्यनमस्कार शिकविले पाहिजेत.
२. प्रत्येक विद्यार्थ्यांना पाच योगासने ही आलीच पाहिजेत.
३. शालेय विद्यार्थ्यांना योग व प्राणायाम यांचे महत्व पटवून दिले पाहिजे.
४. गुरूकुलच्या धर्तीवर प्रशिक्षण केंद्र उभारण्यात यावे, त्यात योगा, प्राणायाम शिकविण्याबाबतचे नियोजन करण्यात येईल.

**३) क्रीडा प्रबोधिनी –**

म.न.पा. स्थानिक स्तरावर विद्यार्थ्यांची बॅटरी टेस्ट घेऊन निवड झालेल्या खेळाडूंना इ.५ ते १० साठी प्रवेश दिला जातो. निवड झालेल्या खेळाडूंना खेळाचे प्रशिक्षण देऊन स्पर्धेत उतरविले जाते. यासाठी आहार, प्रवास, शिबिरे, तज्ञ मार्गदर्शक व वैद्यकीय सेवा यांचा अंतर्भाव केला आहे. हा सर्व खर्च
महानगरपालिकेमार्फत केला जातो. सरावाची वेळ सकाळी ७.०० ते ९.३० व सांयकाळी ४.०० ते ६.३० अशी आहे.

**उद्दीष्टे**

१. म.न.पा.क्रीडा प्रबोधिनीची शैक्षणिक बाब माध्यमिक शिक्षण विभागाकडे व क्रीडा विषयक बाब क्रीडा विभागाकडे राहिल.
२. क्रीडा प्रशिक्षणा बरोबरच सर्व शैक्षणिक सुविधा मोफत देण्यात येतात.
३. म.न.पा.परिसरातील रहिवासी विद्यार्थ्यांना क्रीडा प्रबोधिनीसाठी प्राधान्य देण्यात येईल.
४. क्रीडा प्रबोधिनीच्या विद्यार्थ्यांना म.न.पा.तर्फे आहार व प्रवास खर्च दिला जाईल.
५. या विद्यार्थ्यांना स्पर्धेला जाण्यासाठी लागणारा खर्च म.न.पा.तर्फे केला जाईल.
६. महाराष्ट्र शासनाच्या स्थापित क्रीडा प्रबोधिनीच्या धोरणाशी सुसंगत पिंपरी चिंचवड म.न.पा.च्या क्रीडा धोरणामध्ये आवश्यक ते बदल करणेत येतील.
७. भविष्य काळात आवश्यकतेनुसार प्रभागनिहाय क्रीडा प्रबोधिनी प्रस्तावित राहतील.

**४)शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये प्राविण्य मिळविणा-या शाळांना प्रोत्साहनात्मक पारितोषिक देणे.**

शालेय विद्यार्थ्यांना क्रीडा कौशल्य दाखविण्याकरीता शालेय क्रीडा स्पर्धा या महत्वपूर्ण आहेत. जिल्हास्तर, राज्यस्तर व राष्ट्रीयस्तर शालेय क्रीडा स्पर्धेत ज्या शाळेतील विद्यार्थ्यांचा सहभाग जास्त असेल अशा शाळांना प्रोत्साहनात्मक पारितोषिक देण्यात येईल जेणेकरून त्यांचा उत्साह अधिक वाढेल व सहभागही जास्त प्रमाणात वाढेल. यामुळे शाळा व विद्यार्थी खेळाडूंना चांगल्या प्रकारे प्रोत्साहन मिळेल.

**उद्दीष्टे –**

१. शालेय स्पर्धेत ज्या शाळा सहभागी होतील व प्राविण्य मिळवतील अशा शाळांना पारितोषिक दिले जाईल. (क्रीडा विषयक पुस्तके, क्रीडा साहित्य इ.)
२. स्पर्धेसाठी लागणारे सर्व नियम हे शाळांनी स्पर्धेच्या काळात पाळले पाहिजेत.
३. शाळांनी स्पर्धेच्या ठिकाणी शिस्तीचे पालन केले पाहिजे.
४. पारितोषिकाचा होणारा सर्व खर्च हा म.न.पा. मार्फत केला जाईल.

**५) शालेय क्रीडा शिक्षक, क्रीडा मार्गदर्शक व क्रीडा पर्यवेक्षक यांचेकरीता प्रशिक्षण शिबिरेआयोजित करणे.**

खेळांमधील बदलेले नियम आधुनिक तंत्रज्ञान, प्रशिक्षणाच्या पध्दती, खेळामधील कौशल्याची ओळख, नवीन खेळाची ओळख, खेळाची शास्त्रोक्त माहिती वेळोवेळी शिक्षकांना करून देणे आवश्यक आहे.

जिल्हा विभाग, राज्य व राष्ट्रीय स्तरावर क्रीडा शिक्षकांच्या ज्ञानामध्ये भर पडावी व वेळोवेळी खेळाच्या नियमात झालेले बदल व तंत्र अवगत होणेसाठी दरवर्षी उन्हाळी व हिवाळी शिबिर किमान १० दिवसांचे आयोजित करावे. यामध्ये म.न.पा. व खाजगी शिक्षकांचा समावेश असावा.

**उद्दीष्टे**

१. म.न.पा.परिसरातील क्रीडा शिक्षक व क्रीडा पर्यवेक्षक यांचे किमान १० दिवसांचे हिवाळी व उन्हाळी क्रीडा शिबिर क्रीडा विभागाने आयोजित करावे.
२. शिबिरासाठी खेळाच्या तज्ञ मार्गदर्शकांमार्फत मार्गदर्शन दिले जाईल.
३. या शिबीरात तज्ञ मार्गदर्शक, मानधन, चहा, अल्पोपहार, स्टडी टुर, उदघाटन, समारोप, समारंभ, क्रीडा शिबिराच्या अनुषंगाने क्रीडा साहित्य खरेदी इ. खर्चासाठी क्रीडा अंदाजपत्रकात तरतूद करावी.

**६) म.न.पा. परिसरात भौगोलिकदृष्ट्या प्रभाग निहाय २ क्रीडा केंद्रे तयार करणे -**

म.न.पा. परिसरात भौगोलिकदृष्ट्या प्रभाग निहाय २ क्रीडा केंद्र तयार करण्यात येतील. एका केंद्रात येणा-या सर्व शाळा व क्रीडा सुविधा (उदा.व्यायामशाळा, बॅडमिंटन हॉल, लॉन टेनिस कोर्ट, जलतरण तलाव, रायफल शुटींग केंद्र, बॉक्सींग हॉल, गिर्यारोहण भिंत, स्क्वॅश कोर्ट, बोट क्लब, मैदाने, स्केटींग ग्राऊंड, क्रीडा ग्रंथालये, वेटलिफ्टींग सेंटर, क्रीडा संकुले, हॉकी मैदाने इ.) नेमलेले क्रीडा शिक्षक, लिपीक, जीवरक्षक, वर्ग-४ चे कर्मचारी यांचे कामावर क्रीडा पर्यवेक्षकांचे नियंत्रण ठेवून देखरेख करणे व त्याची देखभाल ठेवणे.

**उद्दीष्टे**

1. म.न.पा. परिसरात भौगोलिकदृष्टया प्रभाग निहाय २ क्रीडा केंद्र तयार करणे .
2. एका केंद्रात येणा-या सर्व म.न.पा. शाळा, सर्व क्रीडा सुविधा (उदा. व्यायामशाळा, बॅडमिंटन हॉल, लॉन टेनिस कोर्ट, जलतरण तलाव, रायफल शुटींग केंद्र, बॉक्सिंग हॉल, कृत्रिम गिर्यारोहण भिंत, स्क्वॅश कोर्ट, बोट क्लब, मैदाने, स्केटींग ग्राऊंड, क्रीडा ग्रंथालय, तलवारबाजी केंद्र, धनुर्विद्या केंद्र, वेटलिफ्टींग सेंटर, क्रीडा संकुले, हॉकी मैदान इ.) इत्यादी करीता नेमलेले क्रीडा शिक्षक, लिपीक, जीवरक्षक, वर्ग ४ चे कर्मचारी कामकाजावर क्रीडा पर्यवेक्षकाने नियंत्रण ठेऊन देखरेख करणे.
3. क्रीडा पर्यवेक्षकांना नेमुन दिलेल्या खेळांचा विकास करणे.
4. क्रीडा पर्यवेक्षकांना नेमुन दिलेल्या खेळांचा सराव क्रीडा शिक्षकांमार्फत करुन घेणे.
5. जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा अंतर्गत क्रीडा पर्यवेक्षक यांना नेमून दिलेल्या खेळ स्पर्धांचे नियोजन व आयोजन क्रीडा पर्यवेक्षक यांनी करणे.
6. विभाग, राज्य, राष्ट्रीय स्तर स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंना स्पर्धेसाठी जाण्यास प्रवृत्त करणे. याकामी आवश्यक ती कार्यवाही करणे.

## भाग-१ – ब - विविध क्रीडा स्पर्धा

**१. शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा आयोजित करणे -**

महाराष्ट्र शासनाने सन २००३ मध्ये प्रत्येक महानगरपालिकेस क्रीडा क्षेत्रासाठी जिल्हा दर्जा दिलेला आहे. त्यानुसार पिंपरी चिंचवड म.न.पा.स ही क्रीडा क्षेत्रासाठी जिल्हा दर्जा दिलेला आहे. पिंपरी चिंचवड म.न.पा. मार्फत सन २००४-०५ पासून पिंपरी चिंचवड गटाच्या जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या जातात. या स्पर्धेमध्ये म.न.पा. परिसरातील म.न.पा.च्या / खाजगी शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा समावेश असतो. सदर स्पर्धा पिंपरी चिंचवड महानगरपालिका व जिल्हा क्रीडा परिषद पुणे यांच्या नियंत्रणाखालील पार पाडल्या जातात.

महाराष्ट्र शासनाने निश्चित केलेल्या खेळ प्रकारांच्या स्पर्धाचे आयोजन दरवर्षी केले जाईल.

**उद्दीष्टे**

1. जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा आयोजनापुर्वी म.न.पा. परिसरातील सर्व शाळांतील मुख्याध्यापक,क्रीडाशिक्षक यांची सभा आयोजित करावी.
2. सदर सभेत शासनाने निश्चित केलेल्या खेळांच्या स्पर्धा म.न.पा. व खाजगी शाळां मार्फत आयोजना बाबत आढावा घेणे.
3. म.न.पा. आयोजित करीत असलेल्या स्पर्धा खर्चांचे अंदाजपत्रक तयार करणे.
4. सदर स्पर्धेतील काही खेळ प्रकारांच्या स्पर्धा खाजगी शाळांनी आयोजित करण्याचे ठरल्यास त्यांना म.न.पा.स्पर्धा खर्चांच्या २५% रक्कम स्पर्धा खर्च म्हणून मंजूर केला जाईल. संबंधित स्पर्धा जर म.न.पा.ने घेतली तर या स्पर्धेकरीता स्टेज, मंडप, विद्युत, स्पिकर, मैदान तयार करणे हा खर्च वगळता, पंच मानधन, चहा अल्पोपहार भत्ता, बॅनर्स खर्च, पुजा व पुष्प गुच्छ खर्च इ. खर्च क्रीडा पर्यवेक्षकांना मंजूर केला जातो. या खर्चाच्या २५% रक्कम खाजगी शाळेस देणेकामी कार्यवाही केली जाईल. खाजगी शाळेने स्पर्धा संपल्यानंतर १५ दिवसांच्या आत विहित नमून्यात खर्च हिशोब दिल्यानंतर सक्षम समितीची मान्यता घेऊन खर्च देण्याची कार्यवाही केली जाईल.
5. म.न.पा.ने आयोजित केलेल्या जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा अनुषंगाने स्पर्धा खर्च क्रीडा साहित्य खरेदी, मैदान भाडे, प्रेक्षागृह भाडे, ट्रॉफीज, चहा अल्पोपहार खर्च स्पर्धा उदघाटन व समारोप समारंभ खर्च इ. खर्च म.न.पा. मार्फत मंजूर करणे.
6. जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धांकरिता कर्मचारी वर्ग हा सकाळी ७.०० ते सांय.७.०० पर्यंत स्पर्धेचे कामकाज करीत असतो. तरी क्रीडा पर्यवेक्षक, क्रीडा शिक्षक व वर्ग-४ चे कर्मचारी यांना चहा अल्पोपहार व अतिकालिन भत्ता देण्यात येईल.
7. शासनाच्या दरानुसार पंच मानधन हे शालेय स्पर्धांसाठी अदा करण्यात येईल. पंच मानधन व चहा अल्पोपहार भत्त्यात वाढ करणेकामी सक्षम समितीची मान्यता घेतली जाईल.

**२) विभाग, राज्य, राष्ट्रीयस्तर शालेय ,क्रीडा स्पर्धासाठी निवड झालेल्या विद्यार्थी खेळाडूंना स्पर्धासाठी पाठविणे.**

जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धेतून जे खेळाडू विजयी होतील ते विभाग स्तरावर, विभाग स्तरावरून राज्य स्तरावर व राज्य स्तरावरून राष्ट्रीय स्तरावर जे खेळाडू जिंकून पुढे जातात. अशा विभाग, राज्य, राष्ट्रीय स्तरावर खेळासाठी जाणा-या म.न.पा.च्या खेळाडू विद्यार्थ्यांचा खर्च क्रीडा विभागामार्फत केला जातो.

**उद्दीष्टे**

1. विभागस्तर, राज्यस्तर, राष्ट्रीयस्तर शालेय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झालेल्या म.न.पा. शाळेतील खेळाडूंना स्पर्धेसाठी पाठविताना त्यांना येण्या जाण्यासाठी साधी / निमआराम एसटी.चे अथवा रेल्वे २ रा वर्ग स्लिपर भाडे, सक्षम समितीच्या मान्यतेप्रमाणे दैनिक भत्ता स्पर्धा प्रवेश फी, स्पर्धा काळातील औषध खर्च इ. खर्च द्यावा.
2. स्पर्धेस जाताना संघ किंवा विद्यार्थी खेळाडू समवेत १ क्रीडा शिक्षक अथवा १ क्रीडा शिक्षिका पाठविणेत येईल. त्यांचा ही प्रवास भत्ता साध्या एस.टी.दरांने / २ -या वर्गाचा रेल्वे प्रवास दरांनुसार व भोजन भत्ता (दैनिक भत्ता) सक्षम समितीने मान्यता दिल्याप्रमाणे देण्यात येईल.
3. स्पर्धेस जाताना खेळाडूं समवेत मार्गदर्शक पाठविणेत येईल व त्याचा खर्च वरील प्रमाणे करण्यात येईल.
4. खेळाडूं या मुली असतील तर त्यांचे समवेत महिला क्रीडा शिक्षिका पाठविणेत यावे. त्यांचा ही खर्च वरीलप्रमाणे मंजूर करणेत येईल.
5. दैनिक भत्ता दर हा म.न.पा.ने ठरवावा. व त्याबाबतच्या अटी व शर्ती शासन निर्णयाप्रमाणे लागू राहतील. खेळाडूस प्रतिदिन दैनिक (भोजन)भत्ता र.रु.२००/- व त्याचे समवेत जाणा-या क्रीडा शिक्षक/मार्गदर्शक/प्रशिक्षक यांना प्रतिदिन दैनिक (भोजन)भत्ता र.रु.२००/- देय्य राहील.यामध्ये बदल करण्याचे अधिकार सक्षम समितीस राहील.
6. विभाग, राज्य, राष्ट्रीयस्तर शालेय क्रीडा स्पर्धा अनुषंगाने होणा-या अंदाजे खर्चास सक्षम समितीची मान्यता घ्यावी. या स्पर्धा अनुषंगाने विद्यार्थी, क्रीडा शिक्षक, क्रीडा मार्गदर्शक यांना द्यावयाचा प्रवास भत्ता, दैनिक भत्ता, प्रवेश फी, औषध खर्च इ. खर्च देण्यासाठी आवश्यक ते प्रमाणे कायम स्थायी अग्रिमधन मंजूर करणेत येईल. या रकमेतून संबंधित क्रीडा शिक्षक यांचे नावे आगाऊ रक्कम देण्यात येईल. स्पर्धेहून आल्यानंतर आगाऊ रकमेचे समायोजन १५ दिवसांत विहित नमून्यात संबंधितांनी करणे बंधनकारक राहिल.
7. विभाग, राज्य, राष्ट्रीयस्तर शालेय क्रीडा स्पर्धे करिता निवड झालेल्या खेळाडूंना स्पर्धेसाठी जाणेकामी आगाऊ रकमेची मागणी करताना संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाचे / क्रीडा पर्यवेक्षक पत्र, अंदाजे खर्च तपशिल, खेळाडूंच्या पालकांचे संमतीपत्र, स्पर्धेत निवड झालेबाबत जिल्हा क्रीडा अधिकारी, पुणे यांचे पत्र इ. माहिती स्पर्धेपुर्वी किमान ३ दिवस क्रीडा विभागाकडे सादर करणे आवश्यक आहे.
8. म.न.पा. मार्फत विविध खेळांच्या विभाग, राज्य, राष्ट्रीयस्तर शालेय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्याचे नियोजन आहे.

**३) म.न.पा. वर्धापन दिन अनुषंगाने विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणे.**

म.न.पा. वर्धापनदिन अनुषंगाने अधिकारी व कर्मचारी, मा.पदाधिकारी, मा.नगरसदस्य व पत्रकार यांच्या विविध क्रीडा स्पर्धा घेऊन प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकांची बक्षिसे देण्यात येतील. यामुळे त्यांची शारीरीक व मानसिक तंदुरूस्ती राहण्यात मदत होईल व काम करण्यात उत्साह निर्माण होईल व या व्यतिरिक्त पिंपरी चिंचवड म.न.पा.च्या विविध विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्या दर महिन्याच्या सुट्टीच्या दिवशी एक किंवा दोन खेळाच्या स्पर्धा घेण्यात येतील.

**उद्दीष्टे**

१. म.न.पा.वर्धापन दिनाच्या अनुषंगाने विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले जाईल.
२. या स्पर्धेत अधिकारी,कर्मचारी, मा.पदाधिकारी,मा.नगरसदस्य,पत्रकार यांचा समावेश असेल.
३. म.न.पा. वर्धापन दिनाच्या अनुषंगाने होणा-या क्रीडा स्पर्धेत नगरसदस्य व नगरसदस्या यांचाही समावेश असेल.
४. म.न.पा.वर्धापन दिनाच्या क्रीडा स्पर्धांचा खर्च क्रीडा विभागामार्फत केला जाईल.

**४) म.न.पा. अधिकारी/कर्मचारी यांचे विविध खेळाचे क्रीडा संघ तयार करून स्पर्धेसाठी पाठविणे.**

पिंपरी चिंचवड म.न.पा.मध्ये खेळाडू म्हणून अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. त्यांचा क्रीडा विकास होऊन म.न.पा.चे नाव उज्वल होण्याच्या दृष्टीने तसेच अधिकारी व कर्मचारी यांची शारीरीक व मानसिक तंदुरूस्ती राहण्यास मदत होईल व काम करण्यास उत्साह येईल. यासाठी विविध खेळाचे संघ तयार करून विविध स्पर्धेसाठी पाठविणे.

**५) महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणे –**

म.न.पा. परिसरातील खेळाडूंना त्यांचे क्रीडा कौशल्य दाखविता यावे व बाहेरून येणा-या खेळाडूंचे क्रीडा कौशल्य आत्मसात करण्यासाठी दर वर्षी म.न.पा.परिसरात महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करावे. यामुळे महानगरपालिकेच्या नावलौकीकात भर पडेल.

**अटी, नियम व शास्ती.**

1. महापौर चषक स्पर्धेचे कोणत्या खेळ प्रकारच्या स्पर्धा घ्यावयाच्या आहेत, त्यांचे नियोजन हे माहे डिसेंबर मध्ये होणे आवश्यक आहे. म्हणजे त्या अनुषंगाने अंदाजपत्रक करणे सोईचे होईल.
2. सदर स्पर्धा आयोजन करताना २ स्पर्धांमध्ये १ महिन्यांचे अंतर असावे.
3. सदर स्पर्धेसाठी म.न.पा.ने दिलेल्या तरतूदीच्या मर्यादेतच खर्च करण्यात येईल.
4. महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा, म.न.पा. स्वत: आयोजित करेल अशा वेळी रोख बक्षिसे, ट्रॉफीज, बॅनर्स, पंच मानधन, प्रवास खर्च, खेळाडू दैनिक भत्ता, प्रवास भत्ता, पंच दैनिक भत्ता, चहा अल्पोपहार खर्च, पत्रकार परिषद खर्च, क्रीडा साहित्य खर्च इ. स्पर्धा अनुषंगाने खर्च क्रीडा विभागाकडून केला जाईल. स्टेज, मंडप, टेबल, खुर्च्या, मैदान तयार करणे इ. स्थापत्य विषय खर्च स्थापत्य विभागा संबंधित प्रभाग व विद्युत, स्पिकर माईक इ. विद्युत विषयक खर्च विद्युत विभाग संबंधित प्रभाग करेल.
5. महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या म.न.पा.च्या मालकीच्या मैदानावर तसेच इमारतीमध्ये घेणे बंधनकारक राहील.
6. महापौर चषक जिल्हा, राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा आयोजन पुर्वी किमान २ महिने संबंधित क्रीडा संघटनेने मा.महापौर यांना लेखी पत्रान्वये कळविणे आवश्यक आहे.

7. महापौर चषक जिल्हा, राज्यस्तर, राष्ट्रीयस्तर क्रीडा स्पर्धा आयोजना बाबत उपलब्ध तरतूदी नुसार मा.महापौर व मा.आयुक्त यांनी घेतलेला निर्णय अंतिम राहिल.
8. महापौर चषक राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाच्या स्पर्धा आयोजनाबाबत म.न.पा.परिसरातील संघटनेने व खाजगी संस्थेने तयारी दर्शविल्यास अशांना म.न.पा.कडून खालीलप्रमाणे स्पर्धा खर्च दिला जाईल.

| अ.क्र. | स्पर्धेचा तपशिल | जिल्हास्तर | राज्यस्तर | राष्ट्रीय स्तर |
|---|---|---|---|---|
| १ | वैयक्तिक खेळ प्रकाराची महापौर क्रीडा स्पर्धा. उदा.कॅरम, बुध्दीबळ, बॉक्सींग, रायफल शुटींग, शरीरसौष्ठव, वेटलिफ्टींग, जलतरण, लॉनटेनिस, बॅडमिंटन, कुस्ती इ. | १,००,००० | २,००,००० | ५,००,००० |
| २ | सांघिक खेळ प्रकाराच्या महापौर चषक उदा.कबड्डी, फुटबॉल, खोखो, शुटींग बॉल, हॉलीबॉल, क्रिकेट, सॉफ्टबॉल, हॅण्डबॉल, हॉकी इ. | ५,००,००० | १०,००,००० | १५,००,००० |

9. महापौर चषक जिल्हा, राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तर क्रीडा स्पर्धा आयोजनाबाबत स्पर्धेचा खर्च क्रीडा संघटना / खाजगी संस्था यांना अदा करणेबाबत अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहतील.
   1. स्थानिक मंडळ अथवा संस्था, महापौर चषक जिल्हा/राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा घेण्यास तयार होईल अशा संस्थेची धर्मादाय आयुक्त यांचेकडे नोंदणी झालेली असणे आवश्यक आहे.
   2. महापौर चषक जिल्हा/राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा आयोजनाकामी स्पर्धेचा खर्च ज्या क्रीडा संघटनेच्या नावाने अदा करावयाचा आहे. अशा संघटनेने नोंदणी प्रमाणपत्र, घटना व नियमावली सदर स्पर्धा आयोजनाबाबत संबंधित क्रीडा संघटनेचे मान्यतापत्र या कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक आहे.
   3. "महापौर चषक राज्यस्तर क्रीडा स्पर्धा आयोजित करावयाची झाल्यास, महाराष्ट्र राज्य संबंधित क्रीडा संघटना ही, महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनशी संलग्न असणे बंधनकारक आहे. तसेच महापौर चषक जिल्हास्तर क्रीडा स्पर्धा आयोजित करावयाची झाल्यास, पुणे जिल्हा संबंधित क्रीडा संघटना ही त्या महाराष्ट्र राज्य संबंधित क्रीडा संघटनेशी संलग्न असणे आवश्यक आहे व सदर राज्य क्रीडा संघटना महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनशी संलग्न असणे आवश्यक आहे"
   4. महापौर चषक जिल्हा/राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा अनुषंगाने संबंधित क्रीडा संघटनेस स्पर्धा खर्च दयावयाचे निश्चित झाल्यानंतर सदर स्पर्धा क्रीडा संघटनेने स्वत: पार पाडावयाची आहे. याकामी लागणारा कर्मचारी वर्ग संबंधित क्रीडा संघटनेने स्वत: नेमावयाचा आहे. याकामी म.न.पा.कडून कोणत्याही प्रकारचा अधिकारी व कर्मचारी वर्ग नियुक्त केला जाणार नाही. परंतु स्पर्धा अनुषंगाने स्थापत्य, विद्युत विषयक कामे स्टेज मंडप, टेबल-खुर्च्या, विद्युत स्पीकर, माईक

व्यवस्था इ. कामे म.न.पा.चे कार्यकारी अभियंता संबंधित विभाग, संबंधित प्रभाग यांचे पर्यवेक्षणाखाली करणे बंधनकारक राहील.

5. महापौर चषक जिल्हा/राज्यस्तर/राष्ट्रीयस्तर क्रीडा स्पर्धा अनुषंगाने संबंधित क्रीडा संघटनेने निमंत्रण पत्रिका, फ्लेक्स बॅनर्स, ट्रॉफीज, स्मृतिचिन्हे इ. वरील तपशिल जनसंपर्क विभागा मार्फत मा.महापौर/मा.आयुक्त यांची मान्यता घेऊन अंतिम निर्णय घेणे.

6. महापौर चषक जिल्हा/राज्यस्तर/राष्ट्रीयस्तर क्रीडा स्पर्धा अनुषंगाने ट्रॉफीज, स्मृतिचिन्हे इ. वर मा.महापौर/मा.आयुक्त/मा.सभापती, क्रीडा समिती यांची नावे प्रदर्शित करणे संबंधित क्रीडा संघटनेवर बंधकारक राहिल.

7. महापौर चषक जिल्हा, राज्यस्तर, राष्ट्रीयस्तर क्रीडा स्पर्धा अनुषंगाने संबंधित क्रीडा संघटनेने स्पर्धेपुर्वी मंजूर स्पर्धा खर्चाच्या ७५ टक्के आगाऊ रक्कम संघटनेच्या नावाने दिली जाईल. स्पर्धा संपल्यानंतर मंजूर स्पर्धा खर्चाची विहित नमून्यातील बिले प्राप्त झाल्यानंतर उर्वरीत २५ टक्के रक्कम अदा करणेची कार्यवाही केली जाईल. याकामी बिले आवश्यक त्या विहित नमून्यात क्रीडा विभागाकडे द्यावीत.

8. पंच, पदाधिकारी प्रवास, दैनिक भत्ता, मानधन, खेळाडू प्रवास व दैनिक भत्ता इ. खर्च. म.न.पा.कडून संबंधित क्रीडा संघटनेस/खाजगी संस्थेस अदा करणेची कार्यवाही करेल. याकामी संघटनेने विहित नमून्यात करारनामा करून द्यावा लागेल.

9. महापौर चषक जिल्हा/राज्यस्तर/राष्ट्रीयस्तर क्रीडा स्पर्धा अनुषंगाने प्रथम मा.सभापती, क्रीडा समिती, मा.महापौर यांना संबंधित क्रीडा संघटनेने पत्र देणे आवश्यक आहे. स्पर्धा आयोजना बाबत मा.महापौर यांनी मान्यता दिल्यानंतर त्यास क्रीडा समिती, मा.स्थायी समिती सभेची मान्यता मिळालेनंतर महापौर चषक जिल्हा, राज्यस्तर, राष्ट्रीयस्तर क्रीडा स्पर्धा आयोजना बाबत अथवा स्पर्धा खर्च आगाऊ स्वरूपात देणे बाबतची कार्यवाही केली जाईल. यास सक्षम समिती सभेची मान्यता न मिळालेस अशा प्रकारची स्पर्धा आयोजित केली जाणार नाही.

10. महापौर चषक जिल्हा/राज्य/राष्ट्रीयस्तर क्रीडा स्पर्धा अनुषंगाने, स्पर्धा खर्च आगाऊ स्वरूपात द्यावयाचा निश्चित झालेनंतर म.न.पा.कडून कोणत्याही प्रकारचा खर्च केला जाणार नाही. उदा.पत्रकार परिषद खर्च, स्पर्धा अनुषंगाने क्रीडा साहित्य खरेदी, निमंत्रणपत्रिका, प्रमाणपत्र छपाई खर्च,पंच,पदाधिकारी खेळाडू, यांचा चहापान, अल्पोपहार-भोजन खर्च, ट्रॉफीज, स्मृतिचिन्हे खरेदी, स्पर्धा अनुषंगाने वाहतूक, पंच मानधन, प्रवास भत्ता, खेळाडू दैनिक भत्ता, प्रवास भत्ता खर्च इ. प्रकारचा खर्च दिला जाणार नाही.

11. महापौर चषक जिल्हा/राज्य/राष्ट्रीयस्तर क्रीडा स्पर्धा अनुषंगाने, स्पर्धा खर्च आगाऊ स्वरूपात द्यावयाचा निश्चित झालेनंतर म.न.पा.कडून स्पर्धा कामकाजासाठी वाहने पुरविली जाणार नाहीत. स्पर्धा अनुषंगाने , प्रेसनोट, रिझल्ट, संबंधित क्रीडा संघटनेने तयार करून म.न.पा.चे जनसंपर्क विभाग अथवा संबंधित वृत्तपत्र कार्यालय येथे स्वत: पोहोच करणे बंधनकारक राहिल.

12.महापौर चषक जिल्हा/राज्य/राष्ट्रीयस्तर क्रीडा स्पर्धा अनुषंगाने, स्पर्धा खर्च आगाऊ स्वरूपात दिल्यानंतर स्पर्धेचा खर्च विहित नमून्यात देताना स्पर्धेत सहभागी झालेले संघ, खेळाडूं यांची नावे, दुरध्वनी क्रमांक इ.यादी, स्पर्धेचा दैनंदिन निकाल, अंतिम निकाल, स्पर्धा खर्चाचे बिलामागे विहित नमून्यात दाखले लिहून, खर्चाची बिले मुदतीत (स्पर्धा संपताच १५ दिवसांचे आत) सादर करणे संबंधित क्रीडा संघटनेवर बंधनकारक राहिल.

13.महापौर चषक जिल्हा/राज्य/राष्ट्रीयस्तर क्रीडा स्पर्धा अनुषंगाने, स्पर्धा खर्च आगाऊ स्वरूपात संबंधित संघटनेस दिल्यानंतर स्पर्धा काळात, स्पर्धा ठिकाणी काही अनुचित प्रकार घडलेस, खेळाडू, संघ, नागरिक यांचेमध्ये वाद विवाद, भांडन तंटा झालेस तो सोडविणेची जबाबदारी संबंधित क्रीडा संघटनेची राहिल यामध्ये म.न.पा.चा प्रत्यक्षात काहीही एक संबंध राहणार नाही.

14.महापौर चषक जिल्हा/राज्य/राष्ट्रीयस्तर क्रीडा स्पर्धा अनुषंगाने, स्पर्धा खर्च आगाऊ स्वरूपात संबंधित संघटनेस द्यावयाचे निश्चित झालेनंतर मा.पदाधिकारी, नगरसदस्य, अधिकारी यांना स्पर्धेच्या निमंत्रणपत्रिका वितरीत करण्याची कार्यवाही जनसंपर्क विभाग, संबंधित प्रभाग यांचेकडून केली जाईल. परंतू स्पर्धा उदघाटन, समारोप पुर्वी २ दिवस अगोदर विहित नमून्यातील निमंत्रणपत्रिका संबंधित क्रीडा संघटनेने संबंधित कार्यालयात पोहोच करणे गरजेचे आहे.

15.महापौर चषक जिल्हा, राज्य, राष्ट्रीयस्तर क्रीडा स्पर्धा अनुषंगाने, क्रीडा संघटनेने मागणी केलेस वैद्यकीय पथकासह ॲम्ब्युलन्सची व्यवस्था, सुरक्षा व्यवस्था, उद्यान विभागाकडून आवश्यक त्या कुंडया पुरविणेची व्यवस्था केली जाईल परंतू याकामी संबंधित विभागाकडे स्पर्धेपुर्वी ७ दिवस अगोदर लेखी अर्ज संबंधित संस्थेने केला पाहिजे. या सुविधांबाबत म.न.पा.कडून नियमानुसार शुल्क आकारले जाईल. सदर शुल्क म.न.पा.कडे भरणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहिल.

16.महापौर चषक जिल्हा/राज्य/राष्ट्रीयस्तर क्रीडा स्पर्धा अनुषंगाने, पंच खेळाडू यासाठी निवास व्यवस्था योग्य प्रकारे करणे आवश्यक आहे. याकामी पिण्याचे पाणी, अंघोळीची पाणी,गाद्या,उश्या,चादरी,मग,बादली,भोजन व्यवस्था इ. आवश्यक त्या प्रमाणात पुरविणेची जबाबदारी संबंधित संघटनेचे राहिल. याकामी खेळाडू, पंच, पाहूणे यांनी पिंपरी चिंचवड शहराचे नाव चांगल्या प्रकारे घेतले जाईल याची दक्षता घ्यावी.

17.महापौर चषक जिल्हा/राज्य/राष्ट्रीयस्तर क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेली संघ यादी (खेळाडू, संघ व्यवस्थापक, मार्गदर्शक नावांसह) स्पर्धेचे लॉट्स, दैनंदिन निकाल, अंतिम निकाल इ. कागदपत्रे क्रीडा संघटना पदाधिका-यांच्या स्वाक्षरीने स्पर्धा संपल्यानंतर क्रीडा विभागाकडे देणे बंधनकारक राहिल.

18.महापौर चषक जिल्हा/राज्य/राष्ट्रीयस्तर क्रीडा स्पर्धेसाठी एकूण छापलेली प्रमाणपत्रे, स्पर्धा खेळाडूंना प्रमाणपत्रे वितरीत केले बाबत खेळाडूंची स्वाक्षरी सह विहित नमून्यात तपशिल देणे बंधनकारक राहिल.

19.महापौर चषक स्पर्धा जी संस्था/संघटना घेईल त्यांना रक्कम दिलेनंतर जर महानगरपालिकेच्या इतर सेवा सुविधा हव्या असतील तर त्यासाठी लागणारे शुल्क त्या संस्था/संघटनेला म.न.पा.स अदा करावे लागेल.

20.म.न.पाच्या वतीने अयोजित केल्या जाणा-या महापौर चषक क्रीडा स्पर्धाचा स्तर स्पर्धा संख्या ठरविणे आवश्यक आहे. एक आर्थिक वर्षात एक राज्यस्तर, ५ जिल्हास्तर महापौर चषक विविध स्पर्धा आयोजित करण्यात यावा स्थानिक खेळांना प्राधान्य देण्यात यावे राष्ट्रीय स्पर्धा खेळाच्या रोटेशन प्रमाणे घेण्यात याव्यात.

**६) शासकीय,निमशासकीय सहकारी संस्था,औद्योगिक प्रतिष्ठानांमधील कर्मचा-यांसाठी क्रीडा स्पर्धाचे आयोजन.**

देशाच्या व राज्याच्या विकासाच्या प्रक्रियेमध्ये आरोग्य संपन्न मनुष्यबळ प्रत्यक्ष /अप्रत्यक्षरित्या परिणाम करत असतो. राज्यातील प्रत्येक नागरिक सुदृढ होण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. आबालवृध्द नागरिकांमध्ये आरोग्य संपन्न जीवनाचे महत्व बिंबविण्यासाठी सर्वांगीण विकास साधण्याकरीता क्रीडा स्पर्धा व खेळ यांचे महत्व अनन्यसाधारण आहे. शासकीय, निमशासकीय विभाग, साखर कारखाने, सहकारी संस्था, सूत गिरण्या, महामंडळे औद्योगिक प्रतिष्ठाने याठिकाणी कार्यरत कर्मचा-यांसाठी विविध क्रीडा स्पर्धाचे आयोजन क्रीडा विभागामार्फत करण्यात यावे. कर्मचा-यांची शारीरीक तंदुरूस्ती व कार्यक्षमता वाढीस लागून उत्पादकता वाढीस लागेल. याकामी म.न.पा. परिसरातील कारखाने, कंपन्या, औद्योगिक संस्था यांनी ही स्पर्धा खर्च करण्यासाठी प्रायोजकत्त्व स्विकारणे आवश्यक आहे. स्पर्धा अनुषंगाने त्यांचे अधिकारी व कर्मचारी यांचे सहकार्य व सहभाग असणे आवश्यक आहे.

## भाग-१ – क - खेळाडूंसाठी दिल्या जाणा-या क्रीडा सुविधा

**१) म.न.पा. परिसरातील क्रीडा सुविधांचा खेळाडूंना लाभ देणे.**

म.न.पा. परिसरातील म.न.पा.शालेय विद्यार्थ्यांना सर्व क्रीडा सुविधांचा लाभ मोफत दरात घेता येईल. तसेच खाजगी शाळेच्या मुख्याध्यापकांनी क्रीडा विभागाकडे अर्ज केल्यानंतर सदर अर्जावर आवश्यक ती मान्यता घेऊन क्रीडा सुविधांचा लाभ खाजगी शालेय विद्यार्थ्यांना म.न.पा. ठरविलेल्या सवलतीच्या दरात घेता येईल.

क्रीडा सुविधांचा खेळाडूंना लाभ होण्याच्या दृष्टीने पुढील अटी व नियम राहतील.

1. म.न.पा परिसरातील म.न.पा. शालेय विद्यार्थ्यांना सर्व क्रीडा सुविधांचा लाभ सवलतीच्या दरात घेता येईल. याकरिता प्राथमिक व माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापकांनी क्रीडा विभागाकडे रितसर अर्ज करून परवानगी घेणे आवश्यक आहे.
2. खाजगी शाळेच्या मुख्याधापकांनी क्रीडा विभागाकडे अर्ज करावा. सदर अर्जावर आवश्यक ती मान्यता घेऊन आदेश काढल्यानंतरच क्रीडा सुविधांचा लाभ म.न.पा. शालेय विद्यार्थ्यांना सवलतीच्या दरात घेता येईल.
3. खाजगी शाळा, कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना म.न.पा क्रीडा सुविधांचा लाभ घेण्यासाठी म.न.पा.ने ठरवून दिलेले शुल्क भरावे लागेल. याकामी खाजगी शाळेच्या मुख्याधापकांनी रितसर अर्ज करणे आवश्यक आहे.
4. म.न.पा. परिसरातील राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना ओळखपत्र देऊन शहरातील क्रीडा सुविधांचा विनामुल्य उपलब्ध करून देण्यात येतील.

**२) खेळाडूंना सवलतीच्या दरात वैद्यकीय उपचार देणे.**

**उद्दिष्टे -** खेळाडूंना त्यांचेकडे असलेले कौशल्य क्षमता यामध्ये वाढ करण्यासाठी सातत्याने स्पर्धा, प्रशिक्षण शिबिरे तसेच सराव करतेवेळी अपघात/इजा झाल्यास सवलतीच्या दरात वैद्यकीय उपचार देणे याचा समावेश यात केला आहे. जेणेकरून खेळाडूला भविष्यकाळ सुरक्षित राहण्यास मदत होईल हे विचारात घेऊन अपघातग्रस्त खेळाडूंना म.न.पा.कडून सवलतीच्या दरात वैद्यकीय उपचारासाठी सवलत देण्यात येईल.

**अटी व नियम -**

१) शासकीय जिल्हास्तर, राज्यस्तर, राष्ट्रीयस्तरावर शालेय क्रीडा स्पर्धा व २८ वर्षांचे आतील वरिष्ठ खेळाडूंच्या नामांकित स्पर्धेत सहभागी होणारे खेळाडू यांना वैद्यकिय उपचार सवलतीच्या दरांत देण्यात येईल

२) एकविध क्रीडा संघटनाद्वारे आयोजित होणा-या जिल्हा, राज्य व राष्ट्रीयस्तरावर स्पर्धेत सहभागी होणारे खेळाडू यांना वैद्यकिय उपचार सवलतीच्या दरांत देण्यात येईल

३) माजी नामवंत राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडूंवर सुध्दा म.न.पा.कडून सवलतीच्या दरात उपचार करण्यात येतील.

४) पिंपरी चिंचवड मध्ये क्रीडा कुल व स्पोट्र्स मेडिसिन सेंटर वाय.सी.एम.हॉस्पीटलच्या अधिपत्याखाली भविष्यात सुरू करण्यात येईल.

५) म.न.पा. कडे असलेल्या वैद्यकीय सेवा सवलतीच्या दरात दिल्या जातील. तसेच तज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार उपचार केले जातील.

**३) क्रीडा विकासात स्वयंसेवी संस्थाचा सहभाग वाढविणे -**

क्रीडा विकासात स्वयंसेवी संस्थाचा सहभाग वाढविण्यासाठी राज्यात आयोजित होणा-या विविध स्पर्धांना प्रोत्साहन व उत्तेजन मिळावे या हेतूने औद्योगिक प्रतिष्ठाने, सहकारी संस्था, कारखाने, बँका, महामंडळे, वाणिज्यिक प्रतिष्ठाने यांनी क्रीडा विकासात काम करणा-या मान्यताप्राप्त स्वयंसेवी संस्थाना प्रायोजकाला देऊन आंतरराष्ट्रीय खेळाडू घडविण्यासाठी सहाय्य करणे, क्रीडा साहित्य आयात करून पुरविणे, खेळाडूंच्या परदेशी प्रशिक्षणाचा खर्च करणे अपेक्षित आहे. क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी प्रायोजकत्व देऊन नागरिकांचा सहभाग वाढविणेकामी जास्तीत जास्त प्रयत्न करण्यात येतील.

## भाग-१ – ड - शिष्यवृत्ती

**१) म.न.पा. परिसरातील विद्यार्थी खेळाडूंसाठी शालेय क्रीडा शिष्यवृत्ती योजना.**

शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी व संघटनेमार्फत खेळणा-या खेळाडूंना प्रोत्साहन मिळून म.न.पा. परिसरातील जास्तीत जास्त राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू तयार होण्याच्या दृष्टीने राज्यस्तर खेळाडूस र.रू.३,०००, राष्ट्रीयस्तर खेळाडूस र.रू.५,००० ही क्रीडा शिष्यवृत्ती देण्यात येत आहे. त्या क्रीडा शिष्यवृत्तीत दर ३ वर्षानी १०% वाढ करण्यात येईल. याकामी सक्षम समितीची मान्यता घेण्यात येईल.

1. क्रीडा शिष्यवृत्ती ही पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रहिवासी विद्यार्थी खेळाडूंसाठी देण्यात येईल. त्यासाठी पुरावा म्हणुन आवश्यक कागदपत्रे, (उदा. आधारकार्ड रेशनिंग कार्डची सत्यप्रत) सादर करणे आवश्यक आहे. विद्यार्थी खेळाडू हा महापालिका हद्दीतील रहिवासी असेल व शिक्षणासाठी हद्दीबाहेरील शैक्षणिक संस्थेत शिक्षण घेत असल्यास तो क्रीडा शिष्यवृत्तीसाठी पात्र राहील.
2. महाराष्ट्र शासन, क्रीडा व युवक सेवा संचालनालय यांचे तर्फे आयोजित राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या SSC Board, CBSC Board व अंध, अपंग शालेय विद्यार्थी खेळाडूस वार्षिक र.रू.३,००० तसेच इंटर युनिव्हरसिटी, आंतरविद्यापीठ (राष्ट्रीय) स्तरावर सहभागी झालेल्या विद्यार्थी खेळाडूंस वार्षिक र.रू.५,००० शिष्यवृत्ती देण्यात येईल.
3. राष्ट्रीयस्तर शालेय क्रीडा स्पर्धा (नॅशनल स्कूल गेम/स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडिया) तर्फे आयोजित राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थी खेळाडूस वार्षिक र.रू.५,००० क्रीडा शिष्यवृत्ती देण्यात येईल.
4. क्रीडा मंडळे, संस्था, निमशासकीय संस्था यांनी आयोजित केलेल्या स्पर्धामधील प्रमाणपत्रे क्रीडा शिष्यवृत्तीसाठी ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.
5. क्रीडा शिष्यवृत्ती ही ज्या वर्षी प्राविण्य मिळविले आहे, त्या वर्षापुरतीच मर्यादित राहील. ती कायम स्वरूपाची देय राहणार नाही.
6. क्रीडा शिष्यवृत्ती मिळणेकामी दिलेल्या मुदतीत विहित नमुन्यात आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करणे आवश्यक आहे.
7. अपुर्ण माहिती भरलेला अर्ज तसेच संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांचे मार्फत न पाठविलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.
8. फक्त गतवर्षीची क्रीडा शिष्यवृत्ती चालू आर्थिक वर्षात अदा केली जाईल.
9. क्रीडा शिष्यवृत्ती मिळणेकामी विद्यार्थी खेळाडूने महापालिका क्षेत्रात रहिवासी असलेचा पुरावा गतवर्षीच्या खेळाचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र व गतवर्षी उत्तीर्ण झालेचे गुणपत्रक विहित नमुन्यातील अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.
10. अर्जामध्ये दिलेली माहिती चुकीची आढळल्यास क्रीडा शिष्यवृत्ती देण्यात येणार नाही.
11. क्रीडा शिष्यवृत्तीचा वापर क्रीडा विकासासाठी करणे आवश्यक आहे.
12. क्रीडा शिष्यवृत्ती मिळणेबाबत विद्यार्थी खेळाडूंस हक्क सांगता येणार नाही.

13. विद्यार्थी खेळाडू हा गतवर्षी उत्तीर्ण झालेला असावा. तसेच तो चालू वर्षात शिक्षण घेत असावा.
14. क्रीडा शिष्यवृत्तीचे अर्ज हे विद्यार्थ्यांना मोफत देण्यात येतील.
15. क्रीडा शिष्यवृत्ती अर्जाचे वाटप व स्विकृत्ती दि.१ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट (सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधीत करण्यात येईल. तथापि यामध्ये बदल करण्याचा अधिकार मा.महापालिका, आयुक्त यांना राहील.
16. विविध खेळात प्राविण्य मिळविले तरी क्रीडा शिष्यवृत्ती एकदाच देय्य राहील.
17. क्रीडा शिष्यवृत्ती मंजुर अथवा नामंजूर करण्याचा अधिकारी मा. महापालिका आयुक्त यांना राहील.
18. क्रीडा शिष्यवृत्तीच्या धोरण, नियम व अटीमध्ये बदल करण्याचा अथवा वाढ किंवा घट करण्याचा अथवा शिथिल करण्याचा अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना राहील.

**२) राष्ट्रीय व आतंरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व वयोगटातील खेळाडूंना आर्थिक सहाय्य अथवा क्रीडा शिष्यवृत्ती अदा करणे बाबतचे धोरण**

मा.महापालिका ठराव क्र.१०८३ दि.१८/०२/२०११ अन्वये राष्ट्रकुल/एशियन/ ऑलिपिंक सहभागी झालेल्या खुल्या वरिष्ठ गंटातील खेळाडूंना क्रीडा शिष्यवृत्ती अदा करण्यात येईल तसेच “राष्ट्रीय व आतंरराष्ट्रीय खेळाडूंना अर्थसहाय्य” हे लेखाशिर्ष सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षापासून नव्याने सुरू करुन सदर लेखाशिर्षावर तरतुद र.रु १०,००,००० उपलब्ध करुन देणेची शिफारस करणेत आली आहे. त्यामध्ये प्रपत्र अ-६ मधील अ.क्र.३ तसेच आतंरराष्ट्रीय स्पर्धा व अ.क्र.४ स्पर्धा प्रकारामध्ये SAF (सॅफ गेम) Winter Olympic या स्पर्धांचा समावेश करणेची दुरूस्ती करून, त्या दुरूस्तीसह त्याप्रमाणे त्यास मान्यता देण्यात यावी अशी शिफारस करणेत आली आहे. त्यामध्ये योगासन व मल्लखांब या खेळांचा समावेश करण्यात यावा, राष्ट्रीय किंवा आतंरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत ज्या स्पर्धकांची निवड होईल व जे पिंपरी चिंचवड म.न.पा.मधील ५ वर्षे रहिवासी असतील, अशा स्पर्धकांचा व म.न.पा.च्या क्रीडा प्रबोधिनीतील विद्यार्थ्यांपैकी ज्यांची स्पर्धेत निवड होईल अशा विद्यार्थ्यांचा सर्व खर्च म.न.पा. तर्फे करणेची, १ जुन ते ३० जुन व १ डिसेंबर ते ३१ डिसेंबर या महिन्यामध्ये निम्या निम्या रकमेचे वाटप करणेची दुरूस्ती करून त्यासह त्याप्रमाणे मान्यता दिलेली आहे. यामध्ये Winter Olympic वगळून कार्यवाही करावी.

**अटी व नियम –**

1. पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतीलच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेमध्ये सहभाग व प्राविण्य मिळविलेल्या खुल्या वरिष्ठ खेळाडूंना आर्थिक सहाय्य व क्रीडा शिष्यवृत्तीचा लाभ घेता येईल.
2. आर्थिक सहाय्यासाठी अर्जदार हे पिंपरी चिंचवड म.न.पा. हद्दीतील किमान ५ वर्षे रहिवासी असणे आवश्यक आहे. याबाबत अर्जा सोबत वास्तव्याचे पुरावे सादर करणे आवश्यक आहे. (उदा.आधार कार्ड, रेशनिंग कार्ड सत्यप्रत)

3. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खुल्या वरिष्ठ गटातील खेळाडूंना आर्थिक सहाय्य अथवा क्रीडा शिष्यवृत्ती याचा लाभ घेण्यासाठी, त्याने विहित नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक आहे. संपुर्ण माहिती भरलेला अर्ज संबंधित राज्य/राष्ट्रीय स्तरावरील खेळ संघटने मार्फत पाठविणे आवश्यक आहे. संबंधित संघटने मार्फत अर्ज न आल्यास त्याचा विचार केला जाणार नाही.
4. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खुल्या वरिष्ठ गटातील खेळाडूंना आर्थिक सहाय्य अथवा क्रीडा शिष्यवृत्ती यासाठी संबंधित खेळ संघटनेचे प्रमाणपत्र, मेडल्स यांचे मूळ प्रती दाखवून त्याची झेरॉक्स प्रत सत्यप्रत करून सादर करणे आवश्यक आहे.
5. अर्जामध्ये दिलेली माहिती चुकीची आढळल्यास आर्थिक सहाय्य दिले जाणार नाही. फसवणूक करून आर्थिक सहाय्य अथवा क्रीडा शिष्यवृत्ती घेतल्यास ती कायदेशिर कारवाई करून वसूल केली जाईल.
6. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडूंना आर्थिक सहाय्य अथवा क्रीडा शिष्यवृत्ती हे ज्या वर्षी प्राविण्य मिळविलेले आहे. त्या वर्षी अथवा त्याच्या पुढच्या वर्षीपुरती मर्यादित राहिल. ती एकदाच मिळेल कायम स्वरूपाचे आर्थिक सहाय्य देय्य राहणार नाही.
7. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खुल्या वरिष्ठ गटातील खेळाडूंना आर्थिक सहाय्य अथवा क्रीडा शिष्यवृत्ती खालील प्रमाणे राहिल.

| अ.क्र. | स्पर्धा प्रकार | द्यावयाचे आर्थिक सहाय्य | | | द्यावयाची क्रीडा शिष्यवृत्ती र.रू. |
|---|---|---|---|---|---|
| | | सुवर्ण पदक | रौप्य पदक | कांस्य पदक | |
| 1 | ऑलिंपिक/विंटर ऑलिंपिक पदक विजेता खेळाडू, जागतिक अजिंक्यपद क्रीडा स्पर्धा पदक विजेत्या खेळाडू | 3,00,000 | 2,00,000 | 1,00,000 | --- |
| 2 | आतंरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा पदक विजेता (राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा, आशियाई क्रीडा स्पर्धा/एशियन विंटर चँम्पिअनशिप ) | 2,00,000 | 1,00,000 | 50,000 | --- |
| 3 | राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा पदक विजेता (संबधित क्रीडा संघटने मार्फत घेतल्या जाणाऱ्या वार्षिक राष्ट्रीय अजिंक्यपद क्रीडा स्पर्धा विजेता खेळाडू) | 1,00,000 | 50,000 | 30,000 | --- |
| 4 | आतंरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, जागतिक अजिंक्यपद क्रीडा स्पर्धा सहभागी खेळाडू (ऑलिंपिक राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा, आशियाई क्रीडा स्पर्धा) | --- | --- | --- | 20,000 |
| 5 | राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, राष्ट्रीय अजिंक्यपद क्रीडा स्पर्धा सहभागी खेळाडू (संबधित क्रीडा संघटनेमार्फत घेतल्या जाणाऱ्या वार्षिक राष्ट्रीय अजिंक्यपद क्रीडा स्पर्धा) | --- | --- | --- | 10,000 |

8. आतंरराष्ट्रीय जागतिक मानांकन क्रीडा स्पर्धेत प्राविण्य मिळविलेल्या खेळाडूंनी संबंधित क्रीडा संघटने मार्फत अर्ज केल्यास, अशा खेळाडूंनाही वरील प्रमाणे आर्थिक सहाय्य देय राहिल.(उदा.बॅडमिंटन, लॉन टेनिस,बुध्दिबळ इ.)
9. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खुल्या वरिष्ठ गटातील खेळाडूंना आर्थिक सहाय्य अथवा क्रीडा शिष्यवृत्तीअदा करणे बाबतचा विहित नमून्यातील अर्ज म.न.पा.संकेत स्थळावरून उपलब्द करून घेतायेईल
10. विविध खेळात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खुला वरिष्ठ गटातील खेळाडू म्हणून प्राविण्य मिळविले तरी एका आर्थिक वर्षात एकदाच आर्थिक सहाय्य अथवा क्रीडा शिष्यवृत्ती देय्य राहिल.
11. वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करून, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खुल्या वरिष्ठ गटातील खेळाडूंना आर्थिक सहाय्य अथवा क्रीडा शिष्यवृत्ती बाबतचे अर्ज वाटप व स्वीकृती दिनांक-1 ते 31 डिसेंबर (सार्व.सुट्टी, साप्ता.सुट्टी वगळून) कार्यालयीन कामाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत सकाळी 10.00 ते 5.45 या वेळेत केले जाईल. तथापि या कालावधीत व वेळेत बदल करण्याचा वा मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेने थेट आर्थिक सहाय्य देणेचा अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना राहिल.
12. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खुल्या वरिष्ठ गटातील खेळाडूंना आर्थिक सहाय्य अथवा क्रीडा शिष्यवृत्ती या बाबतचे धोरण, नियम, अटी - शर्तीमध्ये बदल करणे अथवा वाढ करणे अथवा शिथिल अथवा आर्थिक सहाय्य,क्रीडा शिष्यवृत्ती नामंजूर करणे इ. नियमातील बदल शासन मान्यतेनंतर अमंलात आणण्यात येतील.
13. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खुल्या वरिष्ठ गटातील खेळाडूंना आर्थिक सहाय्य अथवा क्रीडा शिष्यवृत्ती घेणेपुर्वी संबंधित खेळाडूने र.रू.100 च्या स्टॅम्प पेपरवर विहित नमून्यात करारनामा करून द्यावा लागेल.
14. ऑलिंपिक स्पर्धा, जागतिक अजिंक्यपद क्रीडा स्पर्धेत सांघिक संघास विजेतेपद मिळालेस, त्या संघात पिंपरी चिंचवड शहरातील खेळाडूंनी प्रतिनिधित्व केल्यास, अशा खेळाडूस आर्थिक सहाय्य अथवा क्रीडा शिष्यवृत्ती देय राहिल.
15. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, राष्ट्रीय अजिंक्यपद क्रीडा स्पर्धेत सांघिक संघास विजेतेपद मिळालेस, त्या संघात पिंपरी चिंचवड शहरातील खेळाडूंनी प्रतिनिधित्व केल्यास, अशा खेळाडूस आर्थिक सहाय्य,क्रीडा शिष्यवृत्ती देय राहिल.
16. ऑलपिक स्पर्धा, आशियाई क्रीडा स्पर्धा व राष्ट्रकूल क्रीडा स्पर्धा या स्पर्धेत खेळल्या जाणाऱ्या खेळ प्रकारासाठीच सदर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खुल्या वरिष्ठ गटातील खेळाडूंना आर्थिक सहाय्य अथवा क्रीडा शिष्यवृत्ती देय्य राहिल.
17. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन यांनी मान्यता दिलेल्या पैकी खालील खेळामधील तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खुल्या वरिष्ठ गटातील खेळाडूंना आर्थिक सहाय्य अथवा क्रीडा शिष्यवृत्ती देय्य राहिल. शासन मान्यते व्यतिरिक्त देशी/विदेशी खेळांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खुल्या खेळाडूंना आर्थिक सहाय्य अथवा क्रीडा शिष्यवृत्ती देय्य राहणार नाही.

| अ.क्र. | खेळाचे नाव | अ.क्र. | खेळाचे नाव |
|---|---|---|---|
| 1 | टेबल टेनिस | 16 | जलतरण |
| 2 | बॉल बॅडमिंटन | 17 | थ्रो बॉल |
| 3 | लॉन टेनिस | 18 | व्हॉलिबॉल |
| 4 | कॅरम | 19 | कुस्ती |
| 5 | धर्नुविद्या | 20 | मैदानी स्पर्धा |
| 6 | नेटबॉल | 21 | जिम्नॅस्टिक |
| 7 | शुटिंग(नेमबाजी) | 22 | सायकलिंग |
| 8 | हॉकी | 23 | बास्केटबॉल |
| 9 | बॅडमिंटन | 24 | बुध्दिबळ |
| 10 | खो-खो | 25 | हॅण्डबॉल |
| 11 | फेन्सिंग (तलवारबाजी) | 26 | ज्युदो |
| 12 | सॉफ्टबॉल | 27 | फुटबॉल |
| 13 | बेसबॉल | 28 | बॉडी बिल्डिंग |
| 14 | बॉक्सिंग | 29 | कबड्डी |
| 15 | वेटलिफ्टिंग | 30 | क्रिकेट |

**३) आंतरराष्ट्रीय स्तरावरील सर्व वयोगटातील खेळाडूंना स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आर्थिक सहाय्य करणे.**

म.न.पा. परिसरातील जे खेळाडू एशियन, राष्ट्रकुल, कॉमनवेल्थ ऑलिपिंक अशा नामांकित आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होतात. अशा खेळाडूंना प्रवास खर्चासाठी विमान भाड्याच्या ५०% किंवा किट चार्जेस, प्रवेश शुल्क, निवास, भोजन इ. करीता कमाल रू.२०,००० देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. यामध्ये बदल करून खेळाडूंना प्रवासखर्च, प्रवेश शुल्क, निवास, भोजन इ. खर्चाच्या ७५% किंवा जास्तीत जास्त रू.१,००,००० अर्थसहाय्य देण्यात यावे. तसेच महाराष्ट्र बाहेर होणा-या राष्ट्रीय स्पर्धांसाठी २५,०००/-पेक्षा खर्च असेल तर आर्थिक सहाय्य करावे.

निमंत्रित स्पर्धेसाठी जाणा-या आंतरराष्ट्रीय खेळाडूसाठी सदर आर्थिक सहाय्य देय राहणार नाही. महाराष्ट्र शासन, केंद्र सरकार अथवा पिंपरी चिंचवड म.न.पा. यापैकी एकाच प्राधिकृत संस्थेकडून स्पर्धा प्रवास, निवास, भोजन खर्च देय राहिल. तसेच लेखी पत्र संबंधित राज्य, राष्ट्रीय क्रीडा संघटनेकडून देणे बंधनकारक राहिल.

**नियम व अटी –**

1. पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतीलच शासनाच्या मान्यताप्राप्त आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या खुल्या वरिष्ठ गटातील खेळाडूंना आर्थिक सहाय्य करण्यात येईल.
2. आर्थिक सहाय्यासाठी अर्जदार हे पिंपरी चिंचवड म.न.पा. हद्दीतील किमान 5 वर्षे रहिवासी असणे आवश्यक आहे. याबाबत अर्ज सोबत वास्तव्याचे (आधारकार्ड, रेशन कार्ड) पुरावे सादर करणे आवश्यक आहे.
3. अर्जदारांचे वय २८ वर्षापेक्षा जास्त नसावे.
4. आंतरराष्ट्रीय खुल्या वरिष्ठ गटातील खेळाडूंना आर्थिक सहाय्य याचा लाभ घेण्यासाठी, त्याने विहित नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक आहे.
5. अर्जामध्ये दिलेली माहिती चुकीची आढळल्यास आर्थिक सहाय्य दिले जाणार नाही. फसवणूक करून आर्थिक सहाय्य घेतल्यास कायदेशिर कारवाई करून वसूल केली जाईल
6. आंतरराष्ट्रीय खुल्या वरिष्ठ गटातील खेळाडूंना आर्थिक सहाय्य घेणेपुर्वी संबंधित खेळाडूने र.रू.१०० च्या स्टॅम्प पेपरवर विहित नमून्यात करारनामा करून द्यावा लागेल.
7. सदर आर्थिक सहाय्याचा लाभ महाराष्ट्र शासन अथवा महानगरपालिका एका संस्थेकडूनच घेता येईल याबाबत लेखी द्यावे लागेल.

## भाग-१ – ई – खेळाडू दत्तक योजना

महानगरपालिका कार्यक्षेत्रात क्रीडा विकासाच्या उद्दिष्टासाठी राज्याच्या पहिल्या धोरणात सुचविलेल्या महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील परिपत्रक क्र.जी.ई.एन.१०९८/प्रक-२१/९८ नवी- २४ मंत्रालय मुंबई ४०००३२ दिनांक ९ मार्च, १९९८ च्या शासन निर्णयानुसार दत्तक योजना लागू करण्यात आली आहे. विविध खेळाच्या खेळाडूंना किंवा संघाला दत्तक घेणे इ. बाबीवर खर्च करण्यास मंजूरी दिली आहे.

" महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, परिपत्रक क्र. जी.ई.एन.१०९८/प्रा.क्र.-२१/९८/नवि-२४ मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दि. ९ मार्च १९९८ मध्ये, (दोन) महानगरपालिकांनी/नगरपालिकांनी आपल्या वार्षिक खर्चापैकी विशिष्ट टक्के (५) टक्के खर्च क्रीडा क्षेत्रासाठी करावा असे बंधन असावे असे नमूद आहे. त्यानुसार म.न.पा.ने एकूण वार्षिक खर्चापैकी ५ टक्के खर्च क्रीडा क्षेत्रासाठी करण्यासाठी आवश्यक ती तरतूद करावी, यामधून सर्व प्रकारच्या क्रीडा सुविधा, विविध प्रकारच्या क्रीडा स्पर्धा तसेच क्रीडा सुविधा, क्रीडा स्पर्धांवर होणारा सर्व प्रकारच्या खर्चाचा समावेश असावा," याकरिता अंदाजपत्रकात स्वंतत्र तरतूद करणेत यावी.

**योजनेचे उद्दिष्टे –** या धोरणात खेळाडूंचा दर्जा सुधारणेवर लक्ष केंद्रीत करणेचे उद्दिष्ट असून खेळाडूंना तंत्रशुध्द आवश्यक साहित्य, सुविधा, प्रोत्साहनात्मक मानधन देणेबाबत महापालिका यांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरातील विद्यार्थी खेळाडू मधील उत्कृष्ट खेळाडू तयार करण्याच्या दृष्टीने म.न.पा.च्या वतीने खेळ व संघ दत्तक घेणे ही योजना नव्याने सुरू करणे.

**अटी व नियम –**

1. खेळाडू दत्तक योजनेत सुरवातीस १० खेळ निवडण्यात आले आहेत. क्रिकेट, हॉकी, कबडडी बॅडमिंटन, रायफल शुटिंग, जलतरण, कुस्ती, बॉक्सिंग, मैदानी खेळ, खो-खो,रोलर स्केटिंग या खेळासाठी राबविण्यात यावी.
2. खेळाडू दत्तक योजनेसाठी पिंपरी चिंचवड परिसरातील, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय व ऑल इंडीया युनिव्हर्सिटी खेळाडूंकडून अर्ज दिलेल्या मुदतीत मागविण्यात येईल.
3. सदर खेळाडू म.न.पा. हद्दीतील किमान ५ वर्षे रहिवासी असावा त्याकडे आधारकार्ड, रेशनिंग कार्ड असणे आवश्यक आहे.
4. या खेळाडूंना म.न.पा.कडून संबंधित खेळाचे साहित्य (किट), खेळाडूंना सकस आहार, दुध अथवा ठराविक आहार भत्ता देण्यात यावा. तसेच खेळाडूनी मागणी केलेप्रमाणे क्रीडा साहित्य,क्रीडा साहित्याचे किट, क्रीडा गणवेश इ.पुरविण्यात यावे.
5. दत्तक योजनेसाठी वयाची अट ही २८ वर्षे असावी.
6. या योजने अंतर्गत क्रीडा प्रशिक्षणासाठी येण्या जाण्यासाठी विद्यार्थी खेळाडूंना म.न.पा.कडून पी.एम.पी.एम.एल. मोफत बस पास सुविधा द्यावी.
7. या योजने अंतर्गत राष्ट्रीयस्तर क्रीडा स्पर्धेत सहभागी, प्राविण्य मिळविले नंतर त्यांना म.न.पा. नियमानुसार क्रीडा शिष्यवृत्ती अदा करण्यात येईल.

8. खेळाडू दत्तक योजने करिता राज्यस्तरीय प्रविण्य, राष्ट्रीयस्तर व आंतरराष्ट्रीय स्तरावर सहभाग खेळाडूंचा समावेश करणेत येईल.
9. खेळाडू दत्तक योजनेत राष्ट्रीय स्तर क्रीडा स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंना लाभ देण्याकरिता एक समिती नेमावी, या क्रीडा समितीत खालील प्रमाणे सदस्य नेमावेत.
   - मा.महापौर
   - मा.आयुक्त
   - मा.अतिरिक्त आयुक्त,
   - मा.सभापती, क्रीडा समिती अथवा १ सदस्य,क्रीडा समिती
   - मा.सहाय्यक आयुक्त(क्रीडा),
   - मा.शिक्षणाधिकारी(माध्यमिक शिक्षण)
   - संबंधित खेळाचा अर्जुन पुरस्कारार्थी अथवा शिव छत्रपती पुरस्कारार्थी अथवा माजी आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय खेळाडू इ.यापैकी कोणीही आपल्या शहरात नसेल तर उदयोन्मुख खेळाडूंचा विचार कराताशहराबाहेरील पण आपल्या शहरात येऊन मार्गदर्शन ,ट्रेनिंग देणा-याचा विचार केला जाईल
   - क्रीडा अधिकारी - सदस्य सचिव
   - संबधित खेळाचा क्रीडा पर्यवेक्षक

10. दत्तक योजनेसाठी आलेल्या अर्जावर निर्णय घेऊन निवड करणे व प्रत्यक्ष लाभ देण्याकरिता वरील समिती नेमण्यात आली आहे. समितीचा निर्णय अंतिम राहिल.
11. याकामी फिजिओथेरपी, मानसोपचार व क्रीडा वैद्यक अशा वैद्यकीय सुविधा पुरविणेत येतील.
12. म.न.पा.चे ४ क्रीडा प्रशिक्षण केंद्रामध्ये याकामी सर्व आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत.
    1. कै.अण्णासाहेबमगरस्टेडियम,नेहरूनगर-क्रिकेट/रायफलशुटिंग/बॉक्सिंग/जलतरण/कबड्डी/खो-खो
    2. हॉकी पॉलिग्रास मैदान, नेहरूनगर - हॉकी.
    3. संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल, इंद्रायणीनगर - मैदानी खेळ/बॅडमिंटन
    4. श्री मोरया गोसावी क्रीडांगण, चिंचवड - कुस्ती
13. खेळाडू दत्तक योजनेसाठी साईचे प्रशिक्षक उपलब्ध न झालेस, वरिष्ठ राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय अथवा एन.आय.एस. प्रशिक्षकाची नेमणूक करण्यात येईल.
14. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय व ऑल इंडिया युनिव्हर्सिटी खेळाडूंना क्रीडा शिष्यवृत्ती, खेळाडू दत्तक योजनेचा लाभ देण्यात येईल.
15. म.न.पा. मार्फत ठराविक खेळांची निवड करून, तेच खेळ विकसित करण्यात येतील.
16. खेळाडू दत्तक योजनेत अंध, अपंग, मुकबधीर, मतिमंद यांचेतील राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडूंनाही याचा लाभ देण्यात येईल.
17. खेळाडू दत्तक योजनेचा लाभ घेताना खेळाडूने गैरवर्तन केल्याचे आढळल्यास कोणती ही पूर्वसूचना न देता त्या खेळाडूला दत्तक योजनेतुन वगळण्यात येईल.

18.खेळाडू दत्तक योजने अंतर्गत समितीच्या दर ३ महिन्याने सभा आयोजित केल्या जाव्यात व यात योजनेचा आढावा घेतला जावा..

19.एका खेळाडूंस एका आर्थिक वर्षात क्रीडा शिष्यवत्ती खेळाडू दत्तक योजना अथवा क्रीडा प्रबोधिनी या पैकी एकाच म.न.पा योजनेच्या खेळाडूला लाभ घेता येईल

20.खेळाडू दत्तक योजनेमध्ये अर्जदाराने खोटी माहिती दिल्यास अर्जदाराचा प्रवेश रद्द करणेत येईल व त्यावर म.न.पा. कडून झालेला खर्च व र.रू.१,००० दंड वसूल करणेत येईल.

21.खेळाडू दत्तक योजनेत आवश्यक वाढ किंवा बदल करण्याचा निर्णय मा.आयुक्त यांच्याकडे राहिल.

22.खेळाडू दत्तक योजनेत निवड झालेला खेळाडू जर नोकरी / स्वत: व्यवसाय करत असलेस त्या खेळाडूस दत्तक योजनेचा कोणताही लाभ देता येणार नाही.

23.सलग २ वर्षात प्राविण्य न मिळविलेस सदर खेळाडूस या योजनेचा लाभ घेता येणार नाही

24. खेळाडू दत्तक योजनासाठी, महाराष्ट्र शासन, क्रीडा व युवक सेवा संचालनालय यांचे तर्फे आयोजित राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या SSC बोर्ड, CBSC BOARD, अंध व अपंग शालेय विद्यार्थी तसेच इंटर युनिवर्सिटी, आंतर विद्यापीठ (राष्ट्रीय) स्तरावर सहभागी झालेले खेळाडू तसेच राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा नॅशनल स्कूल गेम/स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडिया तर्फे आयोजित राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडूंनाच लाभ घेता येईल. फेडरेशनमार्फत घेतलेल्या राज्य/राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडूंना याचा लाभ घेता येणार नाही.”.

25. सलग २ वर्षात प्राविण्य न मिळविलेस सदर खेळाडूस या योजनेचा लाभ घेता येणार नाही. खेळाडू दत्तक योजने अंतर्गत खेळाडूंना बाहेरील विविध क्रीडा स्पर्धे साठी पाठविण्यात येईल.त्यांच्या सोबत १ क्रीडा शिक्षक/मार्गदर्शक/प्रशिक्षक पाठविला जाईल त्यांना विभाग,राज्य,राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झालेल्या विद्यार्थी खेळाडूंना /तसेच क्रीडा शिक्षक/मार्गदर्शक/प्रशिक्षक यांना ज्या प्रमाणे प्रवास भत्ता दिला जातो त्याप्रमाणे प्रवास भत्ता देय्य राहील. तसेच दैनिक भत्ताही त्याप्रमाणेच देय्य राहील.

२६ . खेळाडू दत्तक योजने अंतर्गत लाभ घेणा-या खेळाडूंना सर्व प्रकारच्या क्रीडा सुविधा उदा. आहार भत्ता,क्रीडा गणवेश,पी.एम.पी.एम.एल. बस पास या दिल्या जाणार असल्यामुळे त्यांना येथून पुढे ,शालेय क्रीडा शिष्यवृत्तीचा लाभ देता येणार नाही. या मजकुराचा समावेश करावा.

## भाग-१ – फ - क्रीडा प्रशिक्षण केंद्र

१) म.न.पा. परिसरात क्रीडा सुविधा ठिकाणी विविध खेळांचे उन्हाळी, हिवाळी, प्रशिक्षण शिबीर आयोजित करणे.

२)कै.आण्णासाहेब मगर स्टेडियम येथे क्रिकेट मैदान प्रशिक्षण केंद्र सुरू करणे.

**अटी व नियम –**

1. याकामी आवश्यक वयोगटा प्रमाणे म.न.पा. परिसरातील व परिसरा बाहेरील विद्यार्थ्यांची निवड चाचणी घेऊन क्रिकेट प्रशिक्षणार्थींची निवड करणे.
2. यामध्ये म.न.पा. शालेय विद्यार्थ्यांना सवलतीच्या दरात प्रशिक्षण दिले जाईल.
3. खाजगी शाळेतील विद्यार्थ्यांना दरमहा प्रशिक्षण फी र.रू.५०० राहिल.
4. प्रशिक्षणाच्या वेळ मुलांच्या शाळा व कॉलेजच्या वेळ पाहून ठरविण्यात येईल.
5. याकामी आवश्यक क्रीडा साहित्य म.न.पा.कडून पुरविले जाईल.
6. याकामी प्रशिक्षणार्थीने विहीत नमुन्यात अर्ज, मार्गदर्शकाच्या, मुख्याधापकाच्या सहीने सादर करावेत.
7. क्रिकेट प्रशिक्षणार्थीने प्रशिक्षणासाठी स्वत:च्या जबाबदारीवर यावे लागेल.
8. क्रिकेट प्रशिक्षणार्थी यांच्या दर महिन्याला बाहेरील संघ / क्लब यांच्या समवेत वयोगटानुसार सामने ठरविले जातील, या सामन्यांमध्ये प्रशिक्षणार्थीने उपस्थित राहणे बंधनकारक आहे.
9. म.न.पा क्रिकेट प्रशिक्षण केंद्रात जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभाग घेणेकामी क्रिकेट पर्यवेक्षक यांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे.
10. सुरूवातीला १३ वर्षे वयोगटातील पर्यंत वयोगटातील मुले घेऊन त्यांना वर्षभर क्रिकेट प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. पुढे या मुलांना सराव सामने, महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे सामने, इतर होणा-या टुर्नामेंट मध्ये सहभागी करून त्यांना प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. तसेच या परिसरात मुलींचे क्रिकेट प्रशिक्षण केंद्र सुरू करावे.
11. मुलींच्या प्रशिक्षणा करीता क्रीडा मार्गदर्शकाची नेमणूक करण्यात यावी.

**२) साहसी क्रीडा प्रकारांना उत्तेजन देणे -**

महाराष्ट्र शासन क्रीडा धोरण सन २०१२ नुसार म.न.पा.क्रीडा धोरणात साहसी क्रीडा प्रकाराचा समावेश केला आहे. साहसी क्रीडा प्रकार ही काळाची गरज आहे. आपत्कालीन परिस्थितीत यांचा जास्त फायदा होतो. शालेय स्तरावर विद्यार्थ्यांना साहसी क्रीडा प्रकार शिकविणे ही सध्या काळाची गरज आहे व यासाठी म.न.पा.ने क्रीडा धोरणात या साहसी प्रकारांचा समावेश करण्याचे ठरविले आहे.

**उद्दिष्ट्ये -**

**भाग-१** – वॉल क्लायबिंग हा क्रीडा प्रकार शालेय स्तरावर खेळणे तसेच कै.अण्णासाहेब मगर स्टेडीयम येथील क्लायबिंगची दुरूस्ती होऊन त्याचा वापर व्हावा व पिंपरी चिंचवड म.न.पा.चा भौगोलिक परिस्थितीचा विचार करून भविष्यात ६ क्लायबिंग वॉल बांधणे. तो पर्यंत सरावासाठी मोबाईल क्लायबिंगद्वारा प्रशिक्षण सुरू करणे.भविष्यात उपलब्द होणा-या अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार एकूण १० क्लायबिंग वॉल उभारण्यात येतील.स्पर्धा आयोजन, नोकरी समावेश, बस सेवा व पारितोषिक यांचा विचार भविष्यात करण्यात येईल.

**भाग-२ – अँडव्हेंचर पार्क** - अँडव्हेंचर पार्क उभारण्यात यावे, म्हणजे साहसी खेळांचा सुरक्षितपणे आनंद लुटता येईल. याकरीता मुख्यत: एरो स्पोट्‌र्स/वॉटर स्पोट्‌र्स व माऊंटेनिअरींग अँड अलाईड यांचा समावेश व्हावा. या पार्कसाठी योग्य जागा असावी. जेणेकरून नागरिक व खेळाडू या सुविधांचा जास्तीत जास्त वापर करतील. त्यामुळे याचा प्रचार व प्रसार होईल व पालिकेला उत्पन्नही मिळू शकेल याकामी भविष्यात विचार करण्यात येईल.

**भाग-३ – इतर अँडव्हेंचर स्पोट्‌र्स** – स्पर्धात्मक व अस्पर्धात्मक असे वर्गीकरण करून ज्या इव्हेंटच्या स्पर्धा घेणे शक्य आहे, त्यांच्या स्पर्धा घेऊन इतर इव्हेंटचे प्रात्याक्षिक दाखविण्याचा प्रयत्न व्हावा. यामुळे या खेळांना मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन मिळेल. तसेच प्रशिक्षण राबविणे, साहसी सप्ताह भरविणे व साहसी क्रीडा प्रकारांना पुरस्कार देण्यात यावेत. मोहिमांसाठी आर्थिक मदत तसेच साहित्य खरेदी व इतर बाबींसाठी आर्थिक मदत करण्यात यावी याकामी भविष्यात विचार करण्यात येईल.

**भाग -४ -**ऍडव्हेंटर स्पोर्टस् ही काळाची गरज आहे. साहसी क्रीडा प्रकारांमुळे नेतृत्व गुणांचा विकास, धैर्य, चिकाटी, कल्पकता, साहसीवृत्ती, निसर्गाशी एकरुपता, सकारात्मकता, सांघिक भावना रुजणे इ. बाबींचा विकास होतो. आपत्कालिन प्रशिक्षणात व सेवेत देखील ऍडव्हेंचर स्पोर्टसचा मोलाचा वाटा आहे या दृष्टीकोणातून महाराष्ट्र शासनाने देखील नविन धोरणानुसार ऍडव्हेंचर स्पोर्टस् ला विशेष प्राधान्याने विचारात घेतलेले आहे. महाराष्ट्र शासनाच्या या धोरणाशी सुसंगत असे धोरण पिं.चिं. मनपाने राबविण्याचे ठरविले आहे. यासाठी ऍडव्हेंचर स्पोर्टस् ला विशेष प्राधान्याने विचारात घेऊन क्रीडासाठी खर्च करण्यात येणा-या एकूण रकमेच्या दहा टक्के रक्कम सर्व ऍडव्हेंचर स्पोर्टस् साठी खर्च करण्यात यावी.भविष्यात उपलब्द होणा-या अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार ,मंजूर उपसुचने प्रमाणे अंमलबजावणी करणेत येईल

## भाग-१ – ग – अनुदाने

### अ - अनुदान अदा करणे -

मा.महापालिका सभा ठराव क्र.३०६ दि.१८/०३/२००८ अन्वये पिंपरी चिंचवड महापालिका परिसरातील(हद्दीतील)ख-या अर्थाने मानव हिताच्या दृष्टिकेनातून काम करणा-या सर्व संस्था/सार्व.ट्रस्ट इत्यादी मतीमंद, अंपग, अंध कुष्ठरोगी, मुकबधीर, वृध्दाश्रम, अनाथालय अशा संस्थाना मा.आयुक्त यांनी समक्ष पाहणी करून चांगले काम करणा-या संस्था प्रसंगी अटी शर्ती शिथिल करून चांगले काम करणा-या संस्थाना त्यांची मागणी लक्षात घेता प्रत्यक्ष पाहणी करून तेथील संख्या व इतर बाबी लक्षात घेता ऑडीटच्या अटी व शर्ती शिथील करून अनुदान मंजूर करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना दिले आहेत. या ठरावाप्रमाणे दरवर्षी ठरावात नमुद कार्य करणाऱ्या संस्थाना कमाल र.रु.२,९९,००० पर्यंत अनुदान दिले जाईल. वैयक्तिक व्यक्तीस अनुदान अदा करता येणार नाही.

म.न.पा.परिसरातील सार्व.संस्था/मंडळे यांना द्यावयाचे अनुदान याबाबत खालीलप्रमाणे नियम ठरविण्यात आले आहेत.

1. खालील ध्येय धोरणाचे वर्णन व त्यांना सहाय्य करणा-या सर्व किंवा काही संस्था/ मंडळे यांना म.न.पा. ठरविल त्याप्रमाणे ऐच्छिक अनुदान देता येईल

   अ)प्राथमिक शिक्षण तसेच अंध मुकबधिर व अपंग मुलांची देखभाल व प्रशिक्षण

   ब)माध्यमिक शिक्षण तसेच संग्रहालये,तांत्रिक शाळा,वाचनालये,ग्रथांलये,उद्योग शाळा,यांच्या इमारतीचे बांधकाम व साहित्य खरेदी

   क)क्रीडा व व्यायामशाळा

   ड)सामाजिक सेवा,बालकल्याण केंद्र,आरोग्य केंद्र तसेच पाळणाघरे,पूर्व प्राथमिक शाळा, बालवाडया, बालनाटय केंद्र,बालसाहित्य,ग्रथांलय या सारखे माहिलांनी चालविलेले सामाजिक व शैक्षणिक उपक्रम

   इ)गरीब व अनाथ व्यक्ती,बहिष्कृत स्त्रिया व गुन्हेगार यांचे पुर्नवसन

   फ)रूग्णालये, दवाखाने, कुष्ठरोग, शुषुश्रा केंद्र मनोरूग्णालये,प्रसुतिगृह यासारखे संस्था वैद्यकिय मदत किंवा अशा प्रकारचे कोणतीही सर्व सामान्य मदत ज्याची गणना सामाजिक सुरक्षितता,आरोग्यसुविधा किंवा मार्गदर्शन यांच्या वाढीसाठी होईल.

2. सार्वजनिक हितापेक्षा खाजगी हितासाठी जर एखादी संस्था अथवा मंडळ कार्यरत असेल तर अशा संस्थांना कोणत्याही प्रकारचे अनुदान मिळणार नाही.

3. सोसायटी रजिस्टेशन ऍक्ट १८६० चा २१ किंवा बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ऍक्ट या दोन्हीपैकी कोणत्याही कायद्यान्वये जर एखादी संस्था अथवा मंडळाची नोंदणी झाली नसेल तर अशा संस्थेला अथवा मंडळांना रूपये २०० पेक्षा अधिक अनुदान मिळणार नाही. तथापि तारतम्यानुसार या नियमातील तरतूद म.न.पा. शिथिल करू शकेल परंतू अशा प्रकारचा ठराव मा.स्थायी समिती व मा.महापालिका आयुक्त यांच्या शिफारशीने मंजूर व्हावयास हवा तथापि जर एखादी संस्था अथवा मंडळ एखाद्या विशेष कायद्यानुसार स्थापन झाले असेल तर हा नियम अशा संस्थांना लागू होणार नाही.

4. पिंपरी चिंचवड शहराच्या हद्दीत राबविल्या जाणा-या उपक्रमावरच म.न.पा. ने दिलेले अनुदान मर्यादीत राहिल.
5. अनुदानाचा उपयोग ज्या वर्षी करावयाचा आहे त्यांच्या गत वर्षाचे संस्था/मंडळ यांना सर्व मार्गाने मिळणा-या एकुण उत्पन्नाच्या म.न.पा.ने दिलेल्या अनुदानाच्या व्यतिरिक्त एक तृतिअंश पैक्षा जास्त उत्पन्न(अनुदान) कोणत्याही परिस्थितीत मिळणार नाही.
6. जर म.न.पा.स असे आढळले की,एखादी विशिष्ट संस्था किंवा मंडळ अशा सेवा अथवा सुविधा पुरवित असले की, ज्या सार्वजनिक हिताच्या दृष्टिने आवश्यक नाही तर अशा संस्थेस अनुदान दिले जाणार नाही.
7. ज्या संस्था अथवा मंडळांच्या प्रवेशाची अट धार्मिक शिकवणुकीस उपस्थित राहण्याची असेल अथवा जर त्याचे उपक्रम असतील की,ज्यामुळे धर्मातरांचा प्रचार होत असेल तर अशा संस्थानाही अनुदान दिले जाणार नाही.

   अ)जी संस्था अथवा मंडळामध्ये अस्पृश्यता पाळली जात असेल तर त्या संस्था अनुदान दिले जाणार नाही.

**खालील गोष्टी विचारात घेऊन अनुदान दिले जाईल**

1) सोसायटी रजिस्ट्रेशन ऍक्ट १८६० चा २१ किंवा इतर कायद्याने नोंदणी झालेल्या संस्थेसच भांडवली खर्च अथवा विशिष्ट कारणासाठी अनुदान दिले जाईल ज्या कारणासाठी अनुदान आवश्यक आहे त्या अनुदानाची रक्कम ही संस्था अथवा मंडळ यांची अर्थिक परिस्थिती पाहून म.न.पा.ठरविल तथापि त्या कारणासाठी लागणा-या अनुदानातील रक्कम एकुण खर्चाच्या १/२ पेक्षा जास्त नसेल असे अनुदान खालील अटीवर दिले जाईल.

**अ) अनुदान घेणा-याने विशिष्ट कारणासाठी मंजूर झालेल्या अनुदानाच्या विनियोगासंबंधी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेशी करार केला पाहिजे**

1. अनुदान कोणत्या गोष्टीसाठी व हेतूसाठी पाहिजे आहे व त्याच गोष्टीसाठी व हेतूसाठी वापरले जाईल याचा स्पष्ट उल्लेख करारात असावा.
2. सदर अनुदान विशिष्ट कालमर्यादे करिताच वापरले जाईल
3. जे अनुदान ज्या कालमर्यादेमध्ये खर्च करणे आवश्यक होते व ज्या कारणासाठी खर्च करावयाचे होते तथापि शेवटी त्या अनुदानाचा काही भाग शिल्लक राहीला असेल तर तो परत केला जाईल असा स्पष्ट उल्लेख असावा. तसेच भांडवली खर्चाच्या बाबतीत निम्म्यापेक्षा जास्त खर्च करावयाचा असलेल्या रक्कमेपेक्षा जास्त अनुदान दिले गेले असेल तर करारात दिलेल्या कालमर्यादा संपल्यानंतर योग्य वेळी पिंपरी चिंचवड म.न.पा.स परत करणे आवश्यक आहे.

<u>टिप -</u>१) ठरल्या प्रमाणे ठराविक कालावधीनतंर पिंपरी चिंचवड महानगरपालिका मुख्यलेखा परिक्षकांना अनुदाना संबंधित अटीच्या पूर्ततेचा दाखला सादर करण्याची प्राथमिक जबाबदारी अनुदान घेणा-यावर राहील. यासाठी महापालिका मुख्यलेखा परिक्षकांस अनुदान घेणा-याने योग्य कालावधीमध्ये दिलेल्या अनुदानातून खर्च केलेबाबतचे अहवाल व लेखी निवेदन देण आवश्यक राहिल नियम क्रमांक: ५ व ९ हा भांडवली खर्च अथवा विशिष्ट कारणासाठी घेतलेल्या अनुदानास लागू राहणार नाही.

२) वर उल्लेख केलेली विशिष्ट कालमर्यादा योग्य कारण असल्यास अनुदान घेणा-यांच्या विनंतीनुसार मा.स्थायी समिती योग्य कालावधीपर्यंत कालमर्यादा वाढवू शकेल.

**१) एखाद्या संस्था व मंडळाच्या चालू खर्च भागविण्यासाठी खालील अटीवर वार्षिक अनुदान मिळेल.**

अ) ज्या सेवा किंवा सुविधा उपलब्ध करणेसाठी फी किंवा रक्कम वसूल केली जात असेल तर अशा वेळी अनुदान मिळणार नाही तथापि नाममात्र रक्कम घेऊन अशा प्रकारच्या सुविधा दिल्या जात असतील. अशा संस्थांना/मंडळाना सुट राहील.

ब) ज्या संस्था अथवा मंडळांच्या मागील ३ वर्षाच्या जमाखर्च तक्त्यामध्ये त्या प्रत्येक वर्षी दिल्या जाणा-या अनुदानाच्या १/२ रक्कमे इतकी शिल्लक दाखविली गेली असेल तर अशा संस्थाना अनुदान दिले जाणार नाही.

क) जर असे आढळले की,उपक्रम योग्य प्रकारे राबविले जात नाही व पैशाचा योग्य वापर होत नाही किंवा असे आढळले की,ज्या हेतू करीता अनुदान घेतले व त्या करीता वापरले गेले नाही अथवा त्याचा गैर वापर झाला आहे अशा वेळी अनुदान दिले जाणार नाही.

ड) जर एखाद्या विशिष्ट वर्गातील लोकांना अशा सुविधा किंवा सेवा दिल्या जात असतील की ज्याकरिता त्यांना पैसे खर्च करणे परवडत असतील अशा वेळी अनुदान दिले जाणार नाही.

इ) अनुदान ठरविताना म.न.पा.ने दिलेले भाडेकर इत्यादी तील सुट लक्षात घेतली जाईल.

फ) जर एखाद्या संस्थेस त्या वर्षाच्या अदांजपत्रकात खास किंवा आवर्ती अनुदानाची तरतूद मंजूर केलेली असेल तर अनुदान मिळणार नाही.

८) जर शासनाने एखादी विशिष्ट प्रकाराच्या संस्थांना मान्यता दिली असेल तर अशा मान्यता प्राप्त संस्थांना त्याच्या कार्यक्षेत्राकरीता अनुदान मिळेल.

९) अनुदान घेतलेल्या संस्था अथवा मंडळाने किंवा प्रथमच मागणी करणा-या संस्थानी म.न.पा. आयुक्तकडे आपले अर्ज वार्षिक अहवाल मागील जमाखर्चाच्या तक्त्यासहीत प्रत्येक वर्षाच्या 1 ऑगस्ट किंवा त्यानंतर परंतू ३१ ऑगस्ट पर्यंत सादर करावे. ३१ ऑगस्ट नंतर अनुदानासाठी सादर केल्या जाणा-या अर्जाचा म.न.पा. विचार करणार नाही.

१०) अ. नियम क्र. ८(१) मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे भांडवली खर्च किंवा एखाद्या विशिष्ट कारणासाठी जर एखाद्या संस्थेस किंवा मंडळास पिंपरी चिंचवड म.न.पा. च्या पुढील
अदांजपत्रकात तरतूद करून घ्यावयाची असेल तर त्यांनी अर्जामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे कागदपत्राच्या प्रति अर्जासोबत जोडून सदरहू अर्ज मा.म.न.पा.आयुक्तकडे 1 नोंव्हेबरला किंवा त्यानतंर परंतू ३० नोंव्हबर पर्यंत सादर करावेत.

**नियम क्र.९ (अ) मध्ये उल्लेखलेल्या कालावधीत जर अर्ज केला नाही तर कोणत्याही परिस्थितीत त्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.**

१०) मा.स्थायी समिती यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या विहित नमुन्यातच अनुदानासाठी अर्ज करावा.

११) ज्या संस्थेला अथवा मंडळाला अनुदान मंजूर करावयाचे आहे त्यांनी खालील बाबी संबंधी करार करणे आवश्यक आहे.

अ) सदरहू संस्थेने त्याचे कार्यकारी मंडळ व्यवस्थापन अथवा नियामक मंडळावर म.न.पा.चे एक किंवा अधिक प्रतिनिधी घेणे आवश्यक आहे. ज्यावेळी म.न.पा. एकापेक्षा जास्त प्रतिनिधी नेमावयाचे ठरले असे त्यावेळी कमीत कमी एक म.न.पा.कार्यालयीन प्रतिनिधी असावा व तो पुढील पैकी असावा. संबंधित विभागाच प्रमुख किंवा म.न.पा.आयुक्तांनी शिफारस केलेल्या त्या त्या विभागातील कर्मचारी.

ब) म.न.पा.च्या माहितीसाठी सादर केले जाणारे वार्षिक अहवाल,मागील वर्षाचे जमा खर्चाचे तक्ते हे मान्यता प्राप्त लेखा परिक्षक अथवा लेखा परिक्षकाच्या फर्मकडुन प्रमाणित केलेले असावे. तथापि ज्या संस्था अथवा मंडळास वार्षिक रक्कम 200 रू.पेक्षा जास्त अनुदान दिले जात नाही. अशा संस्थेने आपले हिशोब मान्यता प्राप्त लेखा परिक्षकाकडून प्रमाणित करून पाठविण्याची गरज नाही. तथापि संस्था अथवा मंडळांचे कार्य कशाप्रकारे चालले आहेत, विशेषत: भांडवली खर्चासाठी अथवा विशिष्ट कारणासाठी घेतलेल्या अनुदानाचा योग्य वापर झाला आहे किंवा नाही याची खात्री करून घेण्यासाठी जेव्हा जेव्हा प्रसंग येईल तेव्हा तेव्हा पिंपरी चिंचवड महापालिका अनुदान घेणा-या संस्था अथवा मंडळाचे हिशोब म.न.पा.मुख्यलेखा परिक्षक अथवा त्यांनी नेमलेल्या व्यक्तीकडून तपासून घ्यावयाचे अधिकार म.न.पा.ने राखून ठेवले आहे.

क) म.न.पा.च्या प्रतिनिधी अथवा अधिका-यांना ज्या वेळी हिशोब व कागदपत्राची पाहणी करावयाची असेल त्यावेळी ते दाखविणे आवश्यक राहिल.

१२) अनुदान हे प्रत्येक वर्षी पुर्नविचारार्थी असेल.

१३) अनुदानासाठी अर्ज करणा-या प्रत्येक संस्था अथवा मंडळाचे ध्येय धोरण व कार्याच्या नियमावली-चा उल्लेख असलेला घटना आवश्यक आहे.

१४) संस्था किंवा मंडळाच्या कार्यकारीणीवर नियुक्त केलेल्या मनपाच्या प्रतिनिधींनी ज्यावर्षी संस्थांना अनुदान दयावयाचे आहे त्या वर्षीच्या संस्थाच्या कामाचा व प्रगतीचा अहवाल देणे आवश्यक आहे.

१५) म.न.पा.ने संस्था अथवा मंडळास अनुदान देणे संबंधी संबंधित संस्था अथवा मंडळास आदेश दिल्या नंतरच त्या संस्थेस ते अनुदान देय राहिल.

१६) अनुदान घेणा-या संस्था अथवा मंडळांची तपासणी मा.महापौर, मा.स्थायी समिती, मा.नगरसचिव, म.न.पा. आयुक्त किंवा अथवा महानगरपालिका आयुक्तांनी अधिकार दिलेल्या कोणताही अधिकारी कोणत्याही वेळी पाहणी करूशकतील.

१७) म.न.पा.स योग्य वाटल्यास वर उल्लेख केलेल्या कोणत्याही दोन अटी शिथिल करू शकेल तथापि सदरहू अटीच्या शिथिलतेत एकुण नगरसेवकांच्या संख्येच्या 1/2 किंवा त्यापेक्षा जास्त मान्यता असणे आवश्यक आहे.

त्यानंतर पिंपरी चिंचवड महापालिका परिसरातील (हद्दीतील ) मा.महापालिका सभा ठराव क्र.३०६ दि.१८/०३/२००८ अन्वये पिंपरी चिंचवड म.न.पा. परिसरातील(हद्दीतील) ख-या अर्थाने मानव हिताच्या दृष्टिकेनातून काम करणा-या सर्व संस्था/सार्व.ट्रस्ट इत्यादी मतीमंद, अंपग, अंध कुष्ठरोगी, मुकबधीर, वृध्दाश्रम, अनाथालय अशा संस्थाना मा.आयुक्त यांनी समक्ष पाहणी करून चांगले काम करणा-या संस्था प्रसंगी अटी शर्ती शिथिल करून चांगले काम करणा-या संस्थाना त्यांची मागणी लक्षात घेता प्रत्यक्ष पाहणी करून तेथील संख्या व इतर बाबी लक्षात घेता ऑडीटच्या अटी व शर्ती शिथील करून अनुदान मंजूर करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना दिल्याने या ठरावाप्रमाणे दरवर्षी ठरावात नमुद कार्यकरणाऱ्या संस्थाना कमाल र.रु.२,९९,००० पर्यंत अनुदान दिले जाते. सदर लेखाशिर्षावर दरवर्षी ३०,००,००० इतकी तरतूद केली जाते.

**ब – पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरिक सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्ट यांना द्यावयाचे अनुदान**

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.पी.सी.सी.३००६/१९९७/ प्र.क्र.३९७/ नगरविकास मंत्रालय, मुंबई ४०००३२ दि.१८ डिसेंबर २००७, पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरिक सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्ट या संस्थेस दरवर्षी र.रू.२५,००,००० अनुदान अदा करणेस मान्यता दिलेली आहे. त्यानुसार आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करून घेऊन अनुदान अदा केले जाते.

**भाग-१ – ह – इतर उपक्रम**

**१) क्रीडा दिन, क्रीडा सप्ताह साजरा करणे.**

मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस २९ ऑगस्ट हा राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. तसेच दिनांक १२ ते १८ डिसेंबर या कालावधीत क्रीडा सप्ताह साजरा करण्यात येतो. क्रीडा दिन व क्रीडा सप्ताह खेळाडूंना अधिक प्रेरणादायी ठरावा यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंचे प्रोत्साहन मिळविणेसाठी चर्चासत्र, परीसंवाद, प्रदर्शनीय सामने, खेळाची शास्त्रोक्त माहिती, प्रशिक्षकाचे अनुभव, क्रीडा विषयक संशोधन, साहित्यांची ओळख, नागरिकांमध्ये व्यायामाचे महत्व जागविण्यासाठी विविध उपक्रम, सायकल रॅली यांचे आयोजन करण्यात येतील.

**उद्दिष्ट्ये -**

1. क्रीडा दिनानिमित्त म.न.पा.तर्फे उत्कृष्ट खेळाडू, प्रशिक्षक, क्रीडा शिक्षक यांचे गौरव चिन्ह, शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात यावा.
2. क्रीडा सप्ताह दरम्यान ३ ते ५ कि.मी.ची दौड आयोजित करावी. यामध्ये समाजातील प्रतिष्ठित नागरिक, लोकप्रतिनिधी, खेळाडू, क्रीडा संघटना, क्रीडा मंडळे इ. समावेश असावा.
3. म.न.पा.च्या क्रीडा विभागामार्फत क्रीडा दिन साजरा करण्यात येईल
4. क्रीडा दिन व क्रीडा सप्ताह यांचे अनुषंगाने पुणे मेरेथॉनच्या धर्तीवर पिंपरी चिंचवड मॅरेथॉन घेण्यात येईल.
5. पिंपरी चिंचवड शहरातील खाजगी शाळा, महाविद्यालये यांचे दरवर्षी क्रीडा महोत्सव घेण्यात यावेत, क्रीडा सप्ताहाच्या निमित्ताने क्रीडा महोत्सव घेण्यात यावा.
6. क्रीडा दिन व क्रीडा सप्ताह यांच्या अनुषंगाने होणारा खर्च म.न.पा.ने करावा.

**२) क्रीडा वाङ:मय निर्मिती करणे -**

म.न.पा.चे कै.अण्णासाहेब मगर स्टेडीयम, नेहरूनगर येथे क्रीडा ग्रंथालय व माहिती केंद्र कार्यरत आहे. खेळाडूंना खेळांच्या नियमाबरोबरच मानसशास्त्र, आहारशास्त्र, वैद्यकशास्त्र, प्रेरणा देणारे वाङ:मय, दुखापतीवर इलाज, शारीरीक क्षमता विकसित करणा-या शास्त्रोक्त पदवी व्यायामाचे महत्व, खेळाडूंच्या स्तरनिहाय कामगिरीचे उच्चांक व विक्रमांच्या नोंदी, खेळातील कौशल्याची शास्त्रयोक्त माहिती, शरीररचना शास्त्र इ. ची माहिती क्रीडा वाङ:मय पुस्तके, सीडी, कॅसेट, फोटोग्राफी इ. च्या निर्मितीची नितांत गरज आहे.

क्रीडा क्षेत्रातील तज्ञ प्रशिक्षक साहित्यिक आपल्या अनुभवाच्या आधारावर तंत्रशुध्दपणे विविध क्रीडा प्रकार, खेळांची पुस्तके त्याचबरोबर सीडी, कॅसेट, फोटोग्राफी करून ठेवतात. अशा व्यक्तींची कॅसेट, पुस्तके, फोटो विकत घ्यावीत.

१. क्रीडा ग्रंथालय विकसित करण्यासाठी क्रीडा गंथालय मध्यवर्ती ग्रंथालयाला जोडण्यात येणार आहे. तसेच मगर स्टेडीयम येथे राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय खेळाडू तसेच पिंपरी चिंचवड परिसरातील खेळाडू, संघटना इ. बाबतची माहिती अद्ययावत करण्यात यावी.

२. म.न.पा.ने शहरातील खेळाडू, प्रशिक्षक यांची माहिती ठेवण्यात येईल.

**३) म.न.पा.च्या क्रीडा सुविधा चित्रीकरणासाठी भाड्याने देणेबाबत.**

म.न.पा.च्या क्रीडा सुविधा (उदा.मैदाने, हॉकी मैदाने, जलतरण तलाव, लॉन टेनिस कोर्ट, बॅडमिंटन हॉल, रायफल शुटींग प्रशिक्षण केंद्र, कृत्रिम गिर्यारोहन भिंत इ.) चित्रीकरणासाठी कोणी भाड्याने मागितल्यास ते अटी शर्तीनुसार भाड्याने देणेबाबतचे व भाडे दर ठरविणेबाबतचे अधिकार मा.आयुक्तांना राहिल. याकामी क्रीडा सुविधांचे नुकसान होणार नाही याची खबरदारी घ्यावी व चित्रीकरणासाठी क्रीडा सुविधा भाड्याने देताना आवश्यक रक्कम अनामत म्हणून म.न.पा.कडे ठेवावी. चित्रीकरण झाल्यानंतर क्रीडा सुविधा आहे, त्या पूर्ववत सुस्थितीत आहेत. तसेच आरोग्य विभाग, विद्युत विभाग, संबंधित विभागाचा ना हरकत दाखला घेतल्यानंतरच संबंधितांचे अनामत रक्कम परत करण्यात येईल.

**४) क्रीडा साहित्य खरेदी -**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत विविध खेळांच्या स्पर्धा राबविल्या जातात. त्याचप्रमाणे शालेय विद्यार्थ्यांना वेगवेगळया स्पर्धेतही उतरविले जाते. यासाठी लागणारे साहित्य हे क्रीडा विभागामार्फत दिले जाते. त्यासाठी लागणारे आवश्यक तरतूद क्रीडा अंदाजपत्रकात असावी.

1. मैदानी स्पर्धेसाठी साहित्य खरेदी करण्यात येईल.
2. शाळांची मैदाने अद्ययावत करण्यात येतील. क्रीडा साहित्य चांगल्या दर्जाचे खरेदी करण्यात येईल व ते खेळाडूंना वेळेवर उपलब्ध करून देण्यात येईल.

**६) अद्ययावत खेळाडू वसतिगृह व विश्रामगृह नव्याने तयार करणे**

पिंपरी चिंचवड म.न.पा. परिसरात योग्य त्या ठिकाणी खेळाडूंसाठी अद्ययावत खेळाडू वसतिगृह तयार करण्यात यावीत व ज्यामुळे बाहेरून आलेल्या खेळाडूंना, मार्गदर्शकांना व पंचाना राहण्याची सोय करणे शक्य होईल. तसेच बाहेरून पिंपरी चिंचवड म.न.पा.स वेळोवेळी भेट देण्यासाठी आलेल्या अधिकारी वर्गाला राहण्याच्या दृष्टीने विश्रामगृह तयार करण्यात यावेत.

## भाग – २ - विविध क्रीडा सुविधा

ज्या खेळासाठी क्रीडा सुविधा तयार केल्या आहेत त्या खेळासाठीच संबंधीत क्रीडा सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. इतर कारणासाठी खेळ सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार नाहीत.

**१) म. न. पा. ची बहूउद्देशीय मैदाने**

1. कै.आण्णासाहेब मगर स्टेडियम, नेहरूनगर, पिंपरी
2. मदनलाल धिंग्रा मैदान, निगडी - प्राधिकरण
3. डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुल, संत तुकारामनगर, पिंपरी १८
4. डॉ. हेडगेवार क्रीडा संकुल, मासुळकर कॉलनी, पिंपरी १८
5. श्री. मोरया गोसावी क्रीडा संकुल,काकडे पार्क,केशवनगर चिंचवड.
6. भोसरी तळयाजवळील मैदान भोसरी.
7. कै. सदाशिव बहिरवाडे मैदान शाहुनगर, चिंचवड
8. कै. प्रबोधनकार केशव ठाकरे क्रीडा संकुल/स्केटिंग ग्राउंड यमुनानगर, निगडी.
9. कै. संजय काळे क्रीडा संकुल, सेक्टर नं.२७ प्राधिकरण, निगडी.
10. राजीव गांधी क्रीडा संकुल थेरगांव – भाडे कराराने चालविण्यास दिलेले आहे.
11. कै.गणपत फुगे क्रीडा संकुल सॅण्डविक कॉलनी
12. नव महाराष्ट्र विद्यालय मैदान, पिंपरी वाघेरे.

**२) म. न. पा. बहूउद्देशीय मैदानांचे आरक्षण देणे कामी खालीलप्रमाणे अटी राहतील.**

१) म. न. पा. ची बहुउद्देशीय मैदाने ही खेळासाठी उपयोग करण्यात येईल. अपवादात्मक परिस्थितीत धार्मिक, सांस्कृतिक व अन्य कार्यक्रमांसाठी क्रीडा मैदाने भाड्याने देण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना अथवा त्यांनी प्राधिकृत केलल्या अधिका-यास राहिल.

२) म. न. पा. वरील मैदाने सराव स्पर्धांसाठी आरिक्षत करण्यापूर्वी किमान १० दिवस अगोदर अर्ज करणे आवश्यक आहे. अपवादात्मक परिस्थितीत अति. आयुक्त / आयुक्त यांचे मान्यतेने किमान ३ दिवसापूर्वी अर्ज केल्यास मैदान सरावसाठी व स्पर्धेसाठी देणे बाबत विचार केला जाईल.

३) अर्जदाराने प्रतिदिन / प्रतितास मैदान सराव / स्पर्धेसाठी आरक्षण करताना मा. महापालिका सभेने ठरवून दिल्याप्रमाणे आरक्षण शुल्क भरावे लागेल.

४) मैदान आरक्षण केल्यानंतर संबंधित संस्थेने कार्यक्रमाचे वेळी म. न. पा. च्या दैनंदिन कामकाजावर परिणाम होणार नाही याची दक्षता अर्जदाराला घ्यावी लागेल.

५) अर्जदार यांना मैदान आरक्षण करताना मा. महापालिका सभेने ठरवून दिल्याप्रमाणे अनामत रक्कम आगाऊ म्हणून भरावी लागेल त्याची रितसर पावती देण्यात येईल. सदर पावती अर्जदाराने व्यवस्थित जपून ठेवणे आवश्यक आहे. अनामत रक्कम मागणी करते वेळी अर्जदाराने पुन्हा अनामत रकमेची मागणी अर्ज व अनामत रक्कमेची मूळ पावती सादर केल्याशिवाय अनामत रक्कम परत केली जाणार नाही. तसेच आवश्यक त्या वेळी विद्युत, स्थापत्य उद्यान विभागाचा आणि पोलीस खाते परवानगी ना हरकत दाखला आणणे आवश्यक आहे. त्या शिवाय अनामत रक्कम परत केली जाणार नाही याची नोंद घ्यावी म. न. पा. च्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास अनामत रकमेतून नुकसान भरपाई वसुल केली जाईल.

६) म. न. पा. शालेय विद्यार्थी, राज्य, राष्ट्रीय खेळाडू व दत्तक योजनेतील खेळाडूसाठी सरावाची वेळ सकाळी ७.०० ते ९.०० व दुपारी ५.०० ते ६.३० अशी वेळ राखून ठेवण्यात आली आहे.

७) खाजगी शाळा, क्लब संस्था, कंपन्या याकरिता सराव, स्पर्धेसाठी मैदानाची वेळ सकाळी १०.०० ते सायंकाळ ५.०० अशी ठरविण्यात आलेली आहे.

८) मैदान स्पर्धेसाठी आरक्षण पूर्ण दिवसाची वेळ सकाळी १०.०० ते सायं.५.०० अशी राहील.

९) क्रीडा उद्देशा व्यतिरिक्त अन्य उद्देशासाठी व बाबीसाठी मैदान व क्रींडागण उपलब्ध करून दिले जाणार नाही. अपवदात्मक परिस्थितीत मा.आयुक्त यांचे मैदाना विषयीचे निर्णय अंतिम राहिल.

१०) मैदान आरक्षण ज्यांचे नांवे अर्ज केला असेल अशाच संस्था, शाळा क्लब, मंडळ किंवा इतर कोणत्याही व्यक्ती / खेळाडू यांनाच मैदानाचा वापर करता येईल. इतर कोणत्याही दुस-याचे आरक्षण घेता येणार नाही.

११) मैदान संबंधित अधिकारी, कर्मचारी यांचे सोबत खेळाडूंची वर्तणूक सहकार्याची असणे अपेक्षित आहे.

१२) मैदानावर सराव अथवा स्पर्धेच्या दरम्यान शालेय महाविद्यालयीन तसेच क्लब मार्फत खेळाणा-या खळाडूंकडे मा. मुख्याध्यापक / प्राचार्य/ संबंधित क्लबचे अध्यक्ष यांचे सहीचे ओळखपत्र, वैद्यकीय प्रमाणपत्र, वैयक्तिक जोखीम पत्र असणे आवश्यक आहे. त्या शिवाय मैदानावर प्रवेश दिला जाणार नाही.

१३) अर्जदाराने मैदान भाडयाने घेतलेल्या काळात मैदान स्वच्छ ठेवणे, सिमा भिंत, गेट, विद्युत फिटींग, पाण्याची टाकी, नळ कोंडाळे यांचे नुकसान होणार नाही. याची दक्षता घ्यावी.

१४) उपलब्ध वेळेनुसार मैदान आरक्षण बॅचेसची वेळ म. न. पा. तर्फे देण्यात येईल.

१५) अपवादात्मक परिस्थीतीत मा.आयुक्त यांचे मान्यतेने मैदान सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी आरक्षणदेण्याचे निश्चित झाल्यानंतर सदरचे कार्यक्रमासाठी पोलिसांची परवानगी घेणे बंधनकार राहिल. बहुउद्देशीय मैदानाची, सांस्कृतिक कार्यक्रमासाठी परवानगी फक्त रात्री १०.०० पर्यंतच दिली जाईल

१६) वरील अटी मध्ये बदल करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांचेकडे राहतील.

१७ ) मा.आयुक्त यांचे मान्यतेने १ साप्ताहिक सुट्टी राहील. साप्ताहिक सुट्टी बदलण्याचा अधिकार मा.आयुक्त यांना राहील. क्रीडा सुविधांच्या दुरुस्ती कामासाठी अथवा म.न.पा.च्या विविध प्रकारच्या क्रीडा स्पर्धा काळात नागरिकांना क्रीडा सुविधांचा लाभ घेता येणार नाही. याबाबत तशी सूचना संबंधित क्रीडा सुविधा ठिकाणी ३ दिवस अगोदर लावणे आवश्यक आहे."

१८). तसेच "म.न.पा. क्रीडा सुविधा, भाडे कराराने चालविण्यास घेतल्यास अथवा सेवा शुल्क तत्वावर चालविण्यास घेतल्यास तेथील पाणी बिल, वीज बिल संबंधित चालविण्यास घेणारी संस्था भरेल. परंतु त्या मिळकतीचा कर म.न.पा. भरेल. क्रीडा सुविधा चालविण्यास घेतलेल्या संस्थेने सदर ठिकाणी नेमलेल्या कर्मचा-यास किमान वेतन कायद्यानुसार वेतन देणे बंधनकारक राहील. आवश्यक ते सर्व शासन कर त्या संबंधित संस्थेने भरणे बंधनकारक राहील तसेच भविष्य निर्वाह निधी कायद्यानुसार आवश्यक वाटल्यास त्या संबंधित कर्मचा-याचा भविष्य निर्वाह निधी संबंधित कार्यालयात जमा करुन तसा पूर्तता अहवाल म.न.पा. कडे सादर करणे बंधनकारक राहील." असा मजकूर समाविष्ट करावा

**नियम खालील प्रमाणे राहतील.**

1. मैदान आरक्षण करताना ज्याचा अर्ज प्रथम येईल त्या अर्जदाराला प्रथम प्राधान्य देण्यात येईल.
2. मैदानावर सराव / स्पर्धेच्या वेळी शांतता राखणे बंधनकारक राहिल.
3. मैदानावर सरावासाठी एका वेळी फक्त २५ खेळाडूंना प्रवेश दिला जाईल.
4. अर्जदाराला मैदान आरक्षण काळात विजेचा वापर करावयाचा असल्यास त्याची पूर्व परवानगी संबंधित प्रभाग विद्युत विभाग यांची घेऊन मीटर रिडींग पाहुन विद्युत विभाग ठरवून देतील त्या प्रमाणे बिल संबंधित विद्युत विभागात भरावे लागेल.
5. जर मनपाने ८ दिवस अगोदर एखादी स्पर्धा, अर्जदाराने आरक्षित केलेल्या तारखेस आयोजित केल्यास अर्जदारास सदर तारीख बदलून त्याच्या समन्वयाने पुढील आरक्षण तारीख देण्यात येईल याची नोंद घ्यावी.
6. कोणतेही कारण न देता मैदान ८ दिवस अगोदर आरक्षण रद्द करण्याचा अधिकार म. न. पा. ने राखून ठेवला आहे.
7. मैदान आरक्षण केल्यानंतर आरक्षण रद्द करावयाचे झाल्यास किमान ५ दिवस अगोदर लेखी अर्ज सादर करणे आवश्यक आहे.. अन्यथा एकदा भरलेले आरक्षण शुल्क व अनामत रक्कम कोणत्याही सबबीवर परत केले जाणार नाही.
8. खेळाचे मैदान भाडयाने देण्याचे अधिकार मा. सहाय्यक आयुक्त(क्रीडा) यांना राहील. अपवादात्मक परिस्थितीत मा. सहाय्यक आयुक्त(क्रीडा) यांचे सदर अधिकार मा.क्रीडा अधिकारी अथवा प्राधिकृत अधिकारी यांना प्रदान करतील.
9. प्रशिक्षण व सराव या करिता मैदान सकाळी ७.०० ते ९.०० व सायंकाळी ५.०० ते ६.३० या वेळेत उपलब्ध राहिल.
10. मैदानाची वेळ निश्चित केल्या नंतर विहित वेळेच्या व्यतिरिक्त मैदानाचा वापर करता येईल.
11. प्रशिक्षण व सराव मैदानावर सोमवार ते शुक्रवार अखेर पर्यंत करता येईल.
12. अपवादात्मक परिस्थीतीत मा.आयुक्त यांचे मान्यतेने मैदान सांस्कृतिक कार्यक्रमासाठी दिल्यानंतर त्या ठिकाणी भोजन व्यवस्था करण्यात येवू नये. तसेच मैदानावर चालण्यासाठी येणा-या नागरिकांची गैरसोय होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.
13. विद्युत प्रकाश झोतात मैदान सराव अथवा स्पर्धेसाठी वापरताना एम. एस. ई. डी. सी. एल. यांच्याकडून विद्युत पुरवठा खंडित झाल्यास त्याची जबाबदारी म. न. पा. ची राहणार नाही. संबंधित संस्थेने स्वत:ची पर्यायी व्यवस्था म्हणून जनरेटरची व्यवस्था स्वखर्चाने करणे बंधनकारक राहील.
14. हॉकी पॉलिग्रास किंवा अँथलेटिक्सचा सिंथेटिक ट्रॅक वर सराव किंवा स्पर्धेच्या काळात मॅटची खराब होणार नाही. याची दक्षता संबंधित अर्जदाराने घ्यावी. जर कोणत्याही प्रकारे मॅटची खराबी झाल्यास म. न. पा. ने ठरविल्याप्रमाणे संबंधित अर्जदाराकडून नुकसान भरपाई वसूल केली जाईल. व भविष्यात पुन्हा हॉकी पॉलिग्रास किंवा अँथलेटिक्सचा ट्रॅक भाडयाने मिळणार नाही.

15. राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील म. न. पा. हद्दीतील खेळाडूंना म. न. पा. कडे असलेल्या मैदानावर सराव करणेकामी विनामूल्य परवानगी साठी विहित नमुन्यात अर्ज करणे व सोबत आवश्ययक ती प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. आरक्षण रजिस्टर मधील उपलब्ध वेळेनुसार मैदाने सरावासाठी विनामूल्य दिली जातील.
16. पिं.चिं.म.न.पा.ची मैदाने सरावासाठी आरक्षित केल्यानंतर सरावासाठी लागणारे साहित्य म.न.पा.कडून दिले जाणार नाही. या कामी लागणारे साहित्य संबंधित अर्जदाराने स्वत: आणावयाचे आहे. सदर साहित्य ने आण करण्याची सांभाळण्याची जाबबदारी संबंधितांची राहील.
17. पिं.चिं.म.न.पा. ची मैदाने सराव किंवा स्पर्धेसाठी आरक्षित केल्यानंतर मैदानावर प्रवेश करणेपूर्वी सदर मैदान / क्रीडा संकुलाचे रखवालदार कर्मचारी यांचेकडे आरक्षण आदेश किंवा भाडे पावतीची झेरॉक्स प्रत जमा करणे बंधनकारक राहील. त्याशिवाय मेदानात सराव/ स्पर्धेसाठी प्रवेश दिला जाणार नाही. याची दक्षता रखवालदार यांनी घ्यावयाची आहे.
18. मैदान आरक्षित केल्यानंतर त्या ठिकाणी जर अर्जदाराने प्रवेश फी आकारली तर त्यास म.न.पा.च्या नियमानुसार मैदानाचे भाडे अदा करावे लागेल तसेच मंनोरंजन कर, पोलिस परवानगी, विमा व त्या अनुषंगाने येणा-या सर्व गोष्टीची जबाबदारी संबंधित अर्जदारावर राहिल.
19. म.न.पा.ची क्रीडा सुविधा भाडे कराराने चालविण्यास घेतल्यावर त्या ठिकाणी प्रथम पिं.चि.म.न.पा. चे नाव देणे तसेच जर त्या ठिकाणाहून एखादा संघ स्पर्धेसाठी जाणार असेल त्या संघास पिं.चिं.म.न.पा. नाव असे बंधनकारक राहिल.
20. जर बाहेरील प्रोयाजकत्व घेतले तर मैदानाची देखभालीचा खर्च त्या संबंधितांनी संस्था/मंडळ/व्यक्तिने करावा.
21. जर एखादया संस्थेने महानगरपालिकेच्या क्रीडा सुविधा भाडे करारावर चालविण्यास घेतल्या असताना त्या ठिकाणी ज्या सुविधा आहेत. तयाचा त्यांचा वापर झाला पाहिजे. तसेच ज्यांनी त्या भाडे चालविण्यास घेतल्या आहेत. त्यांना दुस-यांना भाडेतत्वावर देता येणार नाहीत.
22. जर एखादया संस्थेने महानगरपालिकेच्या क्रीडा सुविधा भाडे करारावर किंवा सेवाशुल्क तत्वावार चालविण्यास घेतल्या व त्यांना त्या ठिकाणी प्रायोजकत्व मिळाले तर त्यांना मैदानाची देखभाल स्वत करावी लागेल महापालिका त्यांचा खर्च देणार नाही.
23. म.न.पा. च्या क्रीडा सुविधा भाडे कराराने द्यावयाचे असल्यास त्या सुविधा व्यक्तिस देता येणार नाही. ज्या संस्था धर्मदाय संस्थेकडे रजिस्टर आहेत. अशांना संस्थाचा मागील ३ वर्षाचा अनुभव लक्षात घेवुन व राज्य राष्ट्रीय खेळाडू स्वत: किती तयार केले यांची तपासणी करुन नंतर त्यांना भाडे कराराने देता येतील.
24. जर एखादी संस्था रजिस्टर संस्था नविन असेल तर त्या संस्थेने दोन वर्षात राज्य राष्ट्रीय खेळाडू घडविणे आवश्यक आहे. जर २ वर्षात राज्य, राष्ट्रीय खेळाडू घडले नाही तर करार रदद करण्यात येईल.
25. एखादया प्रशिक्षण संस्थेसाठी जर क्रीडा सुविधा भाडयाने चालविण्यास घेतली तर त्याची पात्रता राज्य राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय खेळाडू किंवा संघटनेने आयोजित केलेले लेव्हल १ते३ पैकी १ कोर्स केलेल्या असावा व ज्या ठिकाणी प्रशिक्षण देणार आहे त्या ठिकाणी आठवडयातुन ३ वेळा उपस्थित असणे बंधनकारक राहिल.

26.क्रीडा सुविधा भाडयाने देताना म.न.पा. परिसरातील क्रीडा संस्थाना किंवा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडूंना प्राधान्य देण्यात येईल.

27.ज्या ठिकाणी सराव, प्रशिक्षण , शिबिर व स्पर्धा चालु आहेत त्या ठिकाणी नागरिकांना प्रवेश दिला जाणार नाही. तशा सुचना मैदानावर लावण्यात याव्यात व मनपाच्या www.pcmcindia.gov.in या संकेत स्थळावर स्पर्धा वेळापत्रक प्रसिध्द करण्यात याव्यात. तसेच पाऊस पडल्यानंतर नागरिकांना मैदानावर प्रवेश दिला जाणार नाही.

28.वरील नियमात बदल करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांचे कडे राहतील

**मैदान वापराबाबत अटी व शर्ती -**

१) मैदानावर सराव / स्पर्धेच्या काळात मैदान आवारातील झाडे हिरवळ यांचे नुकसान होवू देवू नये अन्यथा वृक्ष संवर्धन कायद्यान्वये खटला भरण्यात येईल व झालेल्या नुकसानीची भरपाई अनामत रक्कमेतून वसुल करण्यात येईल. याची अर्जदाराने दखल घ्यावी.

२) अर्जदाराने मैदानाचा वापर करताना ध्वनी व वायु प्रदुषण होणार नाही याची काळजी घ्यावी अन्यथा त्या अर्जदारावर कारवाई करण्यात येईल.

३) मेदान परिसरात दारु मादक द्रव्य घेण्यास सक्त मनाई आहे. असे आढळल्यास योग्य ती पोलीस कारवाई संबंधितांवर केली जाईल. अशा संस्था / क्लब / कंपनी / खेळाडूंना भविष्यात पुन्हा मैदान सराव / स्पर्धेसाठी दिले जाणार नाही.

४) मैदान वापर करणा-या संस्थेस शाळा / क्लब / कंपनी यांना मैदान परिसरात स्वच्छता ठेवावी लागेल. या बाबींकडे दुर्लक्ष केल्याचे आढळून आल्यास संबंधित संस्था, शाळा, क्लब, कंपनी यांकडून दंड रु. रु. ५०० वसूल केला जाईल.

५) अर्जदाराने म.न.पा. मैदानावर, परिसरात मंडप घालण्यासाठी खड्डे खोदले गेल्यास प्रती खड्डा रक्कम रु. ५०० प्रमाणे दंड आकारला जाईल सदरचा दंड त्यांनी भरलेल्या मैदान अनामत रक्कमेतून कपात करुन उर्वरित अनामत रक्कम परत केली जाईल.

६) अर्जदाराकडून अटी / नियमाचे उल्लंघन झाल्यास अर्जदाराची अनामत रक्कम महानगरपालिका फंडात जमा केली जाईल याबाबत म. न. पा. चा एकतर्फी निर्णय राहील.

७) सराव / स्पर्धा / प्रशिक्षण संपल्यानंतर खेळाडूंनी लगेच मैदानाच्या बाहेर जावे. मैदानावरील कर्मचा-यांशी सहकार्याने वागावे. कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन करुन नये गैरवर्तन केल्यास संबंधि खेळाडू / संघ यांचेवर कडक कारवाई करण्यात येईल.

८) सराव / स्पर्धा किंवा प्रशिक्षण काळात एका खेळाडूने किंवा त्या संघाने मैदानातील बाथरुम, चेंजींग रुम् किंवा इतर सोयीचे तसेच मैदान परिसरातील कोणत्याही साहित्याचे / वास्तूचे नुकसान किंवा तोडफोड केल्यास त्यांच्याकडून अनामत रक्कमेतून नुकसान भरपाई वसुल केली जाईल किंवा दंड केला जाईल.

९) वरील शास्तीमध्ये वाढ अथवा बदल करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना राहतील.

**३) कै.अण्णासाहेब मगर स्टेडियम, नेहरुनगर (क्रिकेट मैदान व इतर खेळ)**

1. कै.अण्णासाहेब मगर स्टेडियमचा वापर करताना सर्व साधारण अटी नियम व शास्ती बहुउद्देशिय मैदाने आरक्षण पान क्र.३० ते ३४ प्रमाणे राहतील.
2. शासकीय / निमशासकीय क्रिकेट स्पर्धा असेल तर कै. आण्णासाहेब मगर स्टेडियम मैदान आरक्षणास प्रथम प्राधान्य देण्यात येईल. कै. आण्णासाहेब मगर स्टेडियम क्रिकेट मैदान आरक्षण ज्यांचे नांवाने अर्ज केला असेल अशाच/संस्था/शाळा/क्लब यांनाच क्रिकेट मैदानाचा वापर क्रिकेट सरावासाठी करिता करता येईल. इतर कोणत्याही संस्थेस दुस-यांचे आरक्षण हस्तांतर करता येणार नाही.
3. आण्णासाहेब मगर स्टेडियम मैदानावर क्रिकेट सरावासाठी मैदानावर एक नेट प्रॅक्टिस करिता फक्त तीस खेळाडूंना प्रवेश दिला जाईल.
4. सामने / सराव / प्रशिक्षण संपल्यावर खेळाडूंनी त्वरित मैदानाबाहेर जावे.
5. मैदानावर सरावसासाठी क्लब/ शाळा/ संस्था यांनी आपली स्वत:ची नेट लावण्याची व काढण्याची जबाबदारी संबंधितांची राहील.
6. क्रिकेट स्पर्धा सराव व प्रशिक्षणा शिवाय इतर कोणत्याही कार्यक्रमासाठी स्टेडियम भाडयाने मिळणार नाही.
7. जर मैदानात टेनिस बॉलने क्रिकेट स्पर्धा खेळणार असतील तर या करिता मैदानाच्या बाजूला केलेल्या खेळपट्टीवरच सामने खेळविणे बंधनकारक राहील.

**३) मदनलाल धिंग्रा मैदान प्राधिकरण**

मदनलाल धिंग्रा मैदान फक्त फुटबॉल खेळासाठीच वापरावे. सर्व साधारण अटी, नियम व शास्ती बहुउद्देशिय मैदाने आरक्षण पान क्र.३० ते ३४ प्रमाणे राहतील.

**४) श्री संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल, इंद्रायणीनगर, भोसरी, एथलेटिक्स ट्रॅक**

संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल, इंद्रायणीनगर साठी सर्व साधारण अटी, नियम व शास्ती म.न.पा. बहूउद्देशिय मैदाने आरक्षण पान क्र.३० ते ३४ प्रमाणे राहतील.

**५) हॉकी पॉलिग्रास मैदान, नेहरूनगर, पिंपरी**

1. हॉकी पॉलीग्रास मैदान वापरासाठी सर्व साधारण अटी व नियम व शास्ती म.न.पा. बहूउद्देशिय मैदाने आरक्षण पान क्र.३० ते ३४ प्रमाणे राहतील
2. हॉकी पॉलिग्रास मैदानावर प्रवेश करताना पॉलिग्रास मैदानासाठी लागणारे स्वच्छ बुट घालणे आवश्यक आहे. बुटाला कोणत्याही प्रकारचा चिखल अथवा अस्वच्छता असल्यास मैदानावर प्रवेश दिला जाणार नाही. अथवा हॉकी खेळाचे बुट परिधान केल्याशिवाय कोणत्याही खेळाडूला मैदानावर प्रवेश दिला जाणार नाही.
3. सरावसासाठी एका वेळी २२ खेळाडूंना प्रवेश दिला जाईल.
4. एक खेळाडूने किंवा त्या संघाने मैदानमधील बाथरुम व इतर सोयीचे नुकसान केल्यास किंवा तोडफोड केल्यास त्यांना पुन्हा आरक्षण दिले जाणार नाही व त्याच्या कडून भरपाई करुन घेतली जाईल.
5. हॉकी पॉलिग्रास मैदानाची खराबी होणार नाही याची काळजी संबंधीतानी घ्यावी.

**६) बॉक्सिंग प्रशिक्षण केंद्र –**

1. बॉक्सिंग सेंटरचा वापर करताना साधारण अटी नियम व शास्ती व्यायामशाळा पान क्र.५२ ते ५३ प्रमाणे राहतील
2. म.न.पा. बॉक्सिंग प्रशिक्षण केंद्राचे मासिक शुल्क दर व अनामत रक्कम या बाबतची माहीती भाग ४ दरपत्रकात दिली आहे.
3. मनपा बॉक्सिंग केंद्राची वेळ सोमवार ते शनिवार सकाळी ७.०० ते १०.०० अशी व दुपारी ४.०० ते ७.०० अशी सर्व रविवार शासकीय सुट्टयांचे दिवशी बॉक्सिंग प्रशिक्षण केंद्र बंद राहील.
4. प्रत्येक प्रशिक्षणार्थीने म.न.पा. नियमांचे, मार्गदर्शक सुचनांचे पालन करणे आवश्यक आहे.

**७) रायफल शुटिंग प्रशिक्षण केंद्र -**

1. रायफल शुटिंग प्रशिक्षण केंद्र म.न.पा.च्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी (सार्व.,साप्ता. सुट्ट्या वगळून) सकाळी ०८.०० ते रात्री ८.०० या वेळेमध्ये चालू राहील. वेळेमध्ये बदल करण्याचा अधिकार मा. आयुक्त अथवा त्यांनी नेमून दिलेल्या अधिका-यास राहील.
2. प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रवेश घेताना विहीत नमुन्यात सभासद अर्ज पूर्ण भरून देणे आवश्यक आहे.
3. सदर अर्ज भरताना ,पुर्ण पत्त्यासाठी, आधारकार्ड, रेशनींग कार्ड झेरॉक्स प्रत व वयाच्या पुराव्यासाठी शाळेचा दाखल्याची झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक आहे.
4. सभासद अर्जावर प्रशिक्षणार्थींनी स्वत:चा आयडेंटी कार्ड साईज फोटो चिकटविणे आवश्यक आहे.
5. रायफल शुटिंग प्रशिक्षण केंद्र प्रवेश शुल्काचे दर भाग – ४ मध्ये दिले आहेत
6. वेळेमध्ये बदल करणेचा अधिकार मा.आयुक्त अथवा त्यांनी नेमून दिलेल्या अधिका-यास राहील.
7. १२ वर्षाच्या आतील मुलांना रायफल शुटिंग प्रशिक्षण केंद्रात प्रवेश दिला जाणार नाही.
8. छर्रे **(Pallets)** आणि टारगेट **(Targets)** हे सभासदांना विकत घ्यावे लागतील.

९. प्रत्येक प्रशिक्षणार्थीने म.न.पा. नियमांचे, मार्गदर्शक सुचनांचे पालन करणे आवश्यक आहे.

१०. .रायफल शुटींग केंद्रामध्ये खालील अत्याधुनिक साहित्य पुरविण्यात यावे.

- Automatic Pulley
- Imported Pistol
- Imported Rifle
- Imported Pellets
- Rifle Shooting Kit, Stand
- Target, Air Compressor
- Etc.

११ .या केंद्रात सुरक्षा व्यवस्था पुरविण्यात येईल

१२. भविष्यात उपलब्द होणा-या अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार ,सदर रायफल शुटींग केंद्र चांगल्या पद्धतीने चालावे यासाठी पिंपरी चिंचवडमधील एखाद्या अनुभवी संस्थेला सेवाशुल्क देऊन सदर केंद्र चालवावे.

**८) वेटलिफ्टिंग सेंटर –**

वेटलिफ्टिंग सेंटरचा वापर करताना साधारण अटी नियम व शास्ती व्यायामशाळा पान क्र.५२ ते ५३ प्रमाणे राहतील

**९) म.न.पा.कृत्रिम गिर्यारोहण भिंत**

**म.न.पा .कृत्रिम गिर्यारोहण भिंत भाडे कराराने चालविण्यास देणेबाबतच्या अटी शर्ती खालीलप्रमाणे.**

1. गिर्यारोहण भिंत वेळ सकाळी ७.०० ते सायं. ६.०० या कालावधीत राहील .परंतु सायं. ६.०० नंतर गिर्यारोहण भिंतीचा वापर करता येणार नाही.
2. गिर्यारोहण भिंत वरील साहित्याची मोडतोड केल्यास त्याची भरपाई देण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची /मंडळाची /क्लबची राहील.
3. सदरची संस्था /मंडळ /कल्ब हे नोदणीकृत संस्था असावी.
4. जी संस्था /मंडळ /क्लब म.न.पा .कडे जास्तीत जास्त मासिक भाडे देईल त्या संस्थेस / मंडळास /क्लबला गिर्यारोहण भिंत कराराने चालविणेस देण्यात येईल, परंतु अशा संस्था /मंडळ /क्लब यांनी संबंधित क्रीडा साहीत्य एकुण किंमतीच्या नियमा नुसार अनामत रक्कमेचा एफ.डी.आर. म.न.पा.कडे जमा करावा लागेल.
5. गिर्यारोहण भिंत भाडयाने चालविण्याचा करारनामा ११ महिन्यांचा राहील, तसेच मुदतवाढ देणे किंवा नाकारणे याकरीता मंडळ /संस्था /क्लबचे कामकाज विचारात घेऊन पुढील मुदतवाढीचे अधिकार म.न.पा.स राहतील.
6. गिर्यारोहण भिंत व परीसरामध्ये गिर्यारोहण व्यतिरिक्त कोणताही वापर करता येणार नाही., गिर्यारोहण भिंत चे काही नुकसान झाल्यास त्याचे दुरूस्तीचा खर्च संबंधित संस्था /मंडळ /क्लब यांना करावा लागेल.
7. गिर्यारोहण भिंत चालविणेस दिलेल्या मंडळ /संस्था /क्लबला गिर्यारोहण भिंतीवर मालकी हक्क सांगता येणार नाही .गिर्यारोहण भिंतची सर्वस्वी मालकी हक्क म.न.पा .चा राहील.
8. वेळोवेळी महानगरपालिका ज्या नियम व अटी शर्ती लागू करेल त्यांचे पालन करणे संबंधित संस्था /मंडळ /क्लब यांना बंधनकारक राहील.
9. गिर्यारोहण भिंत मधील साहित्य खराब करणे /चोरीला जाणे तसेच गिर्यारोहण साहित्य कारणा शिवाय तूट-फुट होणे, अगर गिर्यारोहण भिंतचा वापर इतर कारणासाठी केल्याचे किंवा इतर गैरप्रकार जर म.न.पा .अधिकाऱ्यांचे निदर्शनास आल्यास संबंधित संस्था /मंडळ /क्लब यांना कोणतीही पूर्व सूचना किंवा नोटीस न देता संस्थेचा

करारनामा रद्द करणेत येईल व झालेल्या नुकसानीची भरपाई अनामत रकमेतून वसुल केली जाईल.

10.गिर्यारोहण भिंत ठिकाणी या पूर्वीच पाण्याची व्यवस्था आहे तेथील पाणी संबंधित संस्थेस/मंडळ/क्लबला मोफत वापरता येईल.

11.मंडळाने /संस्थेने /क्लबने स्टॅप पेपरवर गिर्यारोहण भिंत मधील साहित्या बाबत लेखी हमी द्यावी लागेल.

12.मंडळ /संस्था /क्लब ला ११ महिन्याचा करारनामा करून द्यावा लागेल.

13.गिर्यारोहण भिंती ची संपूर्ण सुरक्षा राखण्याची जबाबदारी संबंधीत संस्था /मंडळ /क्लब यांची राहील.

14.म.न.पा .शाळेतील किमान २० मुलांना मोफत गिर्यारोहण प्रशिक्षण देण्याची जबाबदारी संबधीत संस्था /मंडळ /क्लब यांची राहील., त्यासाठी स्वतंत्र वेळ ठरवून द्यावी लागेल.

15.गिर्यारोहण भिंत साठी प्रशिक्षक नेमण्याची जबाबदारी संबंधीतांची राहील.

16.म.न.पा .गिर्यारोहण भिंत व परीसराची संपूर्ण देखभाल व स्वच्छता ठेवण्याची जबाबदारी संबंधीत संस्था /मंडळ /क्लब यांची राहील.

17.गिर्यारोहण भिंत साठी आवश्यक असलेले प्रशिक्षक, रखवालदार, साफसफाई इ . कर्मचारी नेमण्याची व त्यांचे मानधन अदा करण्याची जबाबदारी संबंधित संस्था / मंडळ /क्लब यांची राहील.

18.गिर्यारोहण भिंत वरील साहित्याची चोरी झाल्यास किंवा मालमत्तेचे नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी गिर्यारोहण भिंत चालविणाऱ्या संस्था/मंडळ /क्लब यांची राहिल .म.न.पा .ठरविल त्याप्रमाणे त्याची नुकसान भरपाई द्यावी लागेल .गिर्यारोहण भिंत परीसरात मद्यपान धुम्रपान करण्यास सक्त मनाई राहील.

19.गिर्यारोहण भिंत हे ११ महिन्यासाठी भाडे कराराने चालविण्यास देण्यात येईल . ठेक्याची मुदत संपल्यानंतर पुढील मुदतवाढ देण्याचा अथवा ठेका मुदती पुर्वी रद्द करण्याचा अधिकार म.न.पा.स राहील.

20.गिर्यारोहण भिंत संबंधी अटी /शर्तीचा भंग झाल्यास, गैरवर्तन निदर्शनास आल्यास अथवा गंभीर तक्रार आल्यास कोणतीही पूर्व सुचना न देता ठेका रद्द करण्यात येईल.

21.निविदेनुसार दरमहा ठरलेले भाडे क्रीडा विभाग, कै.अण्णासाहेब मगर स्टेडीयम, नेहरूनगर येथे भरून त्याची पावती सादर करावी लागेल. २ महिन्यांपेक्षा जास्त कालाबधीचे भाडे थकल्यास ठेका रद्द करून अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

22.गिर्यारोहण भिंत ची पाहणी करण्याची महापालिकेच्या सक्षम अधिकाऱ्यास मुभा राहील, त्यास संपूर्ण सहकार्य करणे हे गिर्यारोहण भिंत चालविणाऱ्या संस्था /मंडळ /क्लब यांचेवर बंधनकारक राहील.

23.गिर्यारोहण भिंत संबंधी असलेल्या अटी /शर्तीमध्ये वाढ करणे अथवा शिथिल करण्याचे अधिकार मा .आयुक्त यांना राहील.

24.गिर्यारोहण भिंत परीसरात इतर कोणताही व्यवसाय करता येणार नाही.

25.गिर्यारोहण भिंत तास -दोनतास करीता शिबिरासाठी इतर संस्थेस भाडयाने देता येईल.

26.गिर्यारोहण भिंतीवर खेळाडुस व्यक्तिकरित्या सराव करावायाचे मासिक शुल्क दर अनामत रक्कम भाग ४ मध्ये नमुद केले आहे. सराव स्वत:च्या जबाबदारी वर करावा लागेल, सराव करतेवेळी काही अपघात झाल्यास त्याला मनपा जबाबदार राहणार नाही. सरावासाठी स्वत:चे साहित्य वापरावे यासाठी महानगरपालिके कडून कोणतेही साहित्य पुरविले जाणार नाही.

27.गिर्यारोहण भिंत स्पर्धेसाठी भाड्याने घेतल्यास स्वच्छतेकामी १०% रक्कम अनामत रक्कमेतून कपात केली जाईल.

म.न.पा .कृत्रिम गिर्यारोहण भिंत भाडे कराराने चालविण्यास घेणेकामी प्रतिसाद न मिळाल्यास सदर क्लाईंबिंग वॉल (गिर्यारोहण भिंत), स्पोर्ट क्लाईंबिंग या खेळातील अनुभवी अशा संस्थेला सेवाशुल्क देऊन कमीत कमी ५ ते १० वर्षांसाठी चालविण्यात देण्यात येईल परंतु याबाबतच्या अटी व शर्ती ठरविण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना राहील

**१०) जलतरण तलाव. –**

**म.न.पा. जलतरण तलाव नागरिकांसाठी उपलब्ध करून देणे म.न.पा.चे खालील प्रमाणे ११जलतरण तलाव आहेत.**

| अ.क्र. | जलतरण तलावाचे नांव |
|---|---|
| १ | कै.अण्णासाहेब मगर स्टेडियम जलतरण तलाव, नेहरूनगर |
| २ | श्री.छत्रपती शिवाजी महाराज जलतरण तलाव, निगडी प्राधिकरण |
| ३ | खिंवसरा पाटील जलतरण तलाव, थेरगांव |
| ४ | कै.बाळासाहेब शितोळे जलतरण तलाव, सांगवी |
| ५ | भोसरी जलतरण तलाव, भोसरी |
| ६ | राजर्षी शाहू जलतरण तलाव, मोहननगर, चिंचवड |
| ७ | कै.वस्ताद बाळासाहेब गावडे जलतरण तलाव, केशवनगर, चिंचवड |
| ८ | कै.काळूराम जगताप जलतरण तलाव, पिंपळे गुरव |
| ९ | डॉ.बाबासाहेब आंबडेकर जलतरण तलाव, कासारवाडी |
| १० | यमुनानगर जलतरण तलाव, यमुनानगर , निगडी |
| ११ | पिंपरी वाघेरे जलतरण तलाव, पिंपरीगांव (नियोजित) |

**जलतरण तलावाचे नियम -जलतरण तलावावरील सभासदासाठी सुचना**

जलतरण तलावासाठी सर्व साधारण अटी, नियम व शास्ती खालील प्रमाणे राहतील.

1. पोहण्याच्या तलावात प्रवेश करण्यापुर्वी व पोहुण झाल्यावर स्वच्छ अंघोळ करावी .
2. पोहण्यासाठी स्वच्छ जाड कापडाचा गडद रंगाचा कॉश्युम /पोहण्याचा पेहराव वापरणे आवश्यक आहे.
3. तलावाच्या पाण्यात अथवा आवारात थुंकणे, नाक शिंकरणे, तोंडाने पाण्याचा चुळा फेकणे या गोष्टी कटाक्षाने टाळाव्यात.

4. ज्यांना त्वचेचे रोग असतील, सर्दी झालेली असेल, कान वाहत असतील अशांनी तलावात उतरु नये .अशा पोहणाऱ्यांना तलावात पोहण्यास मज्जाव करण्यात येईल.
5. शरीराला तेल लावुन पोहण्याच्या तलावात उतरु नये.
6. ज्यांना पोहता येत नाही .अशांनी जलतरण शिक्षकांच्या परवानगी शिवाय तलावात प्रवेश करु नये.
7. पोहण्यासाठी येणाऱ्यांनी सोबत मौल्यवान वस्तु आणु नयेत .आपल्या वस्तु लॉकरमध्ये ठेवून, त्याला चांगले मजबुत कुलुप लावावे.
8. तलावाचे व्यवस्थापक किंवा कर्मचारी हे कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस किंवा वस्तू चोरीस जाणेसाठी जबाबदार राहणार नाही.
9. लांब केस असणा-या व्यक्तिने पोहताना वापरायची टोपी घालणे आवश्यक आहे.
10. प्रत्येकाने स्वत :चे जबाबदारीवरती पोहण्यास यावे.
11. पोहण्यासाठी सभासद होऊ इच्छूकांनी मंडळाने नियुक्त केलेल्या वैद्यकीय अधिका-याकडून त्याची शारीरीक वैद्यकीय तपासणी करून घेणे आवश्यक आहे .
12. म.न.पा. जलतरण तलावाच्या वेळा निश्चित करण्याचे व साप्ताहिक सुट्टी ठरविण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना राहिल. सणाच्या दिवशी (दिवाळी, दसरा) काही अपघात होऊ नये अथवा तलावाचे पाणी खराब होऊ नये (होळी, धुलिवंदन व रंगपंचमी) अशा दिवशी अथवा अपवादात्मक परिस्थितीत तलाव बंद ठेवण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना राहतील. अथवा त्यांनी प्राधिकृत केलल्या अधिका-यास राहतील.
13. स्विमिंग कॉश्युम शिवाय तलावात प्रवेश करण्यास सक्त मनाई आहे.आपले दागिने व मौल्यवान वस्तू स्वत:च्या जबाबदारीवर ठेवणे ते हरविल्यास त्यास म.न.पा.कर्मचारी जबाबदार राहणार नाही.
14. पोहण्यासाठी येताना मौल्यवान वस्तू जास्त रक्कम सोबत आणू नये.
15. सभासद/गेस्ट यांनी आपआपल्या साहित्याची योग्य ती काळजी घ्यावी.
16. कोणत्याही वस्तू/साहित्य इ .जबाबदारी म.न.पा.कर्मचारी व्यवस्थापक कर्मचारी इत्यादीवर राहणार नाही.
17. जेवढे आणि जेवढया वेळा पोहता येणे शक्य असेल तेवढे पोहावे .मात्र आपल्या पोहण्याच्या क्षमतेची जाणिव ठेवूनच मर्यादीत वेळेपर्यंत/अंतरापर्यंत पोहणे चालू ठेवावे . अतिरेक कटाक्षाने टाळावा.
18. पोहता येत नसेल तर एकटयाने पोहण्याचे टाळावे .पोहताना जास्त लोक सोबत असणे सुरक्षिततेच्या दृष्टीने इष्ट आहे .
19. स्वत:चे पोहण्याच्या दृष्टीने क्षमतेबद्दल आत्मविश्वास निर्माण होईपर्यंत तलावाच्या मध्यभागी पोहण्याचे टाळावे.
20. पोहण्यापुर्वी प्रमाणापेक्षा जास्त खाऊ नये .त्यामुळे पाण्यात स्नायू युक्त गोळे येणे शक्यता असते. भरल्यापोटी पोहणे टाळावे.

21.पोहण्यासाठी पाण्यात उतरण्यापुर्वी शरीरात योग्य ते तापमान निर्माण होण्यासाठी योग्य तेवढा व्यायाम करावा .परंतू इतर खेळ खेळल्याने शरीराचे तापमान प्रमाणाबाहेर वाढले असताना व दमलेले असताना पोहण्यासाठी पाण्यात उतरणे धोक्याचे असते.

22.उष्णतेच्या एकदम बदलामुळे स्नायूत गोळे येणे शक्य असते .म्हणूनच योग्य आराम घेऊन व तापमान कमी झाल्यावर व थकवा गेल्यावर पोहावे.

23.एखादा पोहणारा पाण्यात संकटात असताना आपणास जर पाण्यातून कोणालाही वाचविण्याच्या पध्दतीची माहिती नसेल तर त्याला स्वत:च पाण्यातून बाहेर काढू नये . मात्र मदतीसाठी इतरांना जरूर बोलवावे.

24.आपणास ज्यावेळी उंचीवरून सुर उडी पाण्यात मारायची असेल, तेव्हा आपण त्या भागात दुसरा कोणी नाही याची खात्री करून घ्यावी .नाहीतर आपणास तसेच दुस-याना इजा होण्याची शक्यता नाकारता येत नाही .

25.गेस्ट तिकिट फक्त पोहता येत असेल तरच घ्यावे.

26.प्रत्येकाने स्वत:च्या जबाबदारीवरच पोहावे काही झाल्यास म.न.पा .जबाबदार राहणार नाही.

27.सर्वांनी स्विमिंग कॉश्युम वापरणे बंधनकारक आहे.

28.जलतरण तलाव विभागाच्या सभासदा व्यतिरिक्त कोणासही परवानगी शिवाय तलावाच्या आवारात प्रवेश करण्यास सक्त मनाई आहे.

29.ओळख पत्राशिवाय प्रवेश दिला जाणार नाही.

**30.**जलतरण तलाव स्पर्धेसाठी भाड्याने घेतल्यास स्वच्छतेकामी १०% रक्कम अनामत रक्कमेतून कपात केली जाईल.

**31.**म.न.पा.जलतरण तलावाच्या वेळा, साप्ताहिक सुट्टी ठरविण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना राहील.

**32.**सभासदांच्या जलतरण तलावाचा तिमाही,सहामाही,वार्षिक पासधारक होण्या साठी एप्रिल,जुलै,ऑक्टोबर ,जानेवारी या महिन्यांची वाट पहावी लागणार नाही .

३३. साप्ताहिक सुट्टी शुक्रवार राहील

**<u>उन्हाळी शिबीरासाठी म.न.पा .जलतरण तलाव भाडयाने देणे बाबत अटी शर्ती – खालील प्रमाणे दर व अटी शर्ती निश्चित केल्या आहेत.</u>**

1. कै.अण्णासाहेब मगर स्टेडियम जलतरण तलाव आरक्षण भाडे प्रतिदिनी प्रत्येक तासाकरिता र.रू.१,५००/- उर्वरीत सर्व जलतरण तलाव आरक्षण भाडे प्रतिदिनी प्रत्येक तासाकरिता र.रू.१,२००/- प्रमाणे एकूण आरक्षण कालावधीचे तासाचे हिशोबा प्रमाणे संपुर्ण भाडे या कार्यालयास आरक्षण असलेल्या तारखेपुर्वी रोख स्वरूपात संबंधित तलावाकडे प्रथम भरणा करावा लागेल.
2. पोहोण्याचे सराव प्रशिक्षणाचे वेळेस येणा-या मुला, मुलींच्या पालकांची संमती असल्याचे लेखी अर्ज तसेच प्रशिक्षणार्थी स्वत:च्या जबाबदारीवर सहभागी होत असल्याचे लेखी अर्ज या कार्यालयात शिबीरे सुरू होण्यापुर्वी द्यावा लागेल.

3. आरक्षणाची वेळ संपले नंतर त्वरीत तलाव परिसर सोडणे बंधन कारक आहे.
4. प्रशिक्षणांचे सरावाच्या वेळेस प्रशिक्षणार्थींना काही इजा अगर दुखापत झाल्यास किंवा जीवित हानी झाल्यास त्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.
5. प्रशिक्षण सरावाच्या वेळेस संस्थेने आपल्याकडे जीवरक्षक/जलतरण प्रशिक्षक सोबत आणणे आवश्यक आहे. त्यांनी सरावासाठी येणा-या मुला, मुलीची संख्या मोजून तलावामध्ये प्रवेश द्यावा. तसेच सराव संपले नंतर पुन्हा संख्या मोजून खात्री करून तलाव सोडावा.
6. सरावासाठी येणा-या मुला,मुलींची आवश्यक ती साधन सामग्री फ्लोट, टयुब, स्विमींग कास्टयुम इत्यादी सोबत आणणे आवश्यक आहे.
7. काही तांत्रिक बिघाडामुळे तलाव बंद ठेवावा लागल्यास त्याची सुचना अगोदर संबंधितांना देण्यात येईल मात्र सदरच्या दिवसाची भरलेली रक्कम कोणत्याही सबबीवर परत मिळणार नाही.
8. तलावामध्ये पोहोण्याचे सरावासाठी येणा-या प्रशिक्षणांर्थींची संख्या सुरक्षिततेच्या दृष्टिने मगर स्टेडियम तलावा करिता ८० व उर्वरीत जलतरण तलावा करिता ६० इतकीच मर्यादित ठेवण्यात यावी.
9. तलावासाठी असलेले नियम/अटी व शर्ती तसेच वेळोवेळी केलेले बदल संबंधितांवर बंधनकारक राहतील.
10. म.न.पा. हद्दीतील सध्या असलेल्या जलतरण तलावाची संख्या विचारात घेता यापुढे ५ ते १० वर्षात नविन तलाव बांधण्यात येऊ नये.
11. “अपंग विद्यालयातील विद्यार्थ्यांना / नागरिकांना पोहोण्याच्या सरावासाठी तलावावर विनामूल्य प्रवेश दिला जाईल. परंतु अशा अपंग विद्यार्थी / नागरिकाकडे ४० टक्के अपंगत्वाचे सक्षम वैद्यकीय अधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. याकामी त्यांनी विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. विद्यालयामार्फत एकत्रित विद्यार्थी पोहोण्याच्या सरावासाठी येण्यापूर्वी रीतसर अर्ज देऊन परवानगी घेऊन विद्यार्थ्यांना पोहोण्याच्या सरावासाठी आणणे आवश्यक आहे. त्यांची सर्व प्रकारची जबाबदारी संबंधित विद्यालयाची राहील.”
12. मतिमंद, अपंग ,मुकबधिर व अंध यांना विशेष सवलतीच्या दराने सकाळी ११-३० ते १२-३० या वेळेत सरावासाठी जलतरण तलाव उपलब्ध करून देता येईल.
13. मतिमंद, अपंग ,मुकबधिर व अंध विद्यालयातील विद्यार्ध्यांना पोहण्यासाठी येताना ४ मुलांच्या मागे एक शिक्षक असणे आवश्यक आहे. या विद्यार्थ्यांना सुरक्षितेच्या दृष्टीने पोहण्यासाठी टयुब व फ्लोट असणे आवश्यक आहे. तसेच सदर विद्यार्थ्यांची जबाबदारी संबंधित शाळेच्या शिक्षकांची व पालकांची राहिल.
14. मतिमंद, अपंग ,मुकबधिर व अंध विद्यालयातील विद्यार्ध्यांना पोहण्यासाठी येताना वैद्यकीय दाखला सोबत असणे गरजेचे आहे.

**११) म.न.पा. स्केटिंग ग्राऊंड ,रोलर स्केटिंग ग्राउंड**

१) डॉ.हेडगेवार क्रीडा संकुल स्केटिंग ग्राऊंड, अजमेरा कॉलनी, पिंपरी ४११ ०१८.
२) कै.मिनाताई ठाकरे स्केटिंग ग्राऊंड, यमुनानगर, निगडी
३) मोहननगर स्केटिंग ग्राऊंड, चिंचवड

स्केटिंग ग्राऊंडसाठी सर्व साधारण अटी, नियम व शास्ती म.न.पा. बहूउद्देशिय मैदाने आरक्षण पान क्र.३० ते ३४ प्रमाणे राहतील.

**<u>म.न.पा .स्केटिंग ग्राऊंड भाडे कराराने चालविण्यास देणेबाबत अटी शर्ती</u> -**

1. स्केटिंग ग्राऊंडची वेळ सकाळी ७.०० ते सायं. ६.०० या कालावधीत राहील .परंतु सायं. ६.०० नंतर स्केटिंग ग्राऊंडचा वापर करता येणार नाही.
2. सदरची संस्था /मंडळ /क्लब हे नोदणीकृत संस्था असावी.
3. स्केटिंग ग्राऊंड भाडयाने चालविण्याचा करारनामा ११ महिन्यांचा राहील, तसेच मुदतवाढ देणे किंवा नाकारणे याकरीता मंडळ /संस्था /क्लबचे कामकाज विचारात घेऊन पुढील मुदतवाढीचे अधिकार म.न.पा.स राहतील.
4. स्केटिंग ग्राऊंडच्या इमारतीमध्ये व इमारत परीसरामध्ये स्केटिंग व्यतिरिक्त कोणताही वापर करता येणार नाही., स्केटिंग ग्राऊंडचे काही नुकसान झाल्यास त्याचे दुरूस्तीचा खर्च संबंधित संस्था /मंडळ /क्लब यांना करावा लागेल.
5. स्केटिंग ग्राऊंड चालविणेस दिलेल्या मंडळ /संस्था /क्लबला स्केटिंग ग्राऊंड वर मालकी हक्क सांगता येणार नाही .स्केटिंग ग्राऊंडची सर्वस्वी मालकी हक्क म.न.पा.चा राहील.
6. वेळोवेळी महानगरपालिका ज्या नियम व अटी शर्ती लागू करेल त्याचे पालन करणे संबंधित संस्था /मंडळ /क्लब यांना बंधनकारक राहील.
7. स्केटिंग ग्राऊंड इतर कोणत्याही कारणासाठी वापरता येणार नाही.
8. स्केटिंग ग्राऊंडचा वापर इतर कारणासाठी केल्याचे किंवा इतर गैरप्रकार जर म.न.पा . अधिका-यांचे निदर्शनास आल्यास संबंधित संस्था /मंडळ /क्लब यांना कोणतीही पूर्व सूचना किंवा नोटीस न देता संस्थेचा करारनामा रद्द करणेत येईल व झालेल्या नुकसानीची भरपाई अनामत रकमेतून वसुल केली जाईल.
9. ज्या स्केटिंग ग्राऊंड ठिकाणी या पूर्वीच पाण्याची व्यवस्था आहे तेथील पाणी संबंधित संस्थेस /मंडळ /क्लबला मोफत वापरता येईल, तथापी ज्या ठिकाणी पाण्याची व्यवस्थी नाही तेथे म.न.पा .च्यावतीने पाण्याची व्यवस्था केली जाणार नाही.
10. मंडळाने /संस्थेने /क्लबने स्टॅप पेपरवर स्केटिंग ग्राऊंड नादुरूस्ती केल्यास त्याची मधील साहित्या बाबत लेखी हमी द्यावी लागेल.
11. मंडळ /संस्था /क्लब ला ११ महिन्याचा करारनामा करून द्यावा लागेल.
12. स्केटिंग ग्राऊंडची संपूर्ण सुरक्षा राखण्याची जबाबदारी संबंधीत संस्था /मंडळ/क्लब यांची राहील.
13. म.न.पा .शाळेतील किमान २० मुलांना मोफत स्केटिंग प्रशिक्षण देण्याची जबाबदारी संबधीत संस्था/मंडळ /क्लब यांची राहील., त्यासाठी स्वतंत्र वेळ ठरवून द्यावी लागेल.
14. स्केटिंग ग्राऊंडसाठी प्रशिक्षक नेमण्याची जबाबदारी संबंधीतांची राहील.

15.म.न.पा .स्केटिंग ग्राऊंड व परीसराची संपूर्ण देखभाल व स्वच्छता ठेवण्याची जबाबदारी संबंधित संस्था /मंडळ /क्लब यांची राहील.

16.स्केटिंग ग्राऊंडचे सभासदत्व देणेकामी फी वसुलीचा अधिकार संबंधीत संस्था/मंडळ / क्लब यांना राहील.

17.स्केटिंग ग्राऊंडसाठी आवश्यक असलेले प्रशिक्षक, रखवालदार इ .कर्मचारी नेमण्याची व त्यांचे मानधन अदा करण्याची जबाबदारी संबंधित संस्था /मंडळ/क्लब यांची राहील.

18.स्केटिंग ग्राऊंड परीसरात मद्यपान धुम्रपान करण्यास सक्त मनाई राहील.

19.स्केटिंग ग्राऊंड हे ११ महिन्यासाठी भाडे कराराने चालविण्यास देण्यात येईल .ठेक्याची मुदत संपल्यानंतर पुढील मुदतवाढ देण्याचा अथवा ठेका मुदती पुर्वी रद्द करण्याचा अधिकार म.न.पा .स राहील.

20.स्केटिंग ग्राऊंड संबंधी अटी /शर्तींचा भंग झाल्यास, गैरवर्तन निदर्शनास आल्यास अथवा गंभीर तक्रार आल्यास कोणतीही पूर्व सुचना न देता ठेका रद्द करण्यात येईल.

21.निविदेनुसार दरमहा ठरलेले भाडे क्रीडा विभाग, कै.अण्णासाहेब मगर स्टेडीयम,नेहरूनगर येथे भरून त्याची पावती सादर करावी लागेल., २ महिन्यांपेक्षा जास्त कालाबधीचे भाडे थकल्यास ठेका रद्द करून अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

22.स्केटिंग ग्राऊंडची पाहणी करण्याची महापालिकेच्या सक्षम अधिकाऱ्यास मुभा राहील, त्यास संपूर्ण सहकार्य करणे हे स्केटिंग ग्राऊंड चालविणाऱ्या संस्था/मंडळ /क्लब यांचेवर बंधनकारक राहील.

23.स्केटिंग ग्राऊंड संबंधी असलेल्या अटी /शर्तीमध्ये वाढ करणे अथवा शिथिल करण्याचे अधिकार मा .आयुक्त यांना राहील.

24.स्केटिंग ग्राऊंड परीसरात इतर कोणताही व्यवसाय करता येणार नाही.

25.स्केटिंग ग्राऊंड एक तास -दोनतास करीता शिबिरासाठी इतर संस्थेस भाडयाने देता येईल .तथापी कोणत्याही समारंभासाठी स्केटिंग ग्राऊंड/परीसर भाडयाने देता येणार नाही .अगर स्वतःलाही इतर कोणतेही समारंभ त्या ठिकाणी करता येणार नाही.

26.मैदान स्पर्धेसाठी भाड्याने घेतल्यास स्वच्छतेकामी १०% रक्कम अनामत रकमेतून कपात केली जाईल.

27.अर्जदाराला स्केटिंग मैदान आरक्षण काळात विजेचा वापर करावयाचा असल्यास त्याची पुर्व परवानगी संबंधित प्रभाग विद्युत विभाग यांची घेऊन मिटर रिडींग पाहून विद्युत विभाग ठरवून देतील त्या प्रमाणे बिल संबंधित विद्युत विभागात भरावे लागेल.

28.संस्थेने नेमलेल्या कर्मचा-यांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन देणे. त्यांचा विमा उतरविणे, नियमानुसार भविष्य निर्वाह निधी रक्कम भरणे, शासनाने वेळोवेळी लागू केलेले कर इ. संबंधित संस्थेवर बंधनकारक राहिल.

29.म.न.पा.ने जर सदर ठिकाणी स्पर्धा आयोजित केल्यास त्या काळात क्रीडा सुविधा विना मुल्य उपलब्ध करून द्यावी लागेल.

**१२) म. न. पा. लॉन टेनिस कोर्ट –**

१) से. नं. २५ निगडी - प्राधिकरण लॉन टेनिस कोर्ट
२) से. नं. २६ निगडी - प्राधिकरण लॉन टेनिस कोर्ट
३) मोहननगर लॉन टेनिस कोर्ट , चिंचवड
४) श्री. संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल लॉन टेनिस कोर्ट, इंद्रायणीनगर, भोसरी
५) सांगवी लॉन टेनिस कोर्ट
६) पिंपळ गुरव लॉन टेनिस कोर्ट

लॉन टेनिस कोर्टसाठी सर्व साधारण अटी, नियम व शास्ती बॅडमिंटन कोर्ट पान क्र.४४ ते ४६प्रमाणे राहतील.

1. कोर्ट स्पर्धेसाठी भाड्याने घेतल्यास स्वच्छतेकामी १०% रक्कम अनामत रक्कमेतून कपात केली जाईल.
2. स्थानिक खेळाडुंच्या प्रशिक्षणासाठी सकाळी ९ ते १० ही वेळ राखीव ठेवण्यात येईल.
3. लॉन टेनिस कोर्ट ज्याठिकाणी २ किंवा ४ कोर्ट असतील त्याठिकाणी ५०% कोर्टचा वापर प्रशिक्षणाकरीता ५०% वापर नागरिक, खेळाडू यांना सरावासाठी करता येईल.
4. लॉन टेनिस कोर्ट प्रशिक्षणाकामी देताना संबंधित प्रशिक्षकाकडे असणारी गुणवत्ता लक्षात घेऊनच टेनिस कोर्ट प्रशिक्षणाकरीता भाडेतत्वावर दिले जाईल.
5. लॉन टेनिस कोर्टवर प्रशिक्षण करावयाचे झाल्यास एका वेळी एका बॅच मध्ये १० विद्यार्थी असतील.
6. अर्जदाराला टेनिस कोर्ट आरक्षण काळात विजेचा वापर करावयाचा असल्यास त्याची पुर्व परवानगी संबंधित प्रभाग विद्युत विभाग यांची घेऊन मिटर रिडींग पाहून विद्युत विभाग ठरवून देतील त्या प्रमाणे बिल संबंधित विद्युत विभागात भरावे लागेल.
7. पिंपरी चिंचवड लॉन टेनिस असोसिएशन व म.न.पा.च्या संयुक्त विद्यमाने स्पर्धा घ्यावयाची झाल्यास सकाळी ७ ते रात्री ८ पर्यंत विनामुल्य देण्यात येईल.
8. जर खाजगी स्वरूपाची स्पर्धा असेल तर भाडेदर म.न.पा. नियमाप्रमाणे भरावे लागेल व विजेचा वापर करावयाचा असल्यास त्याची पुर्व परवानगी संबंधित प्रभाग विद्युत विभाग यांची घेऊन मिटर रिडींग पाहून विद्युत विभाग ठरवून देतील त्या प्रमाणे बिल संबंधित विद्युत विभागात भरावे लागेल.

**१३) म.न.पा.बॅडमिंटन हॉल.**

१. पवनानगर बॅडमिंटन हॉल, चिंचवड
२. थेरगांव बॅडमिंटन हॉल
३. मदनलाल धिंग्रा ,प्रधिकरण से नं २५ बॅडमिंटन हॉल, निगडी
४. प्रधिकरण से.नं २५ आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ
५. संत तुकारामनगर बॅडमिंटन हॉल, पिंपरी
६. डॉ. हेडगेवार क्रीडा संकुल अजमेरा कॉलनी अजमेरा बॅडमिंटन हॉल, पिंपरी
७. इंद्रायणीनगर बॅडमिंटन हॉल, भोसरी
८. गव्हाणेवस्ती लांडेवाडी बॅडमिंटन हॉल, भोसरी
९. पिंपरीगांव बॅडमिंटन हॉल, पिंपरी
१०. श्री संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल बॅडमिंटन हॉल, इंद्रायणीनगर, भोसरी, ४ कोर्ट
११. छत्रपती शिवाजी महाराज बॅडमिंटन हॉल यमुनानगर, निगडी
१२. महात्मा फुले नगर बॅडमिंटन हॉल, चिंचवड (नियोजित)
१३. सांगवी बॅडमिंटन हॉल
१४. पिंपळे गुरव बॅडमिंटन हॉल

**म.न.पा बॅडमिंटन हॉल ,लॉन टेनिस, स्क्वॅश कोर्ट, टेबल टेनिस सराव ,स्पर्धेसाठी आरक्षणा बाबत खालील प्रमाणे अटी व नियम राहतील.**

1. म.न.पा.चे बॅडमिंटन हॉल ,लॉन टेनिस, स्क्वॅश कोर्ट, टेबल टेनिस स्पर्धेसाठी, आरक्षित करण्यापुर्वी किमान १० दिवस अगोदर अर्ज करणे आवश्यक आहे. अपवादात्मक परिस्थितीत मा.अति.आयुक्त यांचे मान्यतेने किमान ३ दिवसापुर्वी अर्ज आल्यास मैदाने सरावासाठी देणे बाबत विचार केला जाईल. म.न.पा.चे बॅडमिंटन हॉल ,लॉन टेनिस, स्क्वॅश कोर्ट, टेबल टेनिस सरावासाठी ऑनलाईन आरक्षणासाठी निश्चित केलेल्या अटी – शर्ती खेळाडूंवर बंधनकारक राहतील.
2. बॅडमिंटन हॉल ,लॉन टेनिस, स्क्वॅश कोर्ट, टेबल टेनिस स्पर्धेसाठी आरक्षण केल्यानंतर आरक्षण रद्द करावयाचे झाल्यास किमान ७ दिवस अगोदर लेखी अर्ज सादर करणे आवश्यक आहे. तरच आरक्षण शुल्क परत केले जाईल. अन्यथा एकदा भरलेल आरक्षण शुल्क कोणत्याही सबबीवर परत केले जाणार नाही.
3. बॅडमिंटन हॉल ,लॉन टेनिस, स्क्वॅश कोर्ट, टेबल टेनिस स्पर्धेसाठी भाड्याने देण्याचे अधिकार मा.सहाय्यक आयुक्त (क्रीडा) यांना राहिल. अपवादात्मक परिस्थितीत मा.सहाय्यक आयुक्त (क्रीडा) यांचे सदर अधिकार क्रीडा अधिकारी प्रदान करतील.
4. बॅडमिंटन हॉल ,लॉन टेनिस, स्क्वॅश कोर्ट, टेबल टेनिस स्पर्धेसाठी आरक्षणासाठी लेखी अर्ज करणे आवश्यक आहे.

5. बॅडमिंटन हॉल ,लॉन टेनिस, स्क्वॅश कोर्ट, टेबल टेनिस स्पर्धेसाठी, सरावासाठी आरक्षण शुल्क व अनामत रक्कम या बाबत माहीती भाग ४ मध्ये दिली आहे.
6. सभासदांना बॅडमिंटन हॉल ,लॉन टेनिस, स्क्वॅश कोर्ट, टेबल टेनिस स्पर्धेसाठी , सरावासाठी कोर्टमध्ये प्रवेश करणे पुर्वी आरक्षण पावती अथवा ओळखपत्र दाखविणे बंधनकारक आहे.
7. सभासदांने बॅडमिंटन हॉल ,लॉन टेनिस, स्क्वॅश कोर्ट, टेबल टेनिस स्पर्धेसाठी, सरावासाठी येताना स्वत:चे आवश्यक असलेले सर्व साहित्य आणणे आवश्यक आहे.
8. खाजगी किंवा सरकारी संस्था यांनी स्पर्धेकरीता आरक्षण करताना किमान १०दिवस अगोदर लेखी अर्ज करणे आवश्यक आहे.
9. बॅडमिंटन हॉल ,लॉन टेनिस, स्क्वॅश कोर्ट, टेबल टेनिस चे सभासद होताना किमान २ (दोन), अथवा ४ (चार), ६ (सहा), ८ (आठ) अशी सभासद संख्या असणे आवश्यक आहे.
10. सभासदांना महापालिकेने नेमुन दिलेल्या वेळेतच सराव करणे त्यांचेवर बंधनकारक राहिल.
11. कोणत्याही सभासदास बॅडमिंटन कोर्टमध्ये अपघात, दुखापत अथवा जिवितहानी झालेस त्याची जबाबदारी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेवर राहणार नाही.
12. बॅडमिंटन हॉल ,लॉन टेनिस, स्क्वॅश कोर्ट, टेबल टेनिस स्पर्धेसाठी, सरावासाठी प्रवेश करणा-या कोणतेही व्यक्तीने / सभासदाने मौल्यवान वस्तू सोबत आणू नये. कोणत्याही व्यक्तीच्या /सभासदांच्या वस्तू चोरीस गेल्यास त्याची जबाबदारी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेवर राहणार नाही.
13. सभासदांनी भरलेल्या वर्गणीचा कालावधी संपले नंतर सभासदत्व रद्द होईल.
14. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने नेमुन दिलेली वेळ संपलेनंतर बॅडमिंटन हॉल ,लॉन टेनिस, स्क्वॅश कोर्ट, टेबल टेनिस केंद्र त्वरित रिकामा करून घ्यावा लागेल.
15. बॅडमिंटन हॉल ,लॉन टेनिस, स्क्वॅश कोर्ट, टेबल टेनिस केंद्रामध्ये धुम्रपान इ. गोष्टी करू नये.
16. बॅडमिंटन हॉल ,लॉन टेनिस, स्क्वॅश कोर्ट, टेबल टेनिस केंद्रा मधील साहित्याची नासधूस अथवा मोडतोड केल्यास त्याची संपूर्ण भरपाई स्वखर्चाने सभासदास करून द्यावी लागेल.
17. बॅडमिंटन हॉल ,लॉन टेनिस, स्क्वॅश कोर्ट, टेबल टेनिस केंद्राची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस जेव्हा आवश्यकता असेल त्या वेळेस पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत बॅडमिंटन कोर्ट उपलब्ध करून द्यावा लागेल. त्या वेळेत सभासदास सराव करता येणार नाही. व फी परत मिळणार नाही.

18.बॅडमिंटन हॉल ,लॉन टेनिस, स्क्वॅश कोर्ट, टेबल टेनिस केंद्रामध्ये खेळताना स्पोर्टस शुज वापरणे आवश्यक आहे. तसेच खेळण्यापुर्वी ते स्वच्छ करून घेणे आवश्यक राहिल.

19.ज्या सभासदांनी आरक्षण केले आहे. त्या सभासदांनाच खेळण्यास परवानगी राहिल. त्यांच्या नावांवर दुस-या व्यक्तीस खेळता येणार नाही.

20.पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अधिका-यांनी वेळोवेळी दिलेल्या सूचना व अटी सभासदांवर बंधनकारक राहतील.

21.पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने दिलेल्या सूचनांचा अथवा नियम व अटींचा भंग केल्यास सभासदांचे सभासदत्व रद्द केले जाईल.

22.बॅडमिंटन हॉल ,लॉन टेनिस, स्क्वॅश कोर्ट, टेबल टेनिस केंद्रामध्ये गैरकृत्य, गैरवर्तन अथवा नागरिकांना त्रास होईल असे वर्तन करण्यात येऊ नये.

23.बॅडमिंटन हॉल ,लॉन टेनिस, स्क्वॅश कोर्ट, टेबल टेनिस केंद्राची साप्ताहीक सुट्टी व वेळा ठरविण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना राहील.

24.अटी व नियमांचे पालन न करणा-या सभासदांचे सभासदत्व रद्द केले जाईल.

25.अटी व नियमांमध्ये बदल करण्याचे अधिकार मा. आयुक्त अथवा त्यांनी नेमून दिलेल्या अधिका-यास राहतील.

26.बॅडमिंटन हॉल ,लॉन टेनिस, स्क्वॅश कोर्ट, टेबल टेनिस केंद्र काही कारणास्तव बंद ठेवण्याचा अधिकार मा. आयुक्त यांना राहिल.

27.बॅडमिंटन हॉल ,लॉन टेनिस, स्क्वॅश कोर्ट, टेबल टेनिस केंद्राचे ऑनलाईन आरक्षण मुदत संपण्याच्या शेवटच्या आठवड्यात पुढिल आरक्षणा बाबत वृत्तपत्रात जाहीर प्रसिद्धि दिली जाईल.

28.म..न.पा., खाजगी शालेय विद्यार्थी, राज्य, राष्ट्रीय खेळाडू यांना बॅडमिंटन हॉल ,लॉन टेनिस, स्क्वॅश कोर्ट, टेबल टेनिस केंद्रामध्ये प्रशिक्षणासाठी स.९.०० ते स.१०.०० ही वेळ राखीव ठेवण्यात येईल. परंतू याबाबत ३ महिने आगोदर लेखी अर्ज देणे आवश्यक आहे.

29.सराव व स्पर्धेसाठी कोर्टचे आरक्षण केल्यानंतर अनामत रक्कमेची पुन्हा मागणी केल्यास त्यातुन १० टक्के रक्कम स्वच्छतेपोटी कपात केली जाईल. अनामत परतावासाठी अर्ज व मुळ अनामत पावती सादर करणे आवश्यक आहे.

**<u>म.न.पा .बॅडमिंटन हॉल भाडे कराराने चालविण्यास देणेबाबत अटी शर्ती -</u>**

1. बॅडमिंटनहॉलची वेळ सकाळी ६.०० ते रात्री ९.०० या कालावधीत राहील .परंतु रात्री ९.०० नंतर बॅडमिंटनहॉलचा वापर करता येणार नाही.
2. बॅडमिंटनहॉल साहित्याची मोडतोड केल्यास त्याची भरपाई देण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची /मंडळाची /क्लबची राहील.
3. सदरची संस्था/मंडळ /कल्ब हे नोदणीकृत संस्था असावी.
4. जी संस्था/मंडळ /क्लब म.न.पा .कडे जास्तीत जास्त मासिक भाडे देईल त्या संस्थेस /मंडळास /क्लबला बॅडमिंटनहॉल कराराने चालविणेस देण्यात येईल, या कामी म.न.पा. नियमा नुसार अनामत रक्कमेचा एफ.डी.आर. म.न.पा. कडे जमा करावा लागेल.

5. बॅडमिंटनहॉल चालविण्याचा करारनामा ११ महिन्यांचा राहील, तसेच मुदतवाढ देणे किंवा नाकारणे याकरीता मंडळ /संस्था /क्लबचे कामकाज विचारात घेऊन पुढील मुदतवाढीचे अधिकार म.न.पा.स राहतील.
6. बॅडमिंटनहॉल इमारतीमध्ये व इमारत परीसरामध्ये बॅडमिंटन व्यतिरिक्त कोणताही वापर करता येणार नाही., तथापी इमारतीचे काही नुकसान झाल्यास )दारे, खिडक्या इ (.त्याचे दुरूस्तीचा खर्च संबंधित संस्था/मंडळ/क्लब यांना करावा लागेल.
7. बॅडमिंटनहॉल चालविणेस दिलेल्या मंडळ /संस्था /क्लबला बॅडमिंटनहॉलवर मालकी हक्क सांगता येणार नाही .बॅडमिंटनहॉलचा सर्वस्वी मालकी हक्क म.न.पा.चा राहील.
8. वेळोवेळी महानगरपालिका ज्या नियम व अटी शर्थी लागू करेल त्याचे पालन करणे संबंधित संस्था /मंडळ /क्लब यांना बंधनकारक राहील.
9. बॅडमिंटनहॉलचा विजेचा खर्च )मीटर रिडींगप्रमाणे (संबंधित संस्था /मंडळ क्लब यांना करावा लागेल.
10. बॅडमिंटनहॉल इतर कोणत्याही कारणासाठी वापरता येणार नाही.
11. बॅडमिंटनहॉल मधील साहित्याची विल्हेवाट लावणे /चोरीला जाणे तसेच बॅडमिंटन हॉल साहित्य कारणाशिवाय तूट फुट होणे, अगर बॅडमिंटन हॉलचा वापर इतर कारणासाठी केल्याचे किंवा इतर गैरप्रकार जर म.न.पा .अधिकाऱ्यांचे निदर्शनास आल्यास संबंधित संस्था /मंडळ /क्लब यांना कोणतीही पूर्व सूचना किंवा नोटीस न देता संस्थेचा करारनामा रद्द करणेत येईल व झालेल्या नुकसानीची भरपाई अनामत रकमेतून वसुल केली जाईल.
12. ज्या बॅडमिंटनहॉल मध्ये या पूर्वीच पाण्याची व्यवस्था आहे तेथील पाणी संबंधित संस्थेस /मंडळ /क्लबला मोफत वापरता येईल, तथापी ज्या ठिकाणी पाण्याची व्यवस्थी नाही तेथे म.न.पा.च्यावतीने पाण्याची व्यवस्था केली जाणार नाही.
13. मंडळाने /क्लबने मनपा नियमानुसार स्टॅप पेपरवर बॅडमिंटनहॉलमधील साहित्याबाबत लेखी हमी द्यावी लागेल.
14. मंडळाने /संस्थेने /क्लबने ११ महिन्याचा करारनामा करून द्यावा लागेल.
15. बॅडमिंटनहॉलची संपूर्ण सुरक्षा राखण्याची जबाबदारी संबंधीत संस्था /मंडळ /क्लब यांची राहील.
16. म.न.पा.शाळेतील किमान २० मुलांना मोफत प्रशिक्षण देण्याची जबाबदारी संबधीत संस्था /मंडळ /क्लब यांची राहील., त्यासाठी स्वतंत्रवेळ ठरवून द्यावी लागेल.
17. बॅडमिंटनहॉलसाठी प्रशिक्षक नेमण्याची जबाबदारी संबंधीतांची राहील.
18. म.न.पा .बॅडमिंटनहॉल व परीसराची संपूर्ण देखभाल व स्वच्छता ठेवण्याची जबाबदारी संबंधीत संस्था /मंडळ /क्लब यांची राहील.
19. बॅडमिंटन हॉलचे सभासदत्व देणेकामी फी वसुलीचा अधिकार संबंधीत संस्था /मंडळ / क्लब यांना राहील.
20. बॅडमिंटनहॉलसाठी आवश्यक असलेले प्रशिक्षक, रखवालदार इ .कर्मचारी नेमण्याची व त्यांचे मानधन अदा करण्याची जबाबदारी संबंधित संस्था /मंडळ /क्लब यांची राहील.

21.बॅडमिंटनहॉल मधील साहित्याची चोरी झाल्यास किंवा मालमत्तेचे नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी बॅडमिंटन हॉल चालविणाऱ्या संस्था /मंडळ /क्लब यांची राहिल .म.न.पा .ठरविल त्याप्रमाणे त्याची नुकसान भरपाई द्यावी लागेल.
22.बॅडमिंटनहॉल परीसरात मद्यपान धुम्रपान करण्यास सक्त मनाई राहील.
23.बॅडमिंटनहॉल हा ११ महिन्यासाठी भाडे कराराने चालविण्यास देण्यात येईल .ठेक्याची मुदत संपल्यानंतर पुढील मुदतवाढ देण्याचा अथवा ठेका मुदतीपुर्वी रद्द करण्याचा अधिकार म.न.पा.स राहील.
24.बॅडमिंटनहॉलसंबंधी अटी/शर्तींचा भंग झाल्यास, गैरवर्तन निदर्शनास आल्यास अथवा गंभीर तक्रार आल्यास कोणतीही पूर्व सुचना न देता ठेका रद्द करण्यात येईल.
25.निविदेनुसार दरमहा ठरलेले भाडे क्रीडा विभाग, कै.अण्णासाहेब मगर स्टेडीयम, नेहरूनगर येथे भरून त्याची पावती सादर करावी लागेल., २ महिन्यांपेक्षा जास्त कालाबधीचे भाडे थकल्यास ठेका रद्द करून अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.
26.बॅडमिंटनहॉलची पाहणी करण्याची महापालिकेच्या सक्षम अधिकाऱ्यास मुभा राहील, त्यास संपूर्ण सहकार्य करणे हे बॅडमिंटनहॉल चालविणाऱ्या संस्था /मंडळ /क्लब यांचेवर बंधनकारक राहील.
27.बॅडमिंटनहॉल संबंधी असलेल्या अटी /शर्तीमध्ये वाढ करणे अथवा शिथिल करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना राहील.
28.बॅडमिंटनहॉल परीसरात इतर कोणताही व्यवसाय करता येणार नाही .
29.बॅडमिंटनहॉल तास-दोनतास करीता शिबिरासाठी इतर संस्थेस भाडयाने देता येईल . तथापी कोणत्याही समारंभासाठी बॅडमिंटनहॉल/परीसर भाडयाने देता येणार नाही . अगर स्वतःलाही इतर कोणत्या कारणासाठी वापरताना येणार नाही .
30.बॅडमिंटन कोर्ट ऑनलाईन बुक केले तर, ४ खेळाडूंची नावे देणे बंधनकारक राहील. ज्यांच्या नावाने कोर्ट बुक केले आहे ती व्यक्ती सलग पाच दिवस कोर्टवर खेळयाकरीता नसेल तर सदरच्या कोर्टचे आरक्षण रद्द केले जाईल.
31.बॅडमिंटन कोर्ट शालेय विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणाकरीता सकाळी ७.०० ते ९.०० व सांय.६.०० ते ७.०० या वेळेत आरक्षित केले जाईल. जर प्रशिक्षणाकरीता विद्यार्थी नसतील तर नागरिकांना उपलब्ध करून दिले जाईल.
32.संस्थेने नेमलेल्या कर्मचा-यांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन देणे. त्यांचा विमा उतरविणे, नियमानुसार भविष्य निर्वाह निधी रक्कम भरणे, शासनाने वेळोवेळी लागू केलेले कर इ. संबंधित संस्थेवर बंधनकारक राहिल.

**<u>१४) म.न.पा .स्क्वॅश कोर्ट.</u>**

**स्क्वॅश कोर्टसाठी सर्व साधारण अटी, नियम व शास्ती बॅडमिंटन हॉल पान** क्र.४४ ते ४६ **प्रमाणे राहतील**.

**<u>१५) टेबल टेनिस सेंटर</u>**

**टेबल टेनिस सेंटर सर्व साधारण अटी, नियम व शास्ती बॅडमिंटन हॉल पान** क्र.४४ ते ४६ **प्रमाणे राहतील.**

**<u>१६) म.न.पा .थेरगाव बोटक्लब.</u>**

**<u>थेरगाव येथील बोटक्लब ११ महिने भाडे तत्वावर चालविण्यास देणेकामी अटी व शर्ती</u>**

थेरगाव येथील बोटक्लब भाडे कराराने चालविणेस देणेकामी ई निविदा नोटीस प्रसिध्द करून दर मागविणेत येतील.

1. थेरगांव बोटक्लब चालविण्यास जो ठेकेदार सर्वात जास्त भाडे देईल त्याची निविदा ११ महिने
   भाडे तत्वावर मंजूर करण्यासाठी विचारात घेतली जाईल.
2. अटी युक्त दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.
3. निविदे सोबत ग्राह्य आयकर विवरणपत्र, इन्कम टॅक्स क्लीअरंस सर्टिफिकेट,जोडणे आवश्यक आहे.
4. निविदा मंजूर झाल्यानंतर मनपाच्या नियमानुसार  स्टॅप पेपरवर स्वखर्चाने करारनामा लिहून द्यावा लागेल .
5. निविदा मंजूर धारकाने करारनामा व अनामत रक्कमेची पुर्तता या कार्यालयाचे पत्र मिळाले नंतर ८ दिवसांचे आत करणे आवश्यक आहे .तसे न केल्यास संबंधीतांची निविदा रद्द करून पुढील निविदाधारकांचा विचार केला जाईल.
6. बोट क्लब चालविण्यासाठी किमान ११ महिने कालावधी राहील .
7. बोटक्लबसाठी आवश्यकतेनुसार बोटीची उपलब्धता करून देणे, त्याचेकडे रेस्क्यु बोट असणे हे चालविण्यास घेणार यांचेवर बंधनकारक राहील.
8. बोटक्लब चालविण्यास आवश्यक असलेले सर्व प्रकारचे परवाने घेण्याची जबाबदारी बोटक्लब चालविण्यास घेणार यांची राहील.
9. बोटक्लबसाठी आवश्यक असलेले तत मार्गदर्शक, जीवरक्षक )लाईफ गार्ड (इतर आवश्यक मनुष्यबळ नियुक्त करण्याची जबाबदारी बोटक्लब चालविण्यास घेणार यांची राहील.
10. नदीच्या पात्राची लांबी रूंदी पाण्यात असलेले खडक, खोली व अन्य धोकादायक बाबी यांचा अभ्यास करून बोटींगच्या वेळी कोणत्याही प्रकारची हानी होणार नाही याची दक्षता चालविण्यास घेणार यांनी घ्यावयाची आहे.
11. नदीच्या पाण्याची स्वरूप त्याची पातळी लक्षात येवून )मुख्यत्वे पावसाळयात (बोटींगसाठी वर्षभराकरीता कार्यक्रम (Annual Program) चालविण्यास घेणार यांनी निश्चित करावयाचा आहे .मात्र पुर वा इतर तत्सम कारणांकरीता बोटक्लब नागरीकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने बंद ठेवावा लागेल.

12.बोटींगसाठी पाण्यात उतरणा-या प्रत्येक खेळाडू, विद्यार्थी व नागरीक यांच्या जीवरक्षणाची जबाबदारी चालविण्यास घेणार यांच्यावर असल्याने त्यांनी प्रत्येकास लाईफ जॅकेट उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे .लाईफ जॅकेट शिवाय कोणालाही बोटीत बसविता येणार नाही.

13.बोटक्लब चालविण्यास घेणार यांना खाजगी क्लास चालवून अन्य विद्यार्थ्यांना बोटींगचे प्रशिक्षण देता येईल व त्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांकडून अल्प स्वरूपात शुल्क घेता येईल .प्रत्येक वर्षी महानगरपालिकेतील किमान ५० विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण द्यावयाचे आहे व त्यातून कुशल खेळाडूंची टिम तयार करणे आवश्यक आहे.

14.पिंपरी- चिंचवड शहरातील खेळांडूची बोटींग प्रशिक्षणासाठी निवड करताना सैनिकी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सी.एम.ई. तज्ञांची मदत घ्यावी व निवड झालेल्या विद्यार्थ्यांना तज्ञांकडून प्रशिक्षण देणे चालविण्यास घेणार यांच्यावर बंधनकारक राहील.

15.बोटींग क्लबसाठी प्रशिक्षणार्थी म्हणून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना स्वत:ची पालकांची तसेच संबंधीत विद्यालयाची लेखी संमती असल्याशिवाय प्रशिक्षणासाठी प्रवेश दिला जाणार नाही याबाबतची जबाबदारी चालविण्यास घेणार यांची राहील.

16.म.न.पा.ने नौकानयनाची स्पर्धा आयोजित केल्यास अशावेळी म.न.पा .स विनामोबदला बोटक्लब उपलब्ध करून द्यावा लागेल.

17.बोटक्लबची जागा परिसर चालविण्यास घेणार यांनी नियिमतपणे स्वच्छ कायम आकर्षक व सुशोभीत ठेवणे आवश्यक आहे.

18.बोटक्लब चालविण्यासाठी महापालिकेकडून कोणत्याही स्वरूपाचे आर्थिक सहाय्य चालविण्यास घेणार यांना मिळणार नाही.

19.बोटक्लबचे उदिष्ठपूर्तीसाठी चालविण्यास घेणार यांच्याकडून होणा-या प्रयत्नांना वेळोवेळी म.न.पा .अधिका-याकडून आढावा घेतला जाईल .व चालविण्यास घेणार यांचे कामकाज असमाधानकारक आढळून आल्यास मा.आयुक्त कधीही ठेका रद्द करू शकतील.

20.बोटक्लबची देखभाल त्यांची संपूर्ण निगा, किरकोळ दुरूस्त्या, प्रकल्पाचे उद्दिष्ठ पूर्ण होण्यासाठी महापालिकेने दिलेल्या सुचनांची अंमलबजावणी करणे चालविण्यास घेणार यांचेवर बंधनकारक राहील.

21.नदी वापराबाबत शासनाची तसेच रितसर आवश्यक त्या परवानगी घेण्याची जबाबदारी चालविण्यास घेणार यांची राहील .आवश्यक ती शासकीय परवानगी मिळविण्यासाठी महापालिका संबंधित संस्थेस सहकार्य करेल तसेच याकामी शासनास अदा करावयाच्या शुल्क रॉयल्टी हे चालविण्यास घेणार यांना भरावे लागतील.

22.बोटक्लबच्या जागेत म.न.पा .ज्या सुविधा उदा .शेडस् /हॉटेल स्नॅक्स सेंटर इ .उपलब्ध करून देईल .त्यांचे भाडे म.न.पा .निश्चित करेल .बोटक्लब चालविण्याच्या ठेक्याबाबत निश्चित केलेल्या भाडे रक्कमेचा भरणा प्रत्येक महिन्याच्या १५ तारखेच्या आत बोटक्लब चालविण्यास घेणार यांना म.न.पा .क्रीडा विभागात जमा करावे लागेल .१५ तारखेनंतर भरल्या जाणा-या भाडेमध्ये प्रती दिन र.रू.५०० विलंब शुल्क आकारले जाईल.

23.बोटक्लब ठेक्याच्या संदर्भात होणारा सर्व प्रकारचा पत्रव्यवहार हा करारनाम्याचा अविभाज्य भाग राहील.

24.बोटक्लब कार्यरत झालेपासून करारनाम्याच्या मुदतीपर्यंत नदीचे पाणी /नदी प्रदुषित होणार नाही त्यामध्ये प्लास्टिक वा तत्सम कचरा होणार नाही याची काळजी घेणे हे बोटक्लब चालविण्यास घेणार यांचेवर बंधनकारक राहील.

25.थेरगांव बोटक्लब चालविण्यास घेणाऱ्या संस्थेकडे इंडियन कयाकिंग ऍन्ड कनोईंग असो.यांचेकडे नोंदणी केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे .अथवा सदर संस्थेस बोटक्लब चालविण्याचा पुर्व अनुभव असणे आवश्यक आहे .सदर प्रमाणपत्राची निविदे सोबत स्कॅन करून, व सत्यप्रत करून अपलोड करावी लागेल.

26.थेरगाव येथील बोटक्लब चालविण्यास देणेकामी प्राप्त झालेले दर पत्रक मंजूर अथवा नामंजूर करणेचे अधिकार मा.आयुक्त यांनी स्वत :कडे राखून ठेवले आहेत.

27.बोटक्लब चालविण्यास घेणा-यास वापरात येणा-या बोटी विषयी संपूर्ण माहिती म.न.पा.स सादर करावी लागेल.

28.थेरगाव बोट क्लब केंजूदेवी मंदिर व पद्मजी बंधा-यापासून ५० मिटर अंतर सोडूनच बोटीचा वापर करणे बंधन कारक राहील.

29.बोटीमुळे नदीवरून पिण्यासाठी, औद्योगिक कारणासाठी व शेतीसाठी उपसा करण्यात येणा-या योजनांना धोका किंवा अडथळा येणार नाही याची खबरदारी बोटक्लब चालविण्यास घेणा-याची राहील.

30.बोट चालविणारे बोटमन प्रशिक्षित असले पाहिजेत .बोटक्लब चालविण्यास घेणार यांचेकडे रेस्क्यु बोट असणे आवश्यक आहे .व बोटक्लब चालू असताना एकूण ४ लाईफ गार्ड असणे आवश्यक आहे.

31.बोटक्लबची वेळ सुर्योदय ते सुर्यास्त या काळातीलच राहील .हे बोटक्लब चालविण्यास घेणाऱ्यावर बंधनकारक राहील.

32.बोटींग करताना काही जिवित हानी अथवा वित्त हानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी बोटक्लब चालविण्यास घेणा-याची राहील.

33.बोटींगसाठी येणाऱ्या पर्यटकांकडून माफक फी आकारण्यात यावी .बोटींगच्या वेळी त्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी बोटक्लब चालविण्यास घेणार यांची राहील .तसेच लाईफ जॅकेट घालून पर्यटकांस बोटींगसाठी सोडण्याची जबाबदारी बोटक्लब चालकाची राहील.

34.बोटक्लबवर कयाकिंग, कनोईंगचे व रोईंगचे प्रशिक्षण द्यावयाचे आहे व त्यासाठी आवश्यकतेनुसार बोटींची उपलब्धता करून देणे लिहून देणार यांचेवर बंधनकारक राहील.

35.लिहून देणार यांना खाजगी क्लास चालवून अन्य विद्यार्थ्यांना बोटींगचे प्रशिक्षण देता येईल व त्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांकडून कमाल र.रू.२०० प्रतीमाह एवढे शुल्क आकारता येईल.

36.बोटिंग प्रशिक्षण पुर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना राज्य, राष्ट्रीय ज्युनिअर व सबज्युनिअर स्पर्धेत सहभागी करण्याची जबाबदारी संबंधित संस्था व म.न.पा .या दोघांची राहील.

37.बोटक्लबवर राज्य, राष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन करावयाचे असून स्पर्धेच्यावेळी प्रेक्षकांना बसण्याची व्यवस्था करावयाची आहे .स्पर्धा अनुषंगाने प्रवेश फी म.न.पा.च्या मान्यतेने लिहून देणार यांनी घ्यावयाची आहे .सदर स्पर्धा पार पाडण्याची जबाबदारी लिहून देणार यांची राहील.

38.बोटक्लब चालविण्याचा कमीतकमी ३ ते ४ वर्षांचा पुर्वानुभव असणे गरजेचे आहे .या बाबतचा पुरावा/ प्रमाणपत्र निविदे सोबत स्कॅन करून, व सत्यप्रत करून अपलोड करावी लागेल.

39.बोटक्लब व बोटक्लब परीसराकरीता ३ पाळयात सुरक्षा कर्मचारी नेमणे आवश्यक असून प्रत्येक पाळीमध्ये ४ कर्मचारी यांची नेमणुक करण्याची जबाबदारी लिहून देणार यांची राहील.

40.पिण्याचे पाणी, लाईटची व्यवस्था म.न.पा .कडून केली जाईल .परंतू त्याचे येणारे रितसर बील भरण्याची जबाबदारी लिहून देणार यांची राहील.

41.वापरावयास घेतलेला गार्डन परीसर /लॉनसाठी लागणारे पाणी नदीतून उचलून घेऊन ते स्वखर्चाने गार्डन परीसर आणि लॉनमध्ये देण्याची जबाबदारी लिहून देणार यांची राहील.

42.निविदा फॉर्म म.न.पा.चे वेबसाईट वरून डाऊनलोड करून निविदा फॉर्म घेतलेल्या निविदाकारांनी निविदा फी कमिशनर, पी.सी.एम.सी .यांचे नांवे डिमांड ड्राफ्टद्वारे भरून पाकीट क्र.१ मध्ये डी.डी .सादर करावा.

43.निविदा मंजूर पुरवठाधारकांस करारनामा करणेपूर्वी असा ठेकेदार/ठेकेदारी संस्था म.न.पा.चे विद्यमान नगरसेवक व स्विकृत सदस्य यांचेशी संबंधित नाही .याबाबत र.रु.१०० चे स्टँपपेपरवर प्रतिज्ञापत्र नोटराईज करुन द्यावे लागेल .

44.निविदा दर मंजूर केल्यानंतर शासनाने त्यामध्ये काही करवाढ केल्यास कोणतेही करवाढ मंजूर केली जाणार नाही .

45.निविदा मंजूर झाल्यानंतर ठेकेदारास मंजूर दरांप्रमाणे वार्षिक कामाच्या एकूण रकमेच्या ५% प्रमाणे होणारी अनामत रक्कम ही पेमेंट गेटवे सिस्टीम द्वारे भरावी लागेल .तसेच अनामत रकमेच्या ३% प्रमाणे होणारी रक्कम अधिक मनपाच्या नियमानुसार स्टँप पेपरवर स्वखर्चाने लेखी करारनामा करुन द्यावा लागेल .

46.पहिल्या वर्षाचे निविदा दर कामाचे आदेशापासून ११ महिने कालावधीसाठी ग्राह्य राहील .तसेच मंजूर केलेले दर ठेकेदारावर बंधनकारक राहील .

47.सदरची निविदा स्विकृतीचे अंतिम दिनांकाचे दिवशी दुपारी ४.०० वाजता किंवा निविदा कमिटी ठरवील त्या दिवशी व वेळेस निविदा उघडण्यात येतील .त्याबाबतची सुचना म.न.पा .वेबसाईटवर देणेत येईल .निविदा उघडण्याच्या वेळी निविदाकार स्वत : किंवा त्याचा प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहू शकेल .

48.निविदा मंजूर पुरवठाधारकाने थेरगांव बोट क्लब चालविणेस असमर्थता दर्शविलेस किंवा निविदेतील कोणत्याही अटीचा भंग केलेस त्यांना त्याकामापोटी भरलेली अनामत रक्कम जप्त करुन पुरवठा आदेश रद्द करणेत येईल व त्यांचे नाव काळया यादीत टाकण्यात येईल .

49.निविदा मंजूर पुरवठाधारकाने निविदेसोबत जोडलेली कागदपत्रे अवैध, अपुर्ण किंवा दिशाभूल करणारी असलेस तसेच करारनामा करणेस पाचारण केले असता करारनामा करणेस टाळाटाळ केलेस किंवा करारनामा करणेस असमर्थता दर्शविलेस, थेरगांव बोट क्लब चालविण्यास घेतल्यानंतर करारनामा संपुष्ठात येण्याच्या आत असमर्थता दर्शविल्यास सदर कामापोटी जमा केलेली अनामत रक्कम जप्त करुन पुरवठा आदेश रद्द करण्यात येईल.

50.निविदाधारकांवर निविदेतील, करारनाम्यातील, पुरवठा आदेशातील सर्व अटी, शर्ती तसेच सक्षम अधिका-यांनी दिलेल्या सुचना बंधनकारक राहतील .यापैकी कोणत्याही अटी शर्तीचा भंग केल्यास निविदाकाराचे अनामत रक्कम जप्त करुन पुढील योग्य ती कार्यवाही करणेत येईल.

51.शासनाने वेळोवेळी लागू केलेले कर संस्थेला बंधनकारक राहतील.

52.नेमलेल्या कर्मचा-यांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन द्यावे लागेल.

53.संस्थेने नेमलेल्या कर्मचा-यांचा विमा उतरवून भविष्य निर्वाह निधी रक्कम नियमानुसार संबंधित कार्यालयाकडे भरावी लागेल.

54.म.न.पा.ने जर सदर ठिकाणी स्पर्धा आयोजित केल्यास त्या काळात क्रीडा सुविधा विना मुल्य उपलब्ध करून द्यावी लागेल.

**१३) म.न.पा .व्यायामशाळा.**

**व्यायामशाळा, बॉक्सिंग, वेटलिफ्टिंग सेंटरचे सभासदत्व होताना खालील प्रमाणे अटी व नियम राहतील.**

1. म.न.पा.ने व्यायामशाळा, बॉक्सिंग, वेटलिफ्टिंग सेंटरचे सभासदत्व होताना किमान १० दिवस अगोदर विहीत नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे.
2. म.न.पा.ने व्यायामशाळा, बॉक्सिंग, वेटलिफ्टिंग सेंटरचे सभासदत्व देण्याचे अधिकार क्रीडा अधिकारी यांना राहिल.
3. म.न.पा.ने व्यायामशाळा, बॉक्सिंग, वेटलिफ्टिंग सेंटरचे मासिक शुल्क व अनामत या बाबत माहीती भाग ४ मध्ये दिली आहे.
4. सभासदत्व होताना मुळ अर्जा सोबत किमान ६ महिन्याची फी व व्यायाम शाळा अनामत, २ फोटो, म.न.पा. परिसरात राहत असल्याचा पुरावा (उदा.आधार कार्ड, रेशनिंग कार्ड झेरॉक्स प्रत / ड्रायव्हिंग लायसन्स / मा. नगर सदस्य यांचे शिफारस पत्र ) सादर करणे आवश्यक आहे.
5. सभासदाने म.न.पा.ने व्यायामशाळा, बॉक्सिंग, वेटलिफ्टिंग सेंटरचे मासिक फी महिन्याच्या १५ तारखेच्या आत म.न.पा. कर्मचा-यांकडे जमा करून त्याची रितसर पावती घ्यावी.

6. म.न.पा.ने व्यायामशाळा, बॉक्सिंग, वेटलिफ्टिंग सेंटरचे सभासदत्व झाल्यावर म.न.पा.कडून ओळखपत्र दिले जाईल. व्यायामासाठी येताना सदर ओळखपत्र स्वत: जवळ असणे आवश्यक आहे. म.न.पा. कर्मचा-याने मागताच सदर ओळखपत्र दाखविणे आवश्यक आहे.
7. व्यायामशाळा, बॉक्सिंग, वेटलिफ्टिंग सेंटरमध्ये सराव, व्यायाम करताना जाणून बूजून साहित्याची मोडतोड केल्यास त्याची किंमत संबंधिताकडून वसूल करून त्याचे सभासदत्व रद्द केले जाईल.
8. म.न.पा. व्यायामशाळा, बॉक्सिंग, वेटलिफ्टिंग सेंटरची अनामत पावती सभासदाने जपून ठेवावी. व्यायामशाळा, बॉक्सिंग, वेटलिफ्टिंग सेंटरचे सभासदत्वाचा राजीनामा दिल्यानंतर त्यांना अनामत परतावा साठी विहित नमुन्यात अर्ज व अनामत मुळ पावती जोडणे आवश्यक आहे.
9. म.न.पा. व्यायामशाळा, बॉक्सिंग, वेटलिफ्टिंग सेंटरचे सभासदांनी शांतता राखावी.
10. म.न.पा. व्यायामशाळा, बॉक्सिंग, वेटलिफ्टिंग सेंटरचे धुम्रपान करण्यास बंदी आहे.
11. म.न.पा. व्यायामशाळा, बॉक्सिंग, वेटलिफ्टिंग सेंटरचे वेळ सोम ते शनि स. ०६ ते १० व दु. ४ ते सायं. ८ अशी राहिल दुसरा व चौथा शनिवार, रविवार तसेच शासकीय सुट्टयांचे दिवशी म.न.पा. व्यायाम शाळा बंद राहिल.
12. म.न.पा. व्यायामशाळा, बॉक्सिंग, वेटलिफ्टिंग सेंटरचे व्यायाम, सराव सभासदाने स्वत:च्या जबाबदारीवर करावा, याकामी प्रशिक्षक, केअर टेकर, म.न.पा.कडून पुरवविले जाणार नाही.
13. बॉक्सिंग, वेटलिफ्टिंग सेंटर मध्ये प्रशिक्षक पुरविले जातील.
14. व्यायामशाळा, बॉक्सिंग, वेटलिफ्टिंग सेंटरमध्ये येणा-या सभासदांनी मौल्यवान वस्तू, दागिणे व्यायाम शाळेत आणू नये. ते आणल्यास त्याची जबाबदारी संबधित सभासदांवर राहिल सदर वस्तू चोरीला गेल्यास त्याची जबाबदारी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेवर राहणार नाही.
15. व्यायामशाळा, बॉक्सिंग, वेटलिफ्टिंग सेंटर मध्ये व्यायाम, सराव करताना अपघात, दुखापत अथवा जिवितहानी झालेस त्याची जबाबदारी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेवर राहणार नाही.
16. सभासदांना ठरवून दिलेल्या वेळेत व्यायामासाठी, सरावासाठी येणे आवश्यक आहे.
17. व्यायामशाळा, बॉक्सिंग, वेटलिफ्टिंग सेंटरमध्ये व्यायाम, सराव करताना सभासदाने आवश्यक सैल कपडे, आवश्यक बेल्ट, लंगोट इ. वापरणे आवश्यक आहे.
18. म.न.पा.ने व्यायामशाळा, बॉक्सिंग, वेटलिफ्टिंग सेंटर बाबत वेळोवेळी दिलेल्या सुचना सभासदांवर बंधन कारक राहील.
19. म.न.पा.ने ठरवून दिलेल्या सूचना व नियमांचा भंग केल्यास सभासदत्व रद्द केले जाईल.
20. म.न.पा. ने ठरवून दिलेल्या अटी व नियमांमध्ये बदल करण्याचा अधिकार मा. आयुक्त अथवा त्यांनी नेमून दिलेल्या अधिका-यास राहील.

21.व्यायामशाळा, बॉक्सिंग, वेटलिफ्टिंग सेंटर तांत्रिक कारणामुळे बंद ठेवण्याचा अधिकार मा. आयुक्त अथवा त्यांनी नेमून दिलेल्या अधिका-यास राहिल.

22.प्रत्येक सभासदाने म.न.पा. नियममांचे, मार्गदर्शक सुचनांचे पालन करणे आवश्यक आहे.

२३. "व्यायाम शाळेच्या इमारतीतील पारंपारिक आखाडे व्यायाम शाळेमध्ये समाविष्ट करावे .सदर व्यायाम शाळा सेवा शुल्कावर देताना त्या सोबत आखाडेही चालविण्यास दिले जातील .

२४ व्यायाम शाळेस साप्ताहिक सुट्टया व शासकीय सुट्टया म.न.पा कर्मच्या-या प्रमाणे देय राहील

२५ म.न.पा.अधिकारी ,कर्मचारी, सदस्य यांना कोणतीही क्रीडा सुविधा (व्यायाम शाळा सभासदत्व) मोफत दिली जाणार नाही त्यांनाही.क्रीडा सुविधांची नियमानुसार फी भरणे बंधनकारक राहील "

**म.न.पा .व्यायामशाळा सेवाशुल्क तत्त्वावर कराराने चालविणेस देणे बाबतच्या अटी व शर्ती–**

1. सक्षम समितीची मान्यता घेउन दरमहा सेवाशुल्क दर ठरवून म.न.पा .व्यायामशाळा ११ महिने कराराने म.न.पा .कडून देऊन चालविण्यास देण्यात येईल .
2. व्यायामशाळेची वेळ सकाळी ६.०० ते रात्री ८.०० पर्यंत राहिल .रात्री ८.०० नंतर व्यायामशाळा चालविता येणार नाही .
3. व्यायामशाळा साहित्याची मोडतोड केल्यास त्याची नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची/मंडळाची राहिल .
4. व्यायामशाळा चालविण्यास देण्यापूर्वी नियमा नुसार अनामत रक्कमेचा राष्ट्रीयकृत बँकेचा एफ्.डी.आर. म.न.पा .कडे जमा करावी लागेल. सेवाशुल्क दर व अनामत रक्कम ठरविणे,त्यामध्ये बदल करणे या बाबतचा अधिकार मा.आयुक्त यांना राहील.
5. व्यायामशाळा चालविण्याचा करारनामा ११ महिन्यांचा राहिल .तसेच मुदत वाढ देणे किंवा नाकरणे याकरिता संस्था/मंडळाचे कामकाज विचारात घेऊन पुढील मुदतवाढ अधिकार म.न.पा.स राहतील .
6. प्रत्येक सभासदाकडून मासिक फी हे म.न.पा .ठरवेल त्या दराने घेणे, हे संस्था/मंडळांस बंधनकारक राहिल.
7. व्यायामशाळा इमारतीमध्ये व इमारत परिसरामध्ये व्यायामा व्यतिरिक्त कोणताही वापर करता येणार नाही .इमारतीचे काही नुकसान झाल्यास दारे, खिडक्या इ. च्या दुरूस्तीचा खर्च लिहून देणार संस्था/मंडळास करावा लागेल .
8. व्यायामशाळा चालविण्यास दिलेले मंडळ/संस्थेस व्यायामशाळेवर मालकी हक्क सांगता येणार नाही .व्यायामशाळेवर मालकी हक्क सर्वस्वी म.न.पा.चा राहील .
9. वेळोवेळी म.न.पा .ज्या अटी व शर्ती लागू करेल त्याचे पालन करणे लिहून देणार संस्था/मंडळास करावा लागेल .
10. व्यायामशाळेतील विजेचा खर्च मीटर रिडींग प्रमाणे लिहून देणार संस्था/मंडळास करावा लागेल .
11. व्यायामशाळेत व्यायाम करण्यासाठी किमान ५० सभासद करण्याची जबाबदारी लिहून देणार संस्था/मंडळा यांच्यावर राहिल .

12.व्यायामशाळेत कारणास्तव तुटफुट होणे इ .गोष्टी जर म.न.पा .अधिका-याच्या निदर्शनास आल्यास संबंधित संस्था/मंडळास कोणतीही पूर्व सुचना किंवा नोटीस न देता संस्थेचा करारनामा रद्द करण्यात येईल व झालेल्या नुकसानीची भरपाई अनामत रकमेतून वसूल केले जाईल .

13.ज्या व्यायामशाळांमध्ये यापुर्वीच पाण्याची व्यवस्था आहे तेथील पाणी लिहून देणार संस्थेस/मंडळास मोफत वापरता येईल .तथापि ज्या ठिकाणी पाण्याची व्यवस्था नाही तेथे म.न.पा .च्या वतीने व्यवस्ता केली जाणार नाही.

14.संबंधित व्यायामशाळेत वसुल होणा-या फी चा हिशोब ठेवावा .सदर फी मधुन देखभाल दुरूस्ती करण्यात यावी .रक्कम कमी वसूल झाल्यास देखभाल दुरूस्तीचा खर्च हा लिहून देणार संस्था/मंडळास करावा लागेल .

15.संबंधित व्यायामशाळेत सभासदाकडून ज्यादा फी वसूल करणे जर म.न.पा .अधिका-याच्या निदर्शनास आल्यास संबंधित संस्था/मंडळास कोणतीही पुर्व सुचना किंवा नोटीस न देता संस्थेचा करारनामा रद्द करण्यात येईल व झालेले नुकसानीची भरपाई अनामत रकमेतून वसूल केली जाईल .

16.म.न.पा .च्या शाळेतील किमान २५ विद्यार्थ्यांना व्यायामशाळेत सरावासाठी मोफत सोडण्याचे मान्य केले आहे .

17.व्यायामशाळेतील परिसरातील मद्यपान, धुम्रपान करण्यास सक्त मनाई राहिल .

18.व्यायामशाळासंबंधी अटी व शर्तीचा भंग केल्यास अथवा तेथे गैरवर्तन केल्याचे निदर्शनास आल्यास किंवा गंभीर प्रकारची तक्रार आल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता करारनामा रद्द केला जाईल .

19.म.न.पा .चा सक्षम अधिका-यास व्यायामशाळेची पाहणी करण्याची मुभा राहिल .त्यास पुर्णपणे सहकार्य करणे हे व्यायामशाळा चालविणा-या संस्था/मंडळाचे अध्यक्ष तसेच सदस्य यांचेवर बंधनकारक राहिल .

20.व्यायामशाळा संबंधी असलेल्या अटी व शर्ती मध्ये वाढ करणे अथवा शिथिल करण्याचे अधिकार मा .आयुक्त यांना राहिल .

21.व्यायामशाळा साहित्याची दुरूस्ती करण्यासाठी बाहेर नेताना म.न.पा.ची परवानगी घेऊन, रजिस्टर मध्ये नोंद करून साहित्य व्यायामशाळे बाहेर घेऊन जाण्याची जबाबदारी लिहून देणार यांची राहिल .

22.व्यायामशाळेतील जाणुनबुजून साहित्य खराब, ना दुरूस्त केल्यास त्याची नुकसान भरपाई करून देण्याची जबाबदारी संबंधितांची राहिल .

23.व्यायामशाळेतील किरकोळ व सर्व दुरूस्तीची कामे लिहून देणार यांनी करावयाची आहे .

24.व्यायामशाळा व्यतिरिक्त व्यायामशाळा परिसरातील इतर कोणत्याही जागेचा वापर स्वत साठी करता येणार नाही .

25.सदर करारनाम्याची मुदत वाढविण्याचा अधिकार मा.आयुक्त यांना राहील.

26.व्यायामशाळेचे साहित्य चोरीस गेले अथवा त्याची परस्पर विल्हेवाट लावल्यास करारनामा रद्द करून व्यायामशाळा म.न.पा.च्या ताब्यात घेतली जाईल .अनामत रकमेपेक्षा नुकसानीची रक्कम जास्त असल्यास संस्था/मंडळाच्या सदस्यांच्या व्यक्तिगत मालमत्तेची मिळकत कराच्या थकबाकी समजून महसूल पध्दतीने वसूल केला जाईल .

27.सदर करारनामा संदर्भात कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास तो लवादाच्या कायद्यातील तरतुदीनुसार सोडविला जाईल .त्या कारणी मा .आयुक्त पिं.चिं .म.न.पा .हे एकमेव लवाद म्हणून काम पाहतील व त्याचा निर्णय उभय पक्षावर बंधनकारक राहील .

28.म.न.पा .व्यायामशाळा सेवाशुल्क तत्त्वावर चालविणेस देताना त्या व्यायामशाळेतील व्यायाम साहित्याचा तपशिल करारनाम्यामध्ये नमूद केला जाईल .

29.ज्या व्यायाम शाळेतील व्यायामासाठी येणा-या सदस्यांची संख्या ५० पेक्षा कमी असेल तर अशा व्यायामशाळा बंद करून मध्यवर्ती ठिकाणी फिटनेस सेंटर चालू करण्यात येईल व रिकाम्या शाळेच्या इमारतीमध्ये इतर प्रकल्प राबविणेबाबतचा विचार करण्यात येईल.

30.ज्या व्यायाम शाळा सेवा शुल्क तत्वावर चालविण्यास दिल्या जाणार नाही अशा व्यायाम शाळा मनपा तर्फे चालविल्या जातील.

31.व्यायामशाळा मासिक सभासद शुल्क व अनामत रक्कम या बाबतची माहीती भाग ४ मध्ये दिली आहे.

32.व्यायामा करिता येणा-या सभासदा करिता सकाळी ६.०० ते १०.०० व सायंकाळी ४.०० ते ८.०० अशी राहिल.

33.संस्थेने नेमलेल्या कर्मचा-यांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन देणे. त्यांचा विमा उतरविणे, नियमानुसार भविष्य निर्वाह निधी रक्कम भरणे, शासनाने वेळोवेळी लागू केलेले कर इ. संबंधित संस्थेवर बंधनकारक राहिल.

34.म.न.पा.ने जर सदर ठिकाणी स्पर्धा आयोजित केल्यास त्या काळात क्रीडा सुविधा विना मुल्य उपलब्ध करून द्यावी लागेल.

## भाग – ३ – प्रशासकीय

### १) क्रीडा पर्यवेक्षक / क्रीडा शिक्षक –

१.पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या लोकसंख्येत झालेली वाढ लक्षात घेऊन नागरीकांना मुलभूत सुविधा देण्याची कामकाज पद्धती सुलक्ष व्हावी, यासाठी महापालिकेने सहा प्रभागांची निर्मिती केली आहे. परंतु, या प्रभाग प्रशासन व्यवस्थापनेमध्ये क्रीडा बाबत विचार होणे आवश्यक आहे. प्रभागात मैदाने, व्यायामशाळा, जलतरण तलाव, बॅडमिंटन हॉल, लॉन टेनिस व क्रीडा आरक्षणे इ. सुविधा विचारात घेता नागरीकांना व खेळाडूंना प्रभागांतर्गत क्रीडा सुविधा देण्यासाठी प्रत्येक प्रभागात एक क्रीडा अधिकारी याप्रमाणे सहा प्रभागात सहा क्रीडा अधिकारी, क्रीडा पर्यवेक्षकांमधुन सेवाज्येष्ठतेनुसार नियुक्ती देण्यात यावी,

२ म.न.पा.मध्ये ४ प्रभाग कार्यालय असून, २ नव्याने नियोजित प्रभाग होणार आहेत. प्रत्येक प्रभागास क्रीडा पर्यवेक्षक याप्रमाणे १२ क्रीडा पर्यवेक्षक पदे मंजूर होणे आवश्यक आहे.

३. म.न.पा.च्या शाळांच्या संख्येनुसार व पटसंख्येनुसार क्रीडा शिक्षकांची पदे मंजूर करणेत यावीत. याचा आढावा दर २ वर्षांनी घेऊन तशी कार्यवाही सक्षम समितीच्या मान्यतेने करण्यात यावी.

४.क्रीडा विभागांच्या आस्थापनेवरील क्रीडा पर्यवेक्षक व क्रीडा शिक्षक हा म.न.पा.च्या क्रीडा विभाग व्यतिरिक्त अन्य विभागाच्या आस्थापनेवर काम करणार नाही.

५.क्रीडा शिक्षक व पर्यवेक्षक यांचा क्रीडा व्यतिरिक्त इतर कामामध्ये समावेश करू नये.

### २) क्रीडा विभागाच्या मिळकतीच्या सुरक्षेबाबत –

1. क्रीडा विभागाच्या आधिपत्याखालील मिळकती सुरक्षित ठेवणे बाबत सुरक्षा रक्षकांची नेमणूक करणे आवश्यक आहे.
2. क्रीडा विभागाच्या आधिपत्याखालील मिळकती सुरक्षिततेसाठी म.न.पा.च्या सुरक्षा विभागाकडून आवश्यक संख्येत सुरक्षा रक्षकांची नियुक्ति करणेत यावी.
3. सुरक्षा विभागाकडून सुरक्षा कर्मचारी उपलब्ध न झालेस कंत्राटी पध्दतीने सुरक्षा रक्षकांची नेमणूकीचे अधिकार क्रीडा विभागास असावेत.

### ३. मैदान आरक्षण व देखभाल दुरूस्ती –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा क्रीडा विकास होत असताना ,मैदान हा त्यातील एक प्रमुख विषय आहे .पिंपरी चिंचवड शहरामधील काही जागा खेळासाठी खेळाच्या विकासासाठी आरक्षित केलेल्या आहेत .या आरक्षणावर विविध प्रकारची मैदाने तयार करून त्याचा वापर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या परिसरातील नागरिक व खेळाडूंना होईल.पिं.चिं.म.न.पा. मध्ये नव्याने मैदान तयार करताना क्रीडा विभागाशी सल्ला मसलत करून ते मैदान तयार करण्यात येईल.

1. क्रीडा विभागाच्या आधिपत्या खालील क्रीडा सुविधांचे स्थापत्य, विद्युत, पाणी पुरवठा विषयक देखभाल दुरूस्तीचा खर्च करण्याचा संपुर्ण अधिकार क्रीडा विभागास असावा.
2. त्याकामी म.न.पा.ने अंदाजपत्रामध्ये स्वतंत्र तरतूद सक्षम समितीच्या मान्यतेने करणे आवश्यक आहे.
3. प्रत्येक खेळातील मैदाने ऑनलाईन पध्दतीने आरक्षित करावित.

4. म.न.पा.च्या ४ तसेच नव्याने होणा-या प्रभागामध्ये २०० मी. ट्रॅक व वॉकिंग ट्रॅक भविष्यात तयार करण्यात येईल.
5. ड प्रभागात रहाटणी येथे स.न.३०७ व ३१० प्लॅन नं.मध्ये क्रीडा मैदाने विकसित करण्यात येतील.
6. सन २००२-०३ पर्यत म.न.पा.च्या जलतरण तलावाचे कामकाज संबंधित प्रभागा मार्फत चालविले जात होते. नंतर क्रीडा विभागाकडे कामकाज वर्ग केले पुर्वी प्रमाणे तलाव कामकाज संबंधित प्रभागाकडे दिल्यास कार्यकारी अभियंता अधिकारी असल्यामुळे तलावावरील अचानक निघालेल्या स्थापत्य, विद्युत विषयक कामकाज प्रभागा मार्फत त्वरीत करुन नागरिकांची गैरसोय टाळणे कामी. भविष्यात विचार करण्यात येईल.
7. सायकलिंग साठी वेलोड्रमची सुविधा भविष्यात केली जाईल.
8. खेळ निहाय मैदान तयार करणेबाबत क्रीडा समितीमार्फत मा.महापालिका सभेच्या मान्येतेसाठी आराखडा तयार केला जावा.क्रीडा विषयक देखभाल दुरुस्ती कामाच्या पुर्ततसाठी तीन टप्पे निश्चित केले जावे. शीघ्र कामे ३ महिन्यात, मध्यम मुदतीची कामे १ वर्षात, दिर्घ मुदतीची २ वर्षात केली पाहिजे.
9. सर्व प्रभागातील क्रीडा सुविधांच्या देखभाल दुरुस्तीसाठी आवश्यक तरतूद क्रीडा विभागाच्या अंदाजपत्रकात करण्यात येईल.

**४) क्रीडा निधी -**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील परिपत्रक क्र.जीईएन.१०९८/प्र.क्र-२१-९८ नवी २४ मंत्रालय मुंबई ४०००३२ दि.९ मार्च १९९८ नुसार महाराष्ट्र राज्यातील सर्व महापालिकांनी आपल्या प्रति वार्षिक खर्चा पैकी ५ टक्के खर्च क्रीडा क्षेत्रासाठी करावा. या परिपत्रकानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने महापालिकेच्या प्रतिवार्षिक खर्चा पैकी ५ टक्के खर्च क्रीडा क्षेत्रासाठी ठरविले आहे. क्रीडा विभाग हा एक स्वंतत्र विभाग आहे .या विभागातर्गंत जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा ,विविध महापौर चषक स्पर्धा ,कला स्पर्धा तसेच विभाग ,राज्य , राष्ट्रीय स्तरावर जाणा-या खेळाडूंचा खर्च ,शिष्यवृत्ती ,क्रीडा साहित्य खरेदी अशा विविध गोष्टींसाठी निधीची आवश्यकता आहे.

याकामी अंदाजपत्रकीय तरतूदीमध्ये वाढ करण्यात येईल.

**५) खेळाडू भरती -**

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.रा.क्री.धो-२००२/प्र.क्र ६८/क्री यु से -२ दिनांक ३० एप्रिल २००५ च्या अन्वये अत्युच्य गुणवत्ताधारक खेळाडूंना शायकीय, नियमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी ५ टक्के आरक्षण देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. या शासनाच्या धोरणाला अनुसरुन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने खेळाडू भरती करण्याचे ठरविले आहे व यात स्थानिक खेळाडूंना प्राधान्य देण्यात येईल.

**६)धोरण राबविणेसाठी क्रीडा विभागातील कर्मचा-यांचे सक्षमीकरण करणे –**

म.न.पा.च्या आस्थापनेवरील खेळाडू म्हणून नियुक्त केलेल्या कर्मचा-यांना क्रीडा विभागात नियुक्त्या देवून क्रीडा धोरण राबविणेसाठी आवश्यक ते क्रीडा प्रशिक्षण वेळच्या वेळी देणे .विविध क्रीडा स्पर्धांचे कामकाजाचा अनुभव असलेल्या कर्मचा-यांना क्रीडा विभागाचे कामकाजासाठी नियुक्त्या करून क्रीडा विभागाचे सक्षमीकरण करणे आवश्यक आहे .

सदर अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचा अधिकार पिंपरी चिंचवड म.न.पा.कडे राहिल.
*समन्वय समिती स्थापन करून वार्षिक क्रीडा कृती आराखडा तयार करावा.
यामध्ये खालील सदस्यांचा समावेश राहिल.

मा.महापौर
मा.आयुक्त/ अति.आयुक्त
मा.स्थायी समिती सभापती
मा.क्रीडा समिती सभापती
मा.सहा.आयुक्त, क्रीडा
मा.शिक्षण मंडळ,सभापती
मा.पुरस्कार विजेता खेळाडू/आंतरराष्ट्रीय खेळाडू (श्रीशिवछत्रपती/अर्जुन पुरस्कार विजेता)
मा.क्रीडा अधिकारी
मा.संबंधित खेळाचा संघटना प्रतिनिधी
मा. संबंधित खेळाचा पर्यवेक्षक

म.न.पा.च्या क्रीडा धोरणामध्ये राष्ट्रीय पंच यांचे प्रतिनिधीत्व असावे.
*क्रीडा विकासासाठी खेळ निहाय समिती नेमली जावी .यामध्ये एक नगरसेवक ,एक वरिष्ठ अधिकारी ,एक पुरस्कार विजेता ,राष्ट्रीय व आतंरराष्ट्रीय खेळाडूचा समावेश असावा.

**७) क्रीडा ग्रंथालय व माहिती केंद्र -**

म.न.पा.कै.आण्णासाहेब मगर स्टेडियम येथील क्रीडा ग्रंथालय व माहिती केंद्र हा एक क्रीडा विभागाचा भाग असून तो मध्यवर्ती वाचनायालास जोडण्यात यावा. क्रीडा विषयक स्वंतत्र एक भाग करण्यात यावा .जेणेकरुन पिं चिं म.न.पा. मधील नागरिकांना क्रीडा विषयक बाबतची माहिती सहज उपलब्ध होऊ शकेल. तसेच महानगरपालिकेच्या हददीतील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडूची माहिती अद्ययावत करावी व क्रीडा विषयाची माहिती व उपक्रम याचा प्रचार व प्रसार याद्ववारे सहज करता येईल.

**८) संघटना -**

मान्यता प्राप्त संघटेनेच्या समिती स्थापन करुन या समितीत संघटेनेच्या लोकांचा समावेश करुन या संघटनेच्या दर ३ महिन्याने मा. आयुक्त सो/ अति. आयुक्त याच्या अध्येतेखाली १५ दिवस पुर्व सुचनेने सभा आयोजित केल्या जाव्यात.या सभे द्ववारा पिं चिं म.न.पा मधील राज्य,राष्ट्रीय खेळाडू तयार होण्याच्या दुष्टीने आढावा घेणे तसेच अद्ययावत तंत्र हे खेळाडूंना प्राप्त होण्यासाठी या सभेत चर्चा केली जावी.सभा घेण्या पूर्वी सभेचे विषय ठरविले जावेत. या संघटना समितीमध्ये पंच यांचा ही समावेश असावा जेणेकरुन नविन आलेल्या नियमाची माहिती प्राप्त होईल.सर्व खेळांच्या संघटनाना एकत्रित मध्यवर्ती ठिकाणी कार्यालयासाठी जागा देण्यात यावी.कै.अण्णासाहेब मगर स्टेडियम येथे महाराष्ट्र ऑलिंपिक संघटनेचे कार्यालय असून त्याचा फायदा क्रीडा विभागाने करुनघ्यावा सर्व खेळांच्या संघटनाना एकत्रित मध्यवर्ती ठिकाणी कार्यालयासाठी जागा देण्यात यावी. म.न.पा.च्या धोरणामध्ये राष्ट्रीय पंच यांचे प्रतिनिधीत्व असावे.

**९) क्रीडा स्वरानंद नियतकालिक प्रसिध्द करणे -**

पिंपरी चिंचवड म.न.पा. क्रीडा विभागा मार्फत क्रीडा स्वरानंद हे त्रैमासिक प्रकाशित करण्यात येईल. यात नागरिकांकडून, क्रीडा संघटना, खेळाडूंकडून, क्रीडा पर्यवेक्षक व क्रीडा शिक्षक यांचेकडून विविध क्रीडा बाबतचे लेख मागवून घेऊन हे नियतकालिक प्रसिध्द करण्यात येईल.

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८
## क्रीडा विभाग
**( म.न.पा. विविध क्रीडा सुविधा दर पूर्वी प्रमाणे लागू करणेसमान्यता देणेबाबत आदेश क्र.क्रीडा/७/कावि/२२१/२०१४ दि.३०/०६/२०१४ चे लगत )**
**म.न.पा.विविध क्रीडा सुविधा पूर्वीचे दरपत्रक-प्रपत्र अ**

१**बहुउदेशीय मैदाने-**

१.कै अण्णासाहेब मगर स्टेडियम, नेहरुनगर मैदान
२ मदनलाल धिंग्रा मैदान ,निगडी -प्राधिकरण
३.कै.सदाशिवराव बहिरवाडे मैदानचिंचवड ,शाहूनगर ,
४.डॉ .हेडगेवार क्रीडा संकुल अजमेरा ,मासुळकर कॉलनी१८पिंपरी ,
५ .डॉ .बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुल, संत तुकाराम नगर१८पिंपरी ,
६.भोसरी तळे मैदानभोसरी ,
७.श्री मोरया गोसावी क्रीडा संकुल, चिंचवड
८.राजीव गांधी क्रीडा संकुल )भाडे कराराने चालविण्यास दिले आहे(
९.कै. गणपत फुगे क्रीडा संकुल, भोसरी
१०.कै. संजय काळे क्रीडा संकुल मैदान -आकुर्डी ,प्राधिकरण
११.कै.प्रबोधनकार केशवराव ठाकरे क्रीडा संकुल, प्राधिकरण निगडी ,
१२.नव महाराष्ट्र विद्यालय मैदान, पिंपरीगाव

**१) बहुउदेशीय मैदाने – दर पत्रक**

| अ. क्र. | आरक्षाणाचा तपशील | सरावासाठी ताशी दर र.रु | स्पर्धेसाठी पुर्ण दिवस स.१०.०० ते सायं.५.०० करिता दर र.रू. | अनामत र.रू. |
|---|---|---|---|---|
| | | जुने दर र.रू. | जुने दर र.रू. | जुने दर र.रू. |
| १ | म.न.पा शाळा व क्रीडा प्रबोधिनी | विनामुल्य | विनामुल्य | विनामुल्य |
| २ | खाजगी शाळा इ.१२वी पर्यतचे विद्यार्थी | २५ | ३०० | १००० |
| ३ | वरिष्ठ महाविद्यालय | २५ | ३०० | २००० |
| ४ | क्रीडा संघटना संस्था क्लब कंपनी इतर | २५ | ३०० | २००० |
| ५ | वरिष्ठ गटातील राज्य राष्ट्रीय खेळाडू | २५ | ३०० | १००० |

अ)सांस्कृतिक,धार्मिक व इतर अन्य कार्यक्रमासाठी प्रतिदिन प्रती तास भाडे र.रु.२००/-

ब) सांस्कृतिक,धार्मिक व इतर अन्य कार्याक्रमासाठी सकाळी १०.०० ते ५.०० करिता भाडे र.रु.१०००/-

क) सांस्कृतिक,धार्मिक व इतर अन्य कार्याक्रमासाठीमैदान अनामत र.रु.२०००/-(मंडपासाठी खड्डे खोदल्याचे निदर्शनास आल्यास प्रती खड्डा र.रु२००/-प्रमाणे दंड आकारला जाईल .)

**टीप** - १.कै अण्णासाहेब मगर स्टेडियम, नेहरुनगर मैदान,२ मदनलाल धिंग्रा मैदान, निगडी - प्राधिकरण ही दोन मैदाने विशेष खेळासाठी विकसित केल्याने सदर दोन मैदाने अपवादात्मक परिस्थितीत, सांस्कृतिक,धार्मिक व इतर अन्य कार्याक्रमासाठी देण्याचे अधिकार ,भाडेदर ठरविण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना राहील.

## २ श्री संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल ,इंद्रायणीनगर,भोसरी.येथील एथेलेटिक्स मैदान

| अक्र | तपशील | स्पर्धेसाठी सरावासा, ठी३ तास १ बॅचचे दर र.रू. | स्पर्धेसाठी वासाठीसरा, पुर्ण दिवस स.९.०० ते ५.०० या आरक्षणाचे दर र.रू. | आरक्षण वेळे नुसार १५ मि .पर्यत मैदान न सोडल्यास आकारावयाचा दंड र.रु | अमानत र.रू. |
|---|---|---|---|---|---|
| १ | मनपा शाळा ,मनपा क्रीडासंकुल , मनपा क्रीडा प्रबोधिनी ,मनपा दत्तक योजना अंतर्गत खेळाडु मनपा हद्दीतील राज्य ,राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडु | विनामुल्य | विनामुल्य | विनामुल्य | - |
| २ | खाजगी खाळा, इ.१२वी पर्यत | ३०० | ६०० | २०० | २००० |
| ३ | महाविद्यालय क्रीडा संघटना | १५०० | ३००० | ५०० | २००० |
| ४ | कंपन्या ,सॉफटवेअर कंपन्या औघौगिक संस्था | ३००० | ६००० | १००० | २००० |
| ५ | अन्य व्यक्तीस सरावासाठी प्रतीदिन प्रतीतास | १० | - | - | - |

## ३.म न पा हॉकी पॉलिग्रास मैदान, नेहरूनगर

| अ.क्र. | आरक्षणाचा तपशील | सरावासाठी दीड तास १ बॅचचे दर र.रु. | स्पर्धेसाठी२ तास १ बॅचचे दर र.रु. | स्पर्धेसाठी पुर्ण दिवस १०.०० ते ५.०० या आरक्षणाचे दर र.रू. | आरक्षण वेळे पेक्षा १५ मिनिटा पर्यंत ग्राऊंड न सोडल्यास आकारावयाचा दंड दर र.रू. | अनामत र.रू. |
|---|---|---|---|---|---|---|
| | | जुने दर ररू. | जुने दर र.रू. | जुने दर र.रू. | जुने दर र.रू. | जुने दर र.रू. |
| १ | म न पा शाळा व क्रीडा प्रबोधिनी | विनामुल्य | विनामुल्य | विनामुल्य | विनामुल्य | - |
| २ | खाजगी शाळा इ.१२ वी पर्यतचे विद्यार्थी | १५० | २५० | १२०० | ३०० | १००० |
| ३ | महाविद्यालय क्रीडा संघटना,कंपनी | ३०० | ५०० | १५०० | १०० | २००० |

**४.म.न.पा. विविध क्रीडा सुविधा दरपत्रक –**

| अ. क्र. | क्रीडा सुविधा तपशिल | जुने दर र.रू. | अनामत र.रू. |
|---|---|---|---|
| १ | म न पा स्क्वॅश कोर्टमोरवाडी ,<br>प्रतिदिन प्रती तास दर | २५ | ० |
| २ | म .पा.न.मुख्य कार्यालय व्यायाम शाळा<br>सभासद फीदरमहा , | २५ | ५० |
| | म .पा.न.इतर व्यायाम शाळा<br>सभासद फीदरमहा , | १० | २५ |
| ३ | म .पा.न.बॉक्सिंग प्रशिक्षण<br>सभासद फीदरमहा , | २५ | ५० |
| ४ | म .पा.न.वेटलिफिटंग सेंटर<br>सभासद फीदरमहा , | २५ | ५० |

**५.रायफल शुटिंग प्रशिक्षण केंद्र – दरपत्रक**

| अ.क्र. | सभासदांचा तपशील | मासिक शुल्क दर र .रू. | वार्षिक शुल्क दर र.रू. |
|---|---|---|---|
| | | जुने दर र.रू. | जुने दर र.रू. |
| १ | म न पा शालेय विद्यार्थी | मोफत | |
| २ | १८ वर्षा खालील सभासद | ५० | ५०० |
| ३ | १८ वर्षावरील सभासद | १०० | १००० |

**६.जलतरण तलाव**

१) कै.अण्णासाहेब मगर स्टेडियम जलतरण तलाव –नेहरुनगर

२) श्री छत्रपती शिवाजी महाराज जलतरण तलाव निगडी-प्राधिकरण

३) खिंवसरा पाटील जलतरण तलाव,थेरगांव

४) कै .बाळासाहेब शितोळे जलतरण तलाव, सांगवी

५) भोसरी जलतरण तलावभोसरी ,

६) राजर्षी शाहु जलतरण तलाव ,मोहननगर

७) कै.वस्ताद बाळासाहेब गावडे जलतरण, केशवनगर, चिंचवड

८) पिंपळे गुरव जलतरण तलाव

९) यमुनानगर जलतरण तलाव

१०) डॉ .बाबासाहेब आंबेडकर जलतरण तलावकासारवाडी ,

११) पिंपरी वाघेरे जलतरण तलाव -नियोजित.

**जलतरण तलाव दरपत्रक-**

| अक्र | तपशील | तिमाही दर र.रू. | सहामाही दरर.रू. | वार्षिक दर र.रू. |
|---|---|---|---|---|
| | | **जुने दर र.रू.** | **जुने दर र.रू.** | **जुने दर र.रू.** |
| १ | १२ वर्षाखालील मुले/मुली | २०० | ३५० | ५०० |
| २ | १२ वर्षावरील व्यक्ति | ४०० | ७०० | १००० |
| ३ | अपंग,मनपा कर्मचारी स्वत: राज्य,राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय खेळाडु,जेष्ठ नागरिक व पत्रकार | २०० | ३५० | ५०० |
| ४ | लॉकर फी | ५० | ७५ | १०० |
| ५ | १)व्यक्तिसाठी ,स्वत:साठी ( | प्रतिदिन गेस्ट तिकिट र -/१०.रू. | | |

**समर कॅम्पसाठी रण तलावजलत, १ तासाचे भाडे**

| अ.क्र. | तलावाचे नाव | मुले/मुली संख्या | ताशी दर र.रु |
|---|---|---|---|
| | | | जुने दर र.रु |
| १ | कै.अण्णासाहेब मगर स्टेडियम जलतरण तलाव नेहरुनगर | ८० | ५०० |
| २ | बाकी इतर सर्व तलाव | ६० | ४०० |

७. **स्केटिंग ग्राऊंड दरपत्रक-**

1. कै .मीनाताई ठाकरे स्केटींग ग्राऊंड, यमुनानगरडीनिग ,
2. डॉ.हेगडेवार क्रीडा संकुल मैदान स्केटिंग ग्राऊंड अजमेरा ,मासुळकर कॉलनी१८पिंपरी ,
3. मोहननगर स्केटिंग ग्राऊंडचिंचवड ,मोहननगर ,

स्केटिंग मैदानाचे सराव व स्पर्धा आरक्षाणाबाबत खालील प्रमाणे दर राहतील.

| अक्र | आरक्षाणाचा तपशील | सरावासाठी ताशी दर र.रु | स्पर्धेसाठी पूर्ण दिवस स ००.१०. तेसायं ००.५. आरक्षणाचे दर र.रु. | अनामत र.रू. |
|---|---|---|---|---|
| | | **जुने दर र.रू.** | **जुने दर र.रू.** | **जुने दर र.रू.** |
| १ | म न पा शाळा व क्रीडा प्रबोधिनी | विनामुल्य | विनामुल्य | विनामुल्य |
| २ | खाजगी शाळा -इ.१२ वी पर्यतचे विद्यार्थी | २५ | ३०० | १००० |
| ३ | महाविद्यालय | २५ | ३०० | २००० |
| ४ | क्रीडा संघटना,संस्था क्लब कंपनी इतर | २५ | ३०० | २००० |

## ८. लॉन टेनिस कोर्ट –

१.से - निगडी २५ .नं .प्राधिकरण लॉन टेनिस कोर्ट
२.से - निगडी २६ .नं .प्राधिकरण लॉन टेनिस कोर्ट
३.मोहननगर लॉन टेनिस कोर्ट चिंचवड ,
४.श्री भोसरी ,इंद्रायणीनगर ,कुल लॉन टेनिस कोर्टसंत ज्ञानेश्वर क्रीडा सं .
५.सांगवी लॉन टेनिस कोर्ट
६.पिंपळ गुरव लॉन टेनिस कोर्ट

**लॉन टेनिस कोर्ट सरावासाठी व स्पर्धेसाठी दरपत्रक-**

| अ क्र | आरक्षणाच्या तपशील म.न.पा.चे सर्व लॉन टेनिस कोर्ट | प्रतिदिन एक तास सराव शुल्क दर र.रू. | प्रति महिना एक तास सराव शुल्क दर र.रू. | स्पर्धेसाठी १०.०० ते ४.०० दर र.रू. |
|---|---|---|---|---|
| | | जुने दर र.रू. | जुने दर र.रू. | जुने दर र.रू. |
| १ | म शाळा विद्यार्थी .पा.न. | विनामुल्य | विनामुल्य | विनामुल्य |
| २ | २ ,४ एकत्रित ग्रुप नागरिकांसाठी | रु २०. | ६०० | ५०० |
| ३ | मनपा हदीतील खाजगी शाळांची मुले २,४ | रु२०. | ६०० | ५०० |

## ९ .बॅडमिंटन हॉल–

| | |
|---|---|
| १. पवनानगर बॅडमिंटन हॉल चिंचवड , | ८. गव्हाणेवस्ती लांडेवाडी बॅडमिंटन हॉल, भोसरी |
| २. थेरगांव बॅडमिंटन हॉल | ९. पिंपरीगांव बॅडमिंटन हॉल |
| ३. मदनलाल धिंग्रा ,से नं २५ बॅडमिंटन हॉल , प्रधिकरणनिगडी- | १०. श्री संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल बॅडमिंटन हॉल ४ कोर्टभोसरी ,इंद्रायणीनगर , |
| ४. प्रधिकरण से.नं २५ आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ | ११. छत्रपती शिवाजी महाराज बॅडमिंटन हॉल, यमुनानगरनिगडी , |
| ५ . संत तुकारामनगर बॅडमिंटन हॉल१८पिंपरी , | १२. महात्मा फुले नगर बॅडमिंटन हॉल चिंचवड , नियोजित |
| ६. डॉ हेडगेवार क्रीडा संकुल अजमेरा कॉलनी अजमेरा बॅडमिंटन हॉलपिंपरी , | १३. सांगवी बॅडमिंटन हॉल |
| ७. इंद्रायणीनगर बॅडमिंटन हॉल, भोसरी | १४. पिंपळे गुरव बॅडमिंटन हॉल. |

## ९.बॅडमिंटन हॉल- दरपत्रक

| अ क्र | बॅडमिंटन हॉल आरक्षण तपशील | प्रतिदिन एक तास सराव शुल्क दर रु.रू. | स्पर्धेसाठी १०.०० ते ४.०० दर रु.रू. |
|---|---|---|---|
| | | जुने दर रु.रू. | जुने दर रु.रू. |
| १. | म शाळा विद्यार्थी .पा.न. | विनामुल्य | विनामुल्य |
| २. | २ ,४ एकत्रित ग्रुप नागरिकांसाठी | १५ | ५०० |
| ३. | मनपा हदीतील खाजगी शाळांची मुले २, ४ | १५ | ५०० |

**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८

(म.न.पा. काही क्रीडा सुविधांचे दर यापूर्वी निश्चित केले नव्हते.मा.महापालिका सभा ठराव क्र.४२१ दि.१८/०१/२०१४ अन्वये सदर क्रीडा सुविधांचे दरांस मान्यता दिली असून मा.आयुक्त यांचेकडील विषयपत्र क्र.क्रीडा/७/कावि/१३१/२०१४ दि.१७/०५/२०१४ अन्वये खालील प्रमाणे २५ टक्के दर कमी करण्यात येत आहे.

**१ ) म.न.पा. विविध क्रीडा सुविधा- दरपत्रक**

| अ.क्र. | क्रीडा सुविधा तपशिल | दर र.रू. | | अनामत र.रू. | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ठरावक्र ४२१. .दि१८/१/ २०१४ अन्वये मंजूर दर र.रु. | सुधारित दर र.रू. | ठरावक्र ४२१. .दि१८/१/ २०१४ अन्वये मंजूर दर र.रु. | सुधारित दर र.रू. | |
| १ | म न पा स्क्वॅश कोर्ट , मोरवाडी सरावासाठी प्रतिदिन प्रती तास दर | १०० | ७५ | ५०० | ३७५ | मनपा शाळा,क्रीडा प्रबोधिनी विद्यार्थी यांना क्रीडा सुविधा प विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येईल .<br>परंतू संबंधित शाळांनी किमान ३ महिने अगोदर लेखी अर्ज क्रीडा विभागास सादर करणे आवश्यक |
| २ | टेबल टेनिस केंद्र ( नियोजित) सरावासाठी प्रतीदिन, प्रतीतास दर | ८० | ६० | ३००० | २२५० | |
| ३ | स्पर्धेसाठी प्रती टेबल टेनिसचा प्रतीदिनप्रतीतास , दर | - | २५० | - | २२५० | |
| ४ | स्पर्धेसाठी प्रती टेबल टेनिसचा सते ००.१०. .सायं५करिता ००. दर | २००० | १५०० | ३००० | २२५० | |

२ ) म.न.पा. गिर्यारोहण भिंत सभासद फी –दरपत्रक

| अ.क्र. | क्रीडा सुविधा तपशिल | रजि. (Registration for life time) फी.रु.र . | प्रती तास दर र.रु. | | दरमहा प्रती तास दर र.रु. | | प्रति वर्षी प्रती तास दर र.रु. | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | ठरावक्र४२१. दि/१/१८. २०१४ अन्वये मंजूर दर र.रु. | सुधारित दर र.रू. | ठरावक्र४२१. दि/१/१८. २०१४ अन्वये मंजूर दर र.रु. | सुधारित दर र.रू. | ठराव क्र४२१. दि/१/१८. २०१४ अन्वये मंजूर दर र.रु. | सुधारित दर र.रू. |
| १ | म .पा.न. शालेय विद्यार्थी गिर्यारोहण भिंत सभासद फी | विनामूल्य | विनामूल्य | | विनामूल्य | | विनामूल्य | |
| २ | इतर नागरिक खेळाडू गिर्यारोहण भिंत सभासद फी | १०० | १०० | ७५ | १००० | ७५० | ९००० | ६७५० |

३ . विविध क्रीडा सुविधा प्रशिक्षणासाठी दरपत्रक

| अ.क्र. | क्रीडा सुविधेचे नाव | प्रशिक्षणासाठी प्रति दिन ताशी दर ररु. | | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | ठराव क्र४२१. दि२०१४/१/१८. अन्वये मंजूर दर र.रु. | सुधारित दर र.रू. | |
| १ | स्क्वॅश कोर्ट | र.रू.५००/- | र.रू.३७५/- | नागरिकांसाठी सरावाच्या वेळा व मार्गदर्शकां साठी प्रशिक्षणासाठी वेळा निश्चित करण्याचे अधिकार माआयुक्त . यांना राहील.सराव वेळेत प्रशिक्षण देता येणार नाही तसेच राज्य व राष्ट्रीय खेळाडूंना सरावासाठी आरक्षणच्या वेळा राखून ठेवण्याचे अधिकार माआयुक्त यांना , राहील. |
| ३ | लॉन टेनिस कोर्ट | र.रू.५००/- | र.रू.३७५/- | |
| ४ | बॅडमिंटन कोर्ट | र.रू.५००/- | र.रू.३७५/- | |

**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८